मंगळवार, १० जानेवारी २०२३
किंमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -१४२
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

●MARATHI ●DAINIK ●AURANGABAD (MAHARASHTRA) ●TUESDAY 10 JANUARY 2023 | adhunikkesari.com Adhunik Kesari | ●YEAR-02 ●ISSUE-142 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-14 ●PRICE-5

## चर्चेतली बातमी

## ‘लव्ह जिहाद’विरोधात कायदा बनवावा : शेलार



आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** भाजपा नेते आशिष शेलार यांनी लव्ह जिहादशी संबंधित घटनांमुळे सामाजिक बांधिलकी आणि ऐक्याला तडा जात आहे. त्यामुळे ‘लव्ह जिहाद’विरोधात राज्य सरकारने कायदा बनवावा आणि समस्त नागरिकांनी या कायद्याला समर्थन द्यावे, असे शेलार यांनी ट्विटद्वारे म्हटले आहे. याचबरोबर, मला आश्चर्य वाटते निर्लिज्जपणाचा हा कळस आहे. आमच्या मुली, महिला, भगिनींवर जी काय माहितीसमोर येते आहे त्यातून स्पष्ट दिसतय, किंवा त्यातून आपण अर्थ काढू शकतो तो म्हणजे एका विशिष्ट वर्गाकडून रोज अन्याय अत्याचार होत आहेत. हिंदू मुली या लोकांना खेळाचे साधन वाटायला लागल्या आहेत का?, त्यांच्यावर अन्यायच करावा, असे वाटायला लागले आहे की काय?” असा आशिष शेलार यांनी संतप्त सवाल उपस्थित केला. याशिवाय, लव्ह जिहादच्या घटना सामाजिक बांधिलकीला, सामाजिक एकतेला आता बाधा निर्माण करत आहेत. त्यामुळे महाराष्ट्र सरकारने सुद्धा लव्ह जिहादच्या प्रकरणात सकारात्मक भूमिका घेतली आहे. इथपर्यंत थांबून चालणार नाही कायदा बनवावाच लागेल, माझं आवाहन असेल की राज्यातील समस्त नागरिकांनी त्या कायद्याला समर्थन द्यावे.

# हिरकणी कक्षांना टाळे

## परिवहन खात्यामधील बेजबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई होणार का?




उस्मानाबाद येथील बस स्थानकामध्ये असलेल्या हिरकणी कक्षाला कायमच टाळे लागलेले असते.

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**उस्मानाबाद : जिल्ह्यामधील अनेक आगारातील हिरकणी कक्ष फक्त नावालाच उभारण्यात आले असल्याचे दिसून येत आहे. बघेल तेव्हा बस स्थानकामधील हिरकणी रूमला कुलूप लावलेले असते अशीच भावना प्रवासी स्तनदा मातेकडून व्यक्त होत आहे. परिवहन महामंडळाने प्रवासी स्तनदा मातेसाठी हिरकणी कक्षाचे धोरण इतर शासकीय कार्यालयापेक्षा अग्रेसर होऊन राबवले, मात्र स्थानिक अधिकारी कर्मचाऱ्याकडून या धोरणावर पाणी फिरवल्याचे चित्र दिसून येत आहे.**

उस्मानाबाद आगारासह इतर सर्व बस स्थानकामध्ये स्तनदा मातेला तिच्या चिमुकल्या बाळाला स्तनपान करण्यासाठी हिरकणी कक्ष उभा केले. आपल्या प्रवासी स्तनदा मातांच्या स्तनपानासाठी सुविधा असावी असे धोरण शासनाने 2012 साली तयार केले होते. याच अनुषंगाने एका कर्तबगार अधिकाऱ्याने आपल्या कार्यकाळात महाराष्ट्रातील 248 बस स्थानकामध्ये हिरकणी कशाची स्थापना केली, त्यामुळेच खऱ्या अर्थाने हिरकणी कशाची ओळख जनसामान्यात निर्माण झाली होती. मात्र भ्रष्टाचाराच्या भस्मासुराने जिल्ह्यातील हिरकणी कक्ष ला कधी कुलूप लागले कळलेच नाही. अनेक हिरकणी कक्ष तर मोडकळीस आलेले आहेत. जिल्ह्यात नवरात्र मध्ये तुळजापूर येथे ये-जा करणाऱ्या प्रवास भाड्यातून एसटी महामंडळाला लाखोचा नफा याच नवदुर्गा देतात, मात्र डोळ्यासमोर उभे असलेले हिरकणी कक्ष बंद पाहून त्याच गर्दीच्या बस स्थानकामध्ये डोळे आड होऊन पोटच्या बाळाला स्तनपान कराव लागते. ही अतिशय लाजिरवाणी गोष्ट आहे. जिल्ह्यामधून सर्वात जास्त व्यवसाय देणारे तुळजापूर आगारातील रहदारीच्या बसस्थानकामध्ये तर चक्क हिरकणी कक्षच बंद करून तिथं बुकिंग कार्यालय उभा ठाकले आहे. विशेष म्हणजे या परिवहन महामंडळात जिल्हा विभाग नियंत्रक ह्या एक महिला अधिकारी आहेत, तरीही यांना महिला म्हणून महिलेसाठी जाण नसल्याचेच पहावयास मिळत आहे.जिल्ह्यात एकूण 16 बस स्थानकामध्ये नावालाच उरलेले 16 हिरकणी कक्ष आहेत.

**हिरकणी कक्ष कशासाठी उभे केले?**
बस स्थानकामध्ये एस.टी. बसची येण्याची वाट पाहत बसणाऱ्या स्तनदा मातांना वर्दळीच्या ठिकाणी आपल्या बाळाला स्तनपान करण्यासाठी गैरसोय होऊ नये, म्हणून प्रत्येक बस स्थानकामध्ये एक हिरकणी कक्ष उभा केलेला आहे. याच हिरकणी कक्षाच्या सविस्तर माहितीसाठी वार सोमवार ( दि.9) कर्तव्यदक्ष वाहतूक नियंत्रक अधिकारी महिला दुपारी दोन पासून सायंकाळी पाच वाजेपर्यंत कार्यालयातच नसल्याचे त्यांच्या कार्यालयाकडून सांगण्यात आले त्यामुळे त्यांच्याशी संपर्क होउ शकला नाही.

## स्विस नॅशनल बँकेला २०२२ मध्ये १४३ अब्ज डॉलर्सचा तोटा

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** स्विस नॅशनल बँकेला २०२२ मध्ये १३२ स्विस फ्रँक म्हणजेच १४३ अब्ज डॉलर्सचा वार्षिक तोटा झाला आहे. सोमवारी ही बाब सांगण्यात आली. या बँकेच्या ११५ वर्षांच्या इतिहासात हा सर्वात मोठा तोटा आहे. शेअर आणि बॉण्ड पोर्टफोलिओच्या मूल्यात घट झाल्याने हा तोटा झाला आहे. या घटनेमुळे बाजारात तेजीत असलेल्या स्विस फ्रँकचाही नकारात्मक परिणाम झाला. स्विस नॅशनल बँक या प्रकरणात ६ मार्चला तपशीलवार आकडेवारी जाहीर करणार आहे. स्विस फ्रँक कमकुवत झाला याची विविविध कारणं आहेत. स्विस बँकेने ८०० अब्ज किंमतीचे स्टॉक्स आणि बॉण्ड्स यामध्येच १३१ अब्ज फ्रँकचे नुकसान झाले. जागतिक शेअर बाजारात मंदी आली. त्यामुळे रोखीच्या किंमती गेल्या वर्षी घसरल्या. यामुळे स्विस नॅशनल बँकेसह सगळ्यात बँकांनी महागाईचा सामना करण्यासाठी व्याजदर वाढवले. मात्र हे देखील तोट्याच्या दिशेने घेऊन जाणारे कारण ठरले.

## गुन्ह्यांच्या बातम्यांचे कव्हरेज हृदय पिळवटून टाकणारे

### ऋषभ पंत कार अपघात प्रकरणी सरकारने ओढले कडक ताशेरे

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** केंद्र सरकारने सोमवारी क्रिकेटपटू ऋषभ पंतचा रस्ता अपघात आणि इतर काही गुन्ह्यांच्या बातम्यांचे टेलिव्हिजन कव्हरेज घृणास्पद आणि हृदय पिळवटून टाकणारे असल्याचे म्हटले आहे. यासोबतच टीव्ही चॅनेल्सना संबंधित कायद्यानुसार विहित केलेल्या कार्यक्रम संहितेचे काटेकोरपणे पालन करण्यास सांगितले आहे. माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने सर्व खाजगी उपग्रह वाहिन्यांना जारी केलेल्या मार्गदर्शक तत्वांमध्ये पंत यांच्या कार अपघाताचे कव्हरेज, मृतदेहांचे दुःखदायक फोटो प्रसारित करणे आणि पाच वर्षांच्या मुलाला मारहाण करणे या बाबींचा उल्लेख केला आणि असे वृत्तांकन योग्य नसल्याचे म्हटले आहे. सरकारने सांगितले- दूरचित्रवाणी वाहिन्यांनी मृत व्यक्तींचे मृतदेह आणि आजूबाजूला रक्ताचे तुकडे पडलेले, जखमी व्यक्तींचे फोटो/ व्हिडिओ दाखवले आहेत. स्त्रिया, लहान मुले आणि वृद्धांना निर्दयीपणे मारहाण केल्याचा क्लोज-अप शॉट्स देखील दर्शविला आहे. सरकारने म्हटले आहे की, शिक्षकाने एका मुलाला निर्दयीपणे मारहाण केल्याचे आणि त्याचे सतत रडणे आणि किंचाळणे असे प्रदीर्घ शॉट्स दाखवण्यात आले, जे चुकीचे आणि भयंकर आहे. या दरम्यान शॉट्स अस्पष्ट झाले नाहीत किंवा कोणतीही खबरदारी घेतली गेली नाही. प्रसारकांनी सोशल मीडियावरून व्हिडिओ क्लिप आणि छायाचित्रे घेतल्याचेही सांगण्यात आले आहे. तसेच प्रोग्राम कोडचे पालन करून या क्लिप दाखविल्या गेल्या नाहीत.

# दिंडोरी तालुक्याला आले माथेरानचे स्वरूप

## दाट धुक्यामुळे द्राक्षेपंढरी हादरली, बळीराजा चिंतेत

आधुनिक केसरी न्यूज

बंडू खडांगळे

लखमापूर : दिंडोरी तालुक्यात सध्या पहाटे पासून पाणी मिश्रित दाट धुके पडत असल्याने द्राक्षेपंढरीला मोठा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे सध्या तालुक्यातील बळीराजांच्या चिंतेत वाढ झाली आहे.त्यामुळे तालुक्यातील शेतीवर अस्मानी संकटाचे ढग निर्माण झाले आहे.

गेल्या तीन ते चार दिवसांपासून तालुक्यात पाणी मिश्रित दाट धुके पडत असल्याने रब्बी हंगामातील बहुतेक पिकांना धोका निर्माण झाला आहे.सध्या थंडीने आपला लहरीपणा दाखवित कधी जास्त तर कधी कमी प्रमाणांचे समीकरण दाखवले असल्याने रब्बी हंगामातील पिकांना पाहिजे ते पोषक वातावरण मिळत नसल्याने रब्बी हंगामातील उत्पादन क्षमतेवर त्यांचा विपरीत परिणाम होण्याचा मोठ्या प्रमाणावर धोका निर्माण झाला आहे. तीन चार दिवसांपासून पाणी मिश्रित दाट धुके व कमी प्रमाणातील थंडी यामुळे रब्बी हंगामातील पिके व द्राक्षे पिके वाचवण्यासाठी बळीराजांला तारेवरची कसरत करावी लागत आहे.

सन २०१४-१५ मधील रब्बी हंगामात अशाच स्वरुपाचे वातावरण तयार झाले होते.व गहू, हरभरा, द्राक्षे इ.पिकांना मोठ्या प्रमाणावर धोका निर्माण झाला होता. व त्यामुळे उत्पन्न वाढीवर त्यांचा मोठ्या प्रमाणावर परिणाम झाला होता.त्यामुळे तालुक्यातील शेतकरी आर्थिक कोंडीत सापडला होता. दिवसेंदिवस वातावरणातील होणारा बदल हा शेतकरी वर्गाच्या प्रगतीला खिळ घालणारा ठरत असल्याने तालुक्यातील शेती व्यवसाय धोक्याची घंटा वाजवित असल्याने शेती व्यवसाय शेतकरी वर्गाला एक प्रकारे आवाहन ठरत आहे.वातावरणातील बदल अशाच कायम राहिला तर शेतकरी वर्ग कर्जाच्या डोंगराखाली गाडला जाईल असा विचार सध्या जाणकार शेतकरी वर्गातुन व्यक्त केले जात आहे. रब्बी हंगामाच्या सुरुवातीला पोषक वातावरण होते. परंतु पेरण्या संपल्यानंतर व उगवण प्रक्रिया मध्यावर आल्यानंतर रब्बी हंगामातील पिकांवर वातावरणातील बदलाचे गडद अस्मानी संकट निर्माण झाल्याने मेटाकुटीला आलेला जगाचा पोशिंदा बळीराजा आता यामुळे चारी मुंड्या चित होतो की काय ?अशी भीती दिंडोरी तालुक्यातील बळीराजांला वाटु लागली आहे.


यंदा रब्बी हंगामाला पाणी मुबलक प्रमाणात उपलब्ध आहेत. परंतु वातावरण साथ देत नसल्याने रब्बी हंगामातील पिकांवर विविध रोगाचे आक्रमण होउ पाहात असल्याने पिके वाचवण्यासाठी शेतकरी वर्ग तारेवरची मोठी कसरत करीत आहे.




**हिवाळ्यात रेनकोटचा वापर :**
सध्या पाणी मिश्रित दाट धुके पहाटेपासून मोठ्या प्रमाणावर पडत असल्याने सकाळी प्रवासी करणारे विविध कंपन्यातील कामगार, मजुर वर्ग यांना सकाळी प्रवास करतांना चक्क रेनकोट चा वापर करावा लागत आहे. त्यामुळे सध्या हिवाळा आहे पावसाळा ही एक डोके दु:खीचे गणित होऊन बसले आहेत.

सध्या द्राक्षे पंढरीत द्राक्षांच्या घडांना पेपर आच्छादनाचे काम तालुक्यातील शेतकरी करीत आहेत. त्यासाठी प्रचंड महागाचे पेपरमध्ये खरेदी केले जात आहे. परंतु सध्या पाणी मिश्रित दाट धुके पडत असल्याने घडांना आच्छादन केलेले पेपर संपूर्ण पणे ओले होत असल्याने पेपर खराब होत असुन त्यांचा परिणाम घडांवर होण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे हा वातावरणातील सतत होणार बदल शेतकरी वर्गाला आर्थिक संकटात नेणारा आहे.

छबुतात्या मटाले ( द्राक्षे उत्पादक शेतकरी पालखेड बंधारा ता.दिंडोरी ).



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932


## कवितांच्या गावा जावे...

आधुनिक केसरी

साहित्यातला एक सुंदर, नाजूक, भावनाप्रधान प्रकार म्हणजे कविता ! आद्यकवी वाल्मिकी, भवभूती, कालिदास, वेदव्यास हे सगळे संस्कृत कवी, ज्ञानेश्वर, तुकाराम रामदास यांच्यासारखे अनेक संत कवी, पोवाडे, लावण्या आदी लिहिणारे तंत कवी या सगळ्यांपासून ते अगदी आजपर्यंतच्या भा रा तांबे, कुसुमाग्रज, बा भ बोरकर, विंदा करंदीकर, मंगेश पाडगावकर, संदीप खरे आदी अनेक कवींच्या कविता रसिक मनाला रिझवत आल्या आहेत. बहिणाबाई, पद्मा गोळे, शांता शेळके, अरुणा ढेरे आदी स्त्री साहित्यिकांनी सुध्दा मराठी कवितेला समृद्ध केले आहे. मला तर कविता म्हणजे साहित्यातलं मूर्तिमंत स्त्रीरुपचं वाटतं. कधी ती शालूसारखे भरजरी वस्त्र लेऊन येते एखाद्या कुलीन घरंदाज स्त्रीसारखी. कधी कधी ती असते लंकेची पार्वती. कवी जसं ठरवेल तशी ती आपल्यापुढे येते. कधी ती आपल्याला कल्पनेतील गावाला घेऊन जाते. कधी आपल्या मनाला रिझवते, कधी जोजवते, कधी मनमुराद हसवते तर रडवते. कधी कधी ती कारुण्याची मूर्ती होते. कधी शहाणपणाचे दोन शब्द सांगते तर कधी कधी कठोर होऊन आसूडही ओढते. आनंदाच्या, दुःखाच्या, प्रेमाच्या, शोकाच्या, मिलनाच्या, तिरस्काराच्या, प्रार्थनेच्या, भक्तीच्या, शृंगाराच्या, शौर्याच्या अशा नानाविध रंगांनी आणि रसांनी ती न्हालेली असते. आपल्याला फक्त रसिक व्हावं लागतं, तिच्या अंतरीचा भाव समजून घ्यावा लागतो. तो भाव तुम्हाला समजून घेता आला की ती तुम्हाला समृद्ध करीत जाते.जशी एखाद्या प्रदेशातून वाहणारी नदी तिच्या काठावरच्या प्रदेशाला समृद्ध करीत जाते. म्हणूनच ती कधी कधी काव्यगंगा, भक्तीगंगा इ नावांनी आपल्यापुढे प्रकटते. आपली समज जसजशी वाढत जाईल तसतशी ती जीवनाचं तत्वज्ञान आपल्या गळी उतरवत जाते, आपल्याही नकळत. म्हणून ज्ञानेश्वर माउलींसारख्या संतांच्या ओव्या प्रत्येक वेळी निरनिराळा अर्थ घेऊन आपल्यासमोर प्रकटतात. आपण जी गाणी ऐकतो, तीही एक कविताच असते. तसं कविता म्हणजे गाणंच असतं ! **क्रमशः**



## आनंदी पहाट



### व्यक्तिमत्व विकासाची निरंतर प्रक्रिया

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

प्रत्येक व्यक्ती जन्मतः वेगळी, विशेष असते. प्रत्येकाच्यात एक वेगळी खासियत असते; जिच्यामुळे आपण इतरांपेक्षा वेगळे असतो. हा वेगळेपणाच ठरवतो कि आपण कोण आहोत, कसे आहोत, एखाद्या परिस्थितीत आपण कसे वागतो ? गरज असते ती आपली अंतर्गत क्षमता जागवण्याची आणि व्यक्तिमत्व सुधारण्याची. व्यक्तिमत्व विकासामुळे आळस, अनुत्साह आणि निरसतेमध्ये अडकलेली व्यक्ती कार्यक्षम, उत्साही, प्रसन्न आणि आपल्या ध्येयानं प्रेरित होऊ लागते. व्यक्तिमत्व विकासाच्या प्रक्रियेमध्ये व्यक्ती आपल्या वैशिष्ट्यांना कोणत्याही प्रतिकाराशिवाय, आपल्या सीमांच्या बंधनांचा त्याग करणे शिकत असते. आनंदी राहणे शिकत असताना सर्व काही अधिक उत्साहानं, चैतन्यानं करू लागत असल्याचं दिसून येतं.प्रत्येक व्यक्तीमध्ये अनेक गुण असतात; त्यातील काही गुण इतरांसारखे देखील असतात, तर काही गुण इतरांपेक्षा वेगळे, निराळे असतात. खरं तर ह्या वेगळ्या गुणांमुळेच ती व्यक्ती ओळखता येते. म्हणूनच, व्यक्तिमत्व म्हणजे व्यक्तीमधील वैविध्यपूर्ण गुणविशेषांचा वैशिष्ट्यपूर्णसंच होय. व्यक्तिमत्व विकास हि एक व्यापक संकल्पना आहे. त्यामध्ये, शारीरिक विकास, भावनिक विकास, बौद्धिक विकास, सामाजिक विकास, आत्मिक विकास अशा अनेक बाबींचा समावेश असल्याचं दिसून येत असतं. सध्याच्या २१ व्या शतकात व्यावसायिक क्षेत्रात आपली प्रतिष्ठा वाढवण्यासाठी फक्त उच्च शिक्षण असून चालत नाही; त्यासोबत आपल्यातील आत्मविश्वास सुद्धा महत्वाचा ठरत असतो. आपल्या व्यक्तिमत्वाचा किती प्रभाव पडतो, ह्यावर आपल्या कामाचा आलेख ठरविला जात असतो. आपण कोणत्याही व्यावसायिक क्षेत्रात काम करत असताना आपल्या वक्तृत्वाचा खूप मोठा प्रभाव पडत असतो. आपण आपले विचार, विषय किती तार्किक पद्धतीने, अगदी सोप्या भाषेत, सोयीस्कररित्या, न अडखळता, धीटपणाने आणि समोरच्या व्यक्तीला पटतील असे मांडू शकल्यास आपल्या व्यक्तिमत्वाचा प्रभाव निश्चितच समोरच्या व्यक्तीवर पडतो.



आधुनिक केसरी

### पावलो विसावा | तुझ्या कृपे ||

जीवाचे ह्या हाल | झाले रात्रंदिन ||
तुझेच चिंतन | मन करी ||१||
संसाराचे सुख | नाथाने दावीले ||
जगणेच झाले | दिव्य लेणे ||२||
व्यसनाचा संग | कधी न जडला ||
म्हणूनी भेटला | ज्ञानदेव ||३|
तृप्त झालो आज | भजनात तुझ्या ||
अंतरात माझ्या | तुकाराम ||४||
मागणे न आता | नाही तुज देवा ||
पावलो विसावा | तुझ्या कृपे ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

**आपण प्रसन्न राहणे हे श्रीमंतीचे लक्षण नाही तर श्रीमंती हे आपण प्रसन्न राहत असल्याचे लक्षण आहे. म्हणून नेहमी प्रसन्न राहण्याचा प्रयत्न करा.**

**शक्य असेल तर स्वतःस बदला. कोणीही तुमच्यासाठी बदलणार नाही. ठरवा काय करायचे ते!**

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

आधुनिक केसरी



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज


**परमानन्द महान है, शब्दानन्द स्वरुप ।**
**अपरछिन्न सागर भरा, अमृत तत्त्व अनूप ।।०३।। (स्वर्वेद प्रथम मण्डल प्रथम अध्याय) ०१/०१/०३मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
जगातील सर्व सुखे अनित्य आहेत. परमानंद परमप्रभूचे सुख सर्वांपेक्षा महान आणि श्रेष्ठ आहे. तीन पाद-अनिर्वाच्य निःशब्द आनंद स्वरूप परमेश्वराच्या प्राप्तीने जीव अमर होऊन जातो. तो अमृताचा महासागर भरलेला आहे. त्या अनंत महासागराची सीमा नाही. तो एकरस सर्व व्यापक होऊन ओतप्रोत परिपूर्ण आहे.

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.**

## मनाचे श्लोक

आधुनिक केसरी



**नभासारिखे रूप या राघवाचे।**
**मनीं चिंतिता मूळ तुटे भवाचे।**
**तया पाहता देहबुधी उरेना।**
**सदा सर्वदा आर्त पोटी पुरेना।।१९७।।**

**श्लोकार्थ :** परमात्मस्वरूप आकाशासारखे सर्वव्यापी आहे. त्याचे सतत चिंतन केले तर दृश्य सत्य वाटायला लावणारा भ्रम नाहीसा होतो. परमात्म्याचे दर्शन झाले की देहबुध्दी शिल्लक उरत नाही. इतकेच नव्हे तर दर्शनाची तृप्ती होत नाही.

**विवेचन :** सर्व संत हे उत्कृष्ट समाज शास्त्रज्ञ आहेत. त्यांना मनुष्याचा मनाचा उत्तम अभ्यास असतो. कितीही सांगितले तर सामान्य मनुष्याच्या मनातील पण , परंतु काही जात नाहीत हे त्यांना माहीत आहे. तसेच आपण आता मनाच्या श्लोकांच्या शेवटच्या टप्प्यावर आलो आहोत, त्यामुळे सर्व आधीच्या सर्व श्लोकांचा आढावा ही समर्थ शेवटच्या काही श्लोकात घेत असावेत. समर्थ मागील श्लोकात म्हणतात की परमात्मा सर्वत्र भरून राहिला आहे, तसेच त्याला पाहायला गेले तर तो दृष्य आणि अदृश्य यांच्या पलीकडे आहे. या श्लोकात समर्थ परमात्म्याच्या चिंतनाने कसला लाभ होतो याचे विवेचन करीत आहेत.

दास चैतन्य
संपर्क क्र. ८३८००१९६७६

समर्थ परमात्म्याला, त्यांच्या रामावर असलेल्या निष्ठेमुळे राघव असे संबोधतात. हा राघव आकाशासारखा विशाल आहे. आकाश निर्मळ, निश्चल आहे, विशाल आहे, अलिप्त आहे. आकाश कुठूनही पाहिले तरी विशालच भासते. प्रत्येकाचे आकाश त्याच्या मना इतके विशाल असते असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही. जितके मन विशाल, तितके त्याचे आकाश ( मनो ) विशाल, तितका त्याचा राम विशाल, तितका त्याचा आनंद विशाल....!
बघा पटतंय का ? मनाच्या आकाशात आलेले देहबुद्धीचे मळभ साधनेने आणि सद्गुरू कृपेने निरभ्र झाले की साधक आकाशाची विस्तीर्णता न्याहाळताना भावविभोर होऊन जातो.
तो इतका मंत्रमुग्ध होऊन जातो की त्याचे मनोकाश आणि आकाश एक होऊन जातो. याचे अनुभतीला शब्दात मांडणे साधकासाठी निव्वळ अवघड असते, संतच याचे वर्णन करू शकतात.
समर्थ म्हणतात, "आकाश म्हणिजे अंतरात्मा ।प्रत्ययें पाहवा महिमा ।त्या आकाशापासून जन्मा ।वायो आला ॥" (दास.११.०६.१२॥)
एका आईचा एकुलता एक मुलगा परदेशी शिकायला गेलेला असतो, शिक्षण संपवून जेंव्हा तो घरी येणार असतो, तेंव्हा मुलगा आणि आई दोघेही बरेच काही ठरवतात.
आई भेटली की अमुक सांगेन, तमुक दाखवेन, मुलासाठी काय करू आणि काय नको असे त्या आईला वाटते. आई पाहताच मुलगा आईला बिलगतो, तिच्या कुशीत शिरतो... त्याला काय सांगू आणि काय नको असे होते, प्रत्यक्षात मात्र मूक संवाद होतो. माऊली म्हणतात तशी "या हृदयीचे त्या हृदयी घातले" अशी स्थिती होत असते, असे सर्व संत सांगतात. संतांना ही स्थिती प्राप्त झाल्याचा आनंद असतोच, पण त्यांना खरा आनंद विरहात असतो.... कदाचित हे पटकन मान्य होईल असे नाही...
प्रेयसीची वाट पाहण्यात होणारी मनाची घालमेल प्रियकराला प्रियासीचे सतत स्मरण देत असते, तो मनातून तिच्या सोबतच असतो. देव आणि भक्ताचे नाते असेच असते. भक्ताला आनंद असतो देवाच्या दर्शनाची वाट पाहण्याचा.... थोडक्यात विरहाचा.... ज्ञानेश्वर माऊलींसारख्या थोर संताला सुद्धा विरहिणी गावी असे वाटते, यातच सर्व आले....!भक्त विरहात असला की त्याचे नाम सतत चालू रहाते.....!
विवाहित जोडप्याच्या सर्वात आनंदाचा कालावधी कोणता असा कोणी प्रश्न विचारला ? तर त्याचे उत्तर अनुभवी लोक विविध प्रकारे देतील. माझ्यामते विवाह ठरल्यापासून ते विवाह होईपर्यंतचा कालावधी सर्वात सुखाचा...! कोणाची तरी वाट पाहणे आणि आपली कोणी तरी वाट पहात असणे आणि याची गोड जाणीव आपल्याला असणे ही कल्पनाच किती रम्य आणि सुखावह आहे. प्रिय व्यक्तीच्या विरहात देखील विशिष्ठ प्रकारचे सुख असतेच. खरा भक्त आणि भगवंत यांची भेट झाली तरी त्या विवाहोत्सुक युगुलाप्रमाणे खऱ्या भक्ताला भेट होऊनही भगवंताचा विरहच जास्त प्रिय असतो.

## बध्दमुक्तनिरूपण

आधुनिक केसरी



सौ. उज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

ज्याच्या संगतीत आपण राहू तसेच आपले विचार होणार आता एक साधं ऊदा देते मित्रांनो आपण देवळात जातो मन एकदम प्रसन्न असते. सकाळी सकाळी ऊठून तुम्ही सारसबागेतील गणपती पुढे नतमस्तक व्हा किंवा कोणत्याही देवाच्या पायरीशी आपला माथा टेकवा आपण खुपच आनंदी आहोत असं आपलं मन सांगत असते . मी तर म्हणेन जगातील सर्वोतम् व्यक्ती मीच आहे असा गर्व परमात्म्याच्या दर्शनाने होतो आता मला चिंता, काळजी कोणत्याही व्यावहारिक अडचणी नाहीत असं वाटतं एवढं एकरूप होऊन जातो आपण नुसत्या त्याच्या दर्शनाने. भागवत,रामायण, महाभारत, गीतेचे अध्याय घ्या किंवा कोणतेही संत साहित्य घ्या आपले मन ब्रम्हाकार रूपाला लागलेले असते. पण मित्रांनो खरी गंमत पुढेच आहे. त्यानंतर म्हणजे आपण नित्याचे व्यवहार करायला लागल्यावर निरूपणाकडे आपले पूर्ण दुर्लक्ष होते. खरं तर आपण प्रापंचिक माणसं आहोतपोटाची खळगी भरण्यासाठी कुटुंबातील सदस्य सांभाळण्यासाठी आपल्याला अर्थार्जनासाठी बाहेर पडावेच लागते.

बरं व्यवहार सोडून चालत नाही. त्याचा परिणाम असा होतो की परमार्थ करतो म्हणून प्रपंचाकडे दुर्लक्ष होते व प्रपंचातून मन निघाले नसल्याने परमार्थ धड हाती लागत नाही. परमार्थ साधना करणाऱ्या सर्व साधकांना ह्याच अडचणीतून जावे लागते. याला काय करावे? साधना आणि परमेश्वर यांच्या निकटच्या ओढीने सद्गुरूच्या विचारांचा पगडा एवढा मनावर बसलेला असतो की स्वस्वरूपाची खरी ओढ लागते.

पण प्रपंचाचे प्रेम सुटलेले नसल्याने व्यवहार करू लागले की मन त्यामध्ये पटकन रमून जाते. म्हणजेच आपण जेव्हा परमात्म्याच्या अगदी जवळ जातो तर त्याच्याशी एकरूप होतो. व संसार करत असताना त्याच्या बरोबर पण एकरूप होतो. या सगळ्यांना विचारात घेऊन समर्थानी "बध्दमुक्तनिरूपण"हा समास लिहिला आहे.

# महाराष्ट्रातसुद्धा ओबीसींची स्वतंत्र जनगणना करा

## राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** बिहार राज्याने नुकतीच जातनिहाय जनगणना करण्यास सुरवात केलेली आहे. याच धर्तीवर बिहारप्रमाणे महाराष्ट्र राज्यातील इतर मागासवर्गीयांची स्वतंत्र जनगणना करण्यात यावी अशी मागणी राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. याबाबत छगन भुजबळ यांनी त्यांना पत्र दिले आहे.

छगन भुजबळ यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या पत्रात नुकतीच बिहारमध्ये स्वतंत्रपणे जातनिहाय जनगणना सुरु झाली आहे. तमिळनाडू, छत्तीसगड आणि इतर अनेक राज्यांनी सुद्धा ओबीसी जनगणना केल्या असून त्यांना राज्याच्या विकासासाठी त्याचा उपयोग झाला आहे. महाराष्ट्रातही जातनिहाय जनगणना करण्याबाबतची आमची गेल्या कित्येक दिवसांपासूनची मागणी प्रलंबित आहे. जनगणना हा विषय केंद्रशासनाशी संबंधित आहे.मात्र इतर मागासवर्गाची स्वतंत्र जनगणना करण्यासाठी केंद्रसरकारने असमर्थता व्यक्त केली आहे. त्यामुळे राज्यशासनाने बिहार सरकारप्रमाणे ओबीसींची स्वतंत्र जनगणना करावी असे म्हटले आहे. देशातील अनुसुचित जाती व जमातींची जातवार जनगणना गेली दीडशे वर्षे होत आलेली आहे. त्या माहितीच्या आधारे या वर्गाच्या विकास योजना, कल्याणकरी कार्यक्रम आणि आर्थिक तरतुद केली जाते. नागरिकांचा मागासवर्ग म्हणजेच इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विमाप्र यांच्यासाठी मंडल आयोगाने १९८० मध्ये



केलेल्या शिफारशींनुसार देशात हा तिसरा मागासवर्ग अस्तित्वात आला. मात्र त्याला घटनात्मक संरक्षण पुरवताना दरवेळी जनगणना नसल्याने लोकसंख्या माहित नसल्याचे कारण पुढे येते. ब्रिटिशांनी भारत जिंकला तेव्हा पहिले काम केले ते म्हणजे दर १० वर्षांनी त्यांनी जातनिहाय जनगणना सुरू केली. ज्यांच्यावर राज्य करायचे त्यांचा अभ्यास करण्यासाठी जनगणना आवश्यक आहे, असे त्यांना वाटले. १८७१ ते १९३१ अशी साठ वर्षे हे काम नियमितपणे होत असे. १९४१ च्या महायुद्धात हे काम विस्कळीत झाले. स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने फक्त अनुसुचित जाती व जमाती यांची जातनिहाय तर इतर सर्वांची एकत्रित गणना करण्याचे धोरण स्विकारले. यातुन मागासवर्गीय ओबीसी वंचित राहिले असल्याचे छगन भुजबळ यांनी म्हटले आहे.

सन १९४६ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्या "शूद्र पूर्वी कोण होते ?" या ओबीसी विषयक पुस्तकात ओबीसी जनगणनेची मागणी केली. ओबीसींच्या अडीअडचणी कळण्यासाठी ती गरजेची आहे असे त्यांनी लिहिले. पहिल्या राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाने (कालेलकर कमिशन) १९५५ साली स्वतंत्र ओबीसी जनगणनेची मागणी केली. सन १९८० साली दुसऱ्या राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाने (मंडल आयोग) स्वतंत्र ओबीसी जनगणनेची पुन्हा शिफारस केली असल्याचेही छगन भुजबळ यांनी म्हटले आहे. सन १९९४ साली केंद्रसरकारने नियुक्त केलेल्या राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाने ओबीसी जनगणना कशी आवश्यक आहे ते सरकारला तिसऱ्यांदा पटवून दिले.२०१० च्या ५ मे ला संसदेत राष्ट्रवादीचे नाशिकचे तत्कालीन संसद सदस्य समीर भुजबळ, स्व.गोपीनाथराव मुंडे यांचेसह १०० खासदारांनी ओबीसी जनगणनेचा ठराव केला. त्यासाठी मी स्वतः आदरणीय शरद पवारसाहेब यांच्या नेतृत्वाखाली सर्वपक्षीय प्रयत्न केले होते. त्यातुन २०११ ते २०१४ मध्ये केंद्राने सामाजिक व आर्थिक जातगणना (SECC २०११) केली. मात्र त्याची आकडेवारी राज्यांना दिली नाही असेही छगन भुजबळ यांनी पत्रात म्हटले आहे.




# सुनील तटकरे यांची भाषणे विधिमंडळाच्या दस्तऐवजातून इतिहासाचा भाग झालाय

## अजित पवार : खासदार सुनिल तटकरे यांच्या 'अभिनंदन... अभिवादन' या पुस्तकाचे प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** सुनील तटकरे यांची ती भाषणे विधीमंडळाच्या दस्ताऐवजातून इतिहासाचा एक भाग झालेले आहे. त्यांच्या भाषणातून भावी पिढ्यांना त्याचा अभ्यास करता येणार आहे अशा शब्दात विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी सुनील तटकरे यांच्या कार्याचे कौतुक केले. राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय सरचिटणीस खासदार सुनिल तटकरे यांच्या 'अभिनंदन... अभिवादन' या पुस्तकाचे प्रकाशन आज यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई येथे पार पडले त्यावेळी अजित पवार यांनी सुनील तटकरे यांच्या नेतृत्वाचे कर्तृत्वाचे कौतुक केले. तटकरे कोकणातील आहेत. कोकणातील लोकांना गोष्टी ऐकायला आणि सांगायला फार आवडतात. कोकणी माणसांचा गोष्टी वेल्हाळपणा तटकरे यांनी पुरेपूर उचलला आहे. विधीमंडळ किंवा विधीमंडळाच्या बाहेरची भाषणे ऐकल्यावर त्यांच्या ज्ञानाची, गुणांची, नेतृत्व, कर्तृत्व आणि वक्तृत्व याची सगळ्यांना खात्री पटते. साहेबांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त विधीमंडळातील भाषण ऐकले तर माझ्यासारख्या अनेकांच्या लक्षात आले की, त्यांच्या हातामध्ये कागदाची एक चिठ्ठी न घेता तासभर ओघवतं भाषण करण्याची त्यांची शैली आहे. पवारसाहेबांच्या जीवनातील अनेक प्रसंग त्यांनी सांगितले ते उभ्या महाराष्ट्राने पाहिले असेही अजित पवार म्हणाले. लोकसभेचे खासदार आणि राष्ट्रीय सरचिटणीस सुनील तटकरे यांनी त्यांच्या मंत्री पदाच्या व आमदार पदाच्या काळात विधीमंडळात केलेल्या निवडक व अतिशय भावस्पर्शी भाषणांचे संकलन 'अभिनंदन... अभिवादन' या पुस्तकाच्यारुपाने प्रकाशन आदरणीय पवारसाहेबांच्या हस्ते होणार होते मात्र पवारसाहेबांच्या डोळ्यांचे ऑपरेशन असल्याने आज त्यांना ॲडमिट व्हायचे असल्याने ते उपस्थित राहू शकले शकले नाहीत.

# संत महंतांकडून सांप्रदायिक एकतेचा संदेश!

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** संत महतांकडून संप्रदायिक एकतेचा संदेश देत आज भाविकांच्या प्रचंड उपस्थितीत लाडगाव (ता. औरंगाबाद) येथे तीन दिवसीय महाचिंतनी सोहळ्याची सुरुवात झाली. प.पू. बाबुळगावकर शास्त्री हे या महाचिंतनीचे मुख्य आयोजक असून महाचिंतनीचे हे २६ वे वर्ष आहे. यावर्षीचा महाचिंतनी सोहळा लाडगाव येथे दिनांक ९ ते ११ जानेवारी २०२३ दरम्यान संपन्न होत आहे. आज सकाळी आठ वाजता श्रीकृष्ण स्नान, गीतापठनाने सुरुवात झाली. ज्येष्ठ साहित्यिक बाबा भांड यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. दीप प्रज्वलन स्वामी रामेश्वरानंद सरस्वती यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महंत सेंगराजदादा बिडकर हे होते तर आ. डॉ. कल्याणराव काळे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रस्ताविकात महंत सुदाम शास्त्री यांनी तीन दिवसीय कार्यक्रमाची रूपरेषा सांगितली. यावेळी बोलताना उद्घाटक स्वामी रामेश्वरानंद सरस्वती यांनी सांगितले की, भारतीय संस्कृतीत विविधता असली तरी एकता आहे. सांप्रदायिक भेदभाव नष्ट करून एकतेचा संदेश समाजात जाणे आवश्यक असल्याचे सांगितले. एकनिष्ठ आणि नवविधा भक्तीचे महत्त्व सांगितले. संतांच्या जीवनात प्रेम, ईश्वरभक्ती आणि एकतेचे अधिष्ठान असले पाहिजे. समाजातील वितूष्टपणा नष्ट करणे आणि सामाजिक एकतेचा संदेश देणे हेच उद्दिष्ट आणि अधिष्ठान असले पाहिजे असे सांगितले. यावेळी महाचिंतनीचे संस्थापक जनक प.पू. महंत शास्त्रीबाबा लिखित गृहगीता, स्वयंपाकघर, श्री गोविंद प्रभू आणि कथा एका गुरुमाईची या चार पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. सर्व प्रश्नांचे उत्तर श्रीकृष्णांच्या चरित्रात! दुपारच्या सत्रात करुणांचा श्रीकृष्ण या विषयावर महंत संदीपराज दादा कपाटे आणि गीतेतील दैवी गुण या विषयावर महंत मानसशास्त्री यांनी निरूपण केले. जीवनातील सर्व प्रश्नांचे उत्तर हे श्रीकृष्णांच्या चरित्रातून मिळते. श्रीकृष्णांचे बालपण तरुणपण आणि एकूण जीवनच मार्गदर्शक आहे. तरुणांना आपले जीवन सार्थकी आणि यशस्वी करायचे असेल तर श्रीकृष्ण आणि त्यांची भगवद्गीता वाचली पाहिजे.






# दादासाहेब घोडके यांना मुख्यमंत्र्यांच्या हस्ते राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** येथील अधुनिक केसरीचे दादासाहेब घोडके यांनी शहरातील संत ज्ञानेश्वर उद्यान तसेच तिर्थक्षेत्र आपेगाव संदर्भात पत्रकारितेच्या माध्यमातून सातत्याने लिखाण करून अनेक प्रश्न मार्गी लावले.त्याची दखल घेत अप्रतिम मीडीयाचा चौथास्तंभ विकास पत्रकारिता पुरस्कार नुकताच त्यांना घोषित झाला. त्याचे वितरण दर्पण पत्रकार दिनी मुंबई येथे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या हस्ते दादासाहेब घोडके यांना चौथास्तंभाचा मानाचा राज्यस्तरीय पुरस्कार देण्यात आला. यशवंतराव चव्हाण सेंटर येथे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी सिने अभिनेते व निर्माते मंगेश देसाई, विधिमंडळ व मंत्रालय वार्ताहर संघाचे अध्यक्ष मंदार पारकर, तसेच विशेष गौरवमूर्ती एमएस आरडीसीचे उपाध्यक्ष व कार्यकारी संचालक राधेश्याम मोपलवार, अतिरिक्त मुख्य सचिव नंदकुमार, विठ्ठल साखर कारखान्याचे प्रवर्तक अभिजीत पाटील, निमंत्रक विवेक देशपांडे आदीची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सयोजन विवेक देशपांडे, अप्रतिम मीडीयाचे संचालक डॉ.अनिल फळे यांनी केले होते. सूत्रसंचालन सपना शेटे यांनी केले.



नवीन वर्षाचा संकल्प करा
आरोग्याची काळजी हा मंत्र खरा

- घाऊक आणि किरकोळ
- किराणा, सुका मेवा, मसाले
- क्रॉकरी, घरगुती उपकरणे
- प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही
- घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि ॲल्युमिनियम

शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट

महावीर
घर संसार



सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, औरंगाबाद

## मोदींचा 'हा' आदर्श घ्या

आधुनिक केसरी

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे २०१४ साली सत्तेत आल्यापासून जगभरात त्यांच्याविषयी चर्चा होत असते. पहिल्यांदा शपथ घेतल्यापासून ते आजतागायत मोदींचे परदेश दौरे अनेकदा चर्चेचा विषय ठरले आहेत. सतत परदेश वाऱ्यांमुळे विरोधक त्यांच्यावर टीका करत असतात. या परदेश दौऱ्यातून देशाच्या तिजोरीवर आर्थिक भार पडत असल्याचेही विरोधक सांगत असतात. भाजपा आणि स्वतः मोदींनी या आरोपांना फार महत्त्व दिले नाही. उलट मोदीजी दिवसांचे १८ तास काम करत असल्याचा प्रचार भाजपाकडून केला जातो. एवढे तास काम करुनही पंतप्रधान मोदी या वयात आजारी पडले तर त्यांचा उपचाराचा खर्च कोण करते? असा प्रश्न पडणे स्वाभाविक आहे. पुण्यातील आरटीआय कार्यकर्ते प्रफुल्ल सारडा यांना देखील हा प्रश्न पडला आणि त्यांनी सरळ पंतप्रधान कार्यालयात माहितीच्या अधिकाराखाली माहिती मागितली. देशाचे पंतप्रधान हे देशात आणि परदेशात दौऱ्यावर असताना त्यांच्या वैद्यकीय उपचाराचा खर्च कुणाकडून केला जातो? असा प्रश्न आरटीआयद्वारे विचारला गेला. यावर उत्तर देत असताना पंतप्रधान कार्यालयाने स्पष्ट केले की, २०१४ पासून आतापर्यंत मोदींच्या वैद्यकीय खर्चापोटी पंतप्रधान कार्यालयाने एकही रुपया खर्च केलेला नाही. खरंतर आपल्याकडे खासदार आणि केंद्रीय मंत्र्यांना अनेक सोयी-सुविधा पुरविल्या जातात. पंतप्रधानांना देखील अनेक सुविधा योजलेल्या आहेत. तरिही मोदींनी आतापर्यंत स्वतःचा वैद्यकीय खर्च स्वतःच केला आहे. सरकारच्या तिजोरीतून आजवर एकही रुपया खर्च झालेला नाही.पंतप्रधान कार्यालयातील सचिव विनोद बिहारी सिंह यांनी प्रफुल्ल सारडा यांच्या या आरटीआय अर्जाला उत्तर देताना सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वैयक्तिक वैद्यकीय उपचारासाठी सरकारने तरतूद केलेली असते. मात्र याचा विनियोग आजवर करण्याची वेळ आलेली नाही. पंतप्रधान कार्यालयातील माहितीनुसार मोदींवर उपचारासाठी आजवर खर्च झालेला नाही., असेही त्यांनी कळविले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी फिट इंडिया चळवळीतून देशभरातील नागरिकांना उत्तम आरोग्याचा मंत्र दिला होता. आता त्यांनी स्वतःच्या उपचाराचा खर्च स्वतःच करुन देशातील १३५ कोटी नागरिकांना एक नवी प्रेरणा दिली आहे, अशी प्रतिक्रिया आरटीआय कार्यकर्ते प्रफुल्ल सारडा यांनी दिली. लोकांच्या कष्टाचा पैसा कर रुपातून सरकारकडे जात असतो. अशावेळी पंतप्रधान याचा वापर वैयक्तिक कामांसाठी वापर करत नाहीत, हा विश्वास आता आणखी दृढ झाला आहे. इतर खासदार आणि आमदारांनी देखील मोदींचा हा मार्ग स्वीकारला पाहीजे आणि त्यांचे वैयक्तिक खर्च स्वतःच्या पैशांतून करायला हवेत, असेही सारडा यांनी सांगितले.

## उघडले दार स्वर्गाचे

आधुनिक केसरी



डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

**यू जी सी ने आता परदेशी विद्यापीठांना आपल्या देशात प्रवेशासाठी दारे खुली केली आहेत. त्यासाठी काही निकष देखील जाहीर केले आहेत. यापूर्वी देशांतर्गत खाजगी विद्यापीठे,मुक्त विद्यापीठे,स्वायत्त विद्यापीठे, राज्य स्तरावरील स्वतंत्र खाजगी विद्यापीठे असे प्रयोग झाले आहेत? शिक्षण जास्तीत जास्त गरजू विद्यार्थ्या पर्यंत पोहोचावे, शिक्षण गुणवत्ता पूर्ण,दर्जेदार व्हावे यासाठीच ही पावले कालानुरूप सरकारने उचलली आहेत.त्यामागचे उद्दिष्ट अर्थातच चांगले. पण केवळ उद्दिष्ट चांगले असून चालत नाही. त्यासाठी अमलात येणारी कार्य पद्धतीत देखील गुणवत्ता हवी. दर्जा हवा.**

खाजगी करणाने स्पर्धा वाढेल,गुणवत्ता वाढेल हा अंदाज प्रायव्हेट इंजिनीअरिंग मेडिकल कॉलेजेस नी चुकीचा ठरविला आहे. गवता सारखं वाढलेलं हे पीक किती कमकुवत आहे हे आपण बघतोच. ही कॉलेजेस, राजकारणी धंदेवाईक पुढाऱ्यांच्या हाती गेलीत, त्यांनी पिढ्यान् पिढ्यांना पुरेल अशी संपत्ती गोळा केली मोठमोठ्या जाहिराती, डेटा मॅनेज करून, तज्ज्ञांना खुश करून मिळविलेल्या ग्रेड्स, नामांकन, असा हा खुला व्यापार आहे.देशात एन आय टी,आय आय टी ट्रिपल आय टी यांची संख्या वाढली. पण दर्जाचे काय. काही तुरळक अपवाद आहेत दर्जा टिकवणारे. बाकी सारा आनंदी आनंद आहे.जागतिक मानांकनात पहिले शंभर सोडा, पहिल्या ५०० त यापैकी किती आहेत शोधावे लागेल.

यात आता परदेशी विद्यापीठाची भर पडणार. मुलांना आता परदेशी जावे लागणार नाही, प्रवास, हॉस्टेलचा खर्च वाचेल,हे पालकांसाठी ठीक.आधी घरच्यांची दारच्याशी स्पर्धा होती.आता बाहेरचे घरात आले. त्यामुळे घरातल्या घरात स्पर्धा वाढेल.कदाचित एन.आय.टी, आय.आय.टी., तत्सम चांगल्या संस्थेतले उत्तम शिक्षक वाढीव पॅकेजच्या मोहाने या आयात केलेल्या विद्यापीठात जातील.आधीच कमी असलेली उत्तम दर्जेदार शिक्षकाची संख्या आणखीन कमी होईल. त्यापेक्षा आपलेच देशी शिक्षण जागतिक दर्जाचे कसे होईल यासाठी जोमाने, काल सापेक्ष, प्रयत्न का होत नाहीत? नवे उत्तम शैक्षणीक धोरण २०२० का आले. पण दोन वर्षे जाऊनही त्याची कुठे, किती अम्मल बजावणी झाली? मी अनेक विद्यापीठात,स्वायत्त कॉलेजात चौकशी केली. वरून ऑर्डर नाही,आम्हाला कसल्याही सूचना नाहीत असे हात झटकणारे उत्तर मिळते.तेव्हा ही विद्यापीठे खाजगी, स्वतंत्र असूनही, कॉलेजेस स्वायत्त असूनही कुणाच्या ऑर्डरची कशासाठी वाट बघतात हे मला तरी समजलेले नाही!

आज नव्या पाटी वर कोरा अध्याय लिहिण्याची गरज आहे. त्यासाठी शिक्षण संस्था चालक,प्राध्यापक,विभाग प्रमुख, डायरेक्टर, कुलगुरू यांना मेहनत करावी लागेल.नवनवीन अभ्यासक्रम आखणे, भविष्याच्या गरजा ओळखून शिक्षण पद्धतीत अमुलाग्र बदल करणे, मुल्यांकन पद्धती अधिक पारदर्शी, ताण विरहित होईल यासाठी प्रयत्न करणे, संशोधन, कृतीवर आधारित प्रयोग, कौशल्य विकास, सॉफ्ट स्किल्स, भाषा ज्ञान, आंतर शाखीय शिक्षण..असे अनेक परिमाण आहेत ज्यांच्या वर काम करावे लागेल. मेहनत घ्यावी लागेल. अन् तिथेच प्रॉब्लेम आहे.सगळे जण वाट बघतात मांजराच्या गळ्यात घंटा कोण बांधणार याची? तसे काही प्रामाणिक प्रयत्न मोजक्या व्यक्ती, मोजक्या संस्था करताहेत. पण अशा धाडसी नावीन्य पूर्ण प्रयोगाची संख्या अगदीच मर्यादित आहे.

या परदेशी विद्यापीठात आपले संवैधानिक आरक्षण नसणार.ते कितीही शुल्क आकारू शकतील. त्यांच्यावर कुणाचा अंकुश नसणार. नावाला वार्षिक अहवाल सादर केला की झाले. ह्या भारतातील आयात पदव्यांचा, मूल्यांकनाचा, अभ्यासक्रमाचा दर्जा अन् त्या विद्यापीठाचा त्याच्या मूळ देशातील दर्जा समकक्ष ON PAR असेल का याबाबत शंका आहे. आपल्या ला मिळणारी परदेशी शस्तात्रे अन् त्या देशातील त्याच्यासाठी निर्माण केली जाणारी शस्त्रे यात जो फरक असतो, तोच इथेही राहणार हे निश्चित. आपल्या कडील खाजगी शाळा कॉलेजात,स्वायत्त खाजगी विद्यापीठात दुप्पट तिप्पट शुल्क आकारले जाते. म्हणून दर्जाची, गुणवत्तेची खात्री असते असे सांगता येईल का? मुळीच नाही. आजकाल खाजगी शाळा दुसरी तिसरी(के जी) साठी सुध्दा लाखो रुपये शुल्क आकारतात.अन् आपले शहाणे पालक तो खर्च आनंदाने ( ?) करतात देखील. त्यापेक्षा सरकारी शाळा, कॉलेजेस विद्यापीठे यांचा दर्जा वाढविण्याकडे लक्ष दिले तर? बाहेरून विद्यापीठे आयात करण्याची गरज भासणार नाही. (यात आंतर राष्ट्रीय करार, परदेश नीती हे सामील असेल तर प्रश्न वेगळा). आपले शिक्षण, आपले अभ्यासक्रम वाईट मुळीच नाहीत. कारण आपले विद्यार्थी बाहेर जाऊन चांगले काम करतात.स्पर्धेत टिकतात.उत्तम संशोधन करतात.पण हे सारे बाहेर जाऊन..इथे का नाही? तर या प्रश्नावर, वर्क कल्चर, इथले वातावरण, इथले नीती नियम,इथला भ्रष्टाचार, ही कारणे दिली जातात. मग हे जर खरे असेल तर मूळ रोगावर उपचार करण्या ऐवजी आपण दुसरेच इंजेक्शन का घेतोय टोचायला? आधी स्वतःच्या घराची डागडुजी करा, स्वतःचे घर स्वच्छ करा, मग पाहुण्यांना बोलवा. इंग्रजाच्या गुलामीचे परिणाम




अजूनही इथे तिथे आपण भोगतो आहोतच की! मुळातच शिक्षण ही अत्यंत गांभीर्याने घेण्याची गोष्ट आहे हे आपण (म्हणजे आपलं सरकार) विसरलो आहोत. विकासाच्या, बजेटच्या यादीत ती दुर्दैवाने लास्ट प्रायोरिटी असते. (शिक्षण मंत्री व्हायला कुणी फारसे उत्सुक नसतात असे ऐकतो). शिक्षण ही पहिली प्रायोरिटी हवी. त्यासाठी पुन्हा महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, नई तालीम ची दीक्षा देणारे गांधीजी, सुंदर शालेय पुस्तके (सहजपाठ) लिहिणारे,शांती निकेतन कार ट्यागोर, सुधारक आगरकर यांना जन्म घ्यावा लागेल! कारण मुळातच आपली संस्कृती श्रीमंत आहे, जमीन सुपीक आहे. आपण कुठे, केव्हा, कोणते, कसे बीजारोपण करतो यावर सारे काही अवलंबून आहे. बाहेरच्या विद्यापीठा साठी तोरण बांधण्या बरोबर आपली विद्यापीठ बाहेर कशी नावाजली जातील हे पाहणे जास्त गरजेचे.

## आता मशिनद्वारे बाळं जन्माला येतील !

आधुनिक केसरी



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

**प्रत्येक आईसाठी प्रसूतीची वेळ खूप कठीण असते. प्रसूती वेदना इतक्या वेगाने वाढतात की महिला त्रस्त असतात. या वेदनांची तुलना इतर कोणत्याही वेदनांशी होऊ शकत नाही. असे मानले जाते की मानवी शरीरात फक्त ४५ डेल युनिट्सपर्यंत वेदना सहन करण्याची शक्ती असते, परंतु मुलाला जन्म देताना आईला ५७ डेल युनिट्सपर्यंत वेदना होऊ शकते. योग्य शब्दात सांगायचे तर, मुलाला जन्म देताना, एकाच वेळी सुमारे २०० हाडे तुटण्याएवढी वेदना होते.**

**मशिनद्वारे बाळं जन्माला येतील**

याचे योग्य कारण म्हणजे नॉर्मल डिलिव्हरीच्या त्रासाला मागे टाकून मातांनी सी-सेक्शनचा पर्याय खुल्या मनाने स्वीकारण्यास सुरुवात केली आहे कारण या काळात कोणतीही वेदना सहन करावी लागत नाही. दरम्यान, अशा बातम्या समोर आल्या आहेत, ज्या ऐकून गर्भधारणेच्या नावानेही घाबरलेल्या महिलांना दिलासा मिळणार आहे. काही काळासाठी पोटात मूल वाढवण्याचे प्रकरण संपणार, आता यंत्राद्वारे मुले जन्माला येणार आहेत.

तुम्ही कधी विचार केला आहे की मुले निर्माण करण्याचा कारखाना असू शकतो . हा कारखानाही असा आहे की त्यातून एका वर्षात ३०,००० मुले तयार होतात. कदाचित नाही!, पण आता तुम्ही त्याची कल्पना करू शकता आणि ते खरे होताना पाहू शकता. बायोटेक्नॉलॉजिस्ट आणि सायन्स कम्युनिकेटर हाशेम अल-घैली यांनी हा दावा केला आहे. त्याने यूट्यूबवर एक व्हिडिओ शेअर केला आहे जो यूट्यूबवर 'ECTOLIFE: WORLD'S FIRST ARTIFICIAL INSEMINATION FACILITY' या शीर्षकाचा ट्रेंड करत आहे. या व्हिडिओमध्ये असा दावा करण्यात आला आहे की, आता मुलाला जन्म देण्यासाठी आईच्या गर्भाची गरज भासणार नाही. हे काम आता 'बेबी पॉड' करणार, नऊ महिन्यांनी स्विच दाबून मुलं होतील. कंपनी बेबी पॉड्स बसवण्याचे काम करणार आहे, ज्याचे नाव ॲक्टोलाइफ आहे.

**कृत्रिम गर्भ बनवणारी पहिली कंपनी**

खरं तर, नुकतेच ऍक्टोलाइफ नावाच्या कंपनीने कृत्रिम गर्भाच्या माध्यमातून मुलांना जन्म देणार असल्याचा दावा केला आहे. यामध्ये महिलांना गर्भवती होण्याची गरज नाही, प्रसूतीदरम्यान होणारा त्रासही सहन करावा लागणार नाही. एवढेच नाही तर तुम्हाला कोणत्या प्रकारचे मूल हवे आहे, फक्त त्याची जीन्स बदलून तुम्ही ते बदलू शकता, असा दावाही केला जात आहे.

**पुश बटण तंत्रज्ञानाने बाळ जन्माला येईल**

या तंत्रज्ञानाचे पूर्ण नाव आर्टिफिशियल यूटरस फॅसिलिटी आहे, ते जगातील पहिल्या कृत्रिम गर्भाप्रमाणे काम करेल असा दावा केला जात आहे. ॲक्टोलाइफनावाची सुविधा दरवर्षी ३०,०००पर्यंत 'उत्पादन' करण्याचा दावा करते. या संदर्भात येमेनी मॉलिक्युलर बायोटेक्नॉलॉजिस्ट हाशेम अल-घैली यांनी एक ॲनिमेशन व्हिडिओ प्रसिद्ध केला आहे, भविष्यात पुश बटन तंत्रज्ञानाने मुले कशी जन्माला येतील.

**मुलामध्ये बदल होऊ शकतो**

या व्हिडिओमध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, वंध्य ॲक्टोलाइफ मूल होण्यास आणि त्यांच्या मुलाचे खरे पालक बनण्याची परवानगी देते. तसेच कर्करोग किंवा इतर गुंतागुंतीमुळे शस्त्रक्रियेद्वारे गर्भाशय काढून टाकलेल्या महिलांसाठी हा एक उपाय आहे. या सुविधेत ७५ प्रयोगशाळा आहेत. प्रयोगशाळेत ४०० शेंगा आहेत जे कृत्रिम गर्भाशय वाढवण्यास सक्षम आहेत. मातेच्या गर्भाशयाच्या आतील परिस्थितीची नक्कल करण्यासाठी आणि न जन्मलेल्या मुलाशी जुळवून घेण्यासाठी शेंगा तयार केल्या गेल्या आहेत.

**बाळाच्या अवयवांचे निरीक्षण केले जाईल**

बाळाच्या महत्त्वाच्या लक्षणांवर लक्ष ठेवण्यासाठी ग्रोथ पॉडमध्ये सेन्सर स्थापित केले आहेत - त्वचा, नाडी, तापमान, हृदयाचे ठोके, ऑक्सिजन पातळी, रक्तदाब, श्वासोच्छवासाची गती, हृदय, मेंदू, मूत्रपिंड, यकृत आणि शरीराचे इतर अवयव वास्तविक वेळेत. याशिवाय, पालकांना मुलांचा प्रत्यक्ष अनुभव देण्यासाठी एक ॲप तयार करण्यात आले आहे, ज्यामध्ये ते सर्व काही थेट पाहू शकतात, मुलाची वाढ कशी होते आहे.

**व्हिडिओमध्ये अनेक दावे करण्यात आले आहेत**

यासह, ग्रोथ पॉड्समध्ये सेन्सर देखील असतील जे बाळाच्या हृदयाचे ठोके, रक्तदाब, श्वासोच्छवासाची गती आणि ऑक्सिजन संपृक्तता यासारख्या महत्त्वाच्या लक्षणांवर लक्ष ठेवतील. व्हिडिओमध्ये असा दावा करण्यात आला आहे की अशा गर्भावर कोणत्याही संभाव्य अनुवांशिक विकृतींचे परीक्षण केले जाऊ शकते. या शेंगांमध्ये दररोज, दर आठवड्याला आणि वाढीनुसार पोषक तत्त्वे जोडली जातील. असे अनुवांशिक बदल घडवून आणले जाऊ शकतात जेणेकरुन तुम्हाला तुमचे इच्छित मूल मिळू शकेल.

**कृत्रिम गर्भाशय हे आईच्या पोटासारखे असते**

कंपनीचा दावा आहे की या तंत्रज्ञानाद्वारे मूल संसर्गमुक्त जन्माला येते. अशा परिस्थितीत, एक महिला तिच्या जीवनशैलीचे पालन करून आई बनण्यास सक्षम असेल. यामध्ये कोणीही कोणत्याही प्रकारच्या वादात पडू नये. ॲक्टोलाइफकडे उच्च उपकरणे असलेल्या ७५ लॅब असल्याचे सांगण्यात येत आहे. प्रत्येक पॉडची रचना अगदी आईच्या पोटातील गर्भाशयासारखी असते. या शेंगांना कृत्रिम गर्भाशय म्हटले जाते कारण ते मुलांना आईच्या गर्भाचा अनुभव देते. हाशेम अल घैलीच्या या दाव्यांनंतर, व्हिडिओ आणि फोटोंनंतर या संकल्पनेवर वाद निर्माण झाला आहे. ॲक्टोलाइफकडे पहिले कृत्रिम गर्भ केंद्र म्हणून पाहिले जात आहे. परंतु यामुळे गर्भधारणेच्या नैतिक संकल्पनेला हानी पोहोचत आहे. अशा प्रकारे जन्माच्या शेंगांमध्ये मुलांना जन्म देणे मानवतेच्या विरोधात आहे.

पारदर्शक शेंगांमध्ये ठेवलेली मुले पाहून येथे लहान मुलांची लागवड होत असल्याचे दिसते. तर, हाशेम म्हणत आहे की ही एक संकल्पना आहे. याबाबत कोणीही काळजी करण्याची गरज नाही. मात्र, कृत्रिम भ्रूण विकसित करण्याचे तंत्रज्ञान विकसित होत आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# अशाने देश विज्ञान क्षेत्रात भरारी कसा घेणार ?



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**अलीकडेच नागपुरात पार पडलेल्या विज्ञानविश्वातील सर्वांत मोठ्या उपक्रमाला म्हणजेच भारतीय विज्ञान काँग्रेसच्या वाट्याला दुर्लक्षच आले. सत्ताधारी, राजकारणी असो किंवा विज्ञान संशोधन क्षेत्रातील मातब्बर मंडळी याकडे फिरकलेसुद्धा नाहीत. कोरोनामुळे आभासी उपस्थितीचं नवं फॅड आलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या काँग्रेसला याच पद्धतीने उपस्थिती दाखवली.देशातील विज्ञान आणि तंत्रज्ञानाची दिशा निश्चित करण्यासाठी काही ठोस कार्यक्रम देण्यात अपयशी ठरले. महत्त्वाचे म्हणजे अत्याधुनिक संशोधन आणि देशाच्या विज्ञानजगताला ठोस कार्यक्रम देण्यात ही विज्ञान काँग्रेस अपयशी ठरली आहे.**

राजाश्रयाबरोबरच विज्ञान काँग्रेसला लोकाश्रयाची गरज असून, विज्ञानाला जनमानसात पोचविणाऱ्या या महा-उत्सवाला अस्ताचं ग्रहण लागलं आहे की काय असं वाटायला लागलं आहे. तसं झालं तर देशाच्या भवितव्यासाठी ते योग्य ठरणार नाही. पंतप्रधान मोदी यांनी भारतीय शास्त्रज्ञांना देशाच्या गरजा ओळखून संशोधन करण्याचं आवाहन केलं आहे. देशाच्या अमृतकाळातील विकासासाठी विज्ञानजगताची मोठी भूमिका असल्याचे गौरवोद्‌गार काढले. मात्र तेही वैज्ञानिक जगताला दीर्घकालीन व्यापक आणि सर्वंकष दृष्टिकोन देऊ शकले नाहीत. केवळ 'इनोव्हेशन' मधील क्रमवारी सुधारली म्हणजे देशात वैज्ञानिक प्रगती झाली, असं म्हणता येणार नाही. मूलभूत विज्ञानातील संशोधनाचा अभाव , सुविधांची वानवा , नव्या संधीच्या कमतरता आणि नवीन शैक्षणिक धोरणाबद्दल काहीच व्यक्त करण्यात आलं नाही. याशिवाय देश म्हणून आपल्या संशोधनातील उपलब्धीबद्दलही फारशी चर्चा झाली नाही. विविध चर्चासत्रांमध्ये विषयांच्या वैविध्याचा आणि नाविन्याचा अभाव पाहायला मिळाला. संपूर्ण आयोजनामध्ये देशभरातील आघाडीच्या शास्त्रज्ञांचा सहभाग कमी दिसला. खरंतर वादाची पार्श्वभूमी आणि उपयोजनशून्यतेमुळे आघाडीचे शास्त्रज्ञ विज्ञान काँग्रेसकडे पाठ फिरवत असल्याचं अनेक वर्षांपासून बोललं जात आहे.त्याची काहीशी प्रचिती या वेळी आली. एका मेळाव्याच्या पलीकडे विज्ञान काँग्रेस ठोस काही देण्यात अपयशी ठरत असल्याने वर्षागणिक मातब्बर शास्त्रज्ञांचा ओढा कमी झाला आहे. पर्यायाने कटिंग एड्ज संशोधन, भविष्यकालीन आव्हानं, संशोधनाच्या नव्या संधी आणि कृती कार्यक्रमातील प्रगल्भता लोप पावत आहे. दिवसेंदिवस राजकीय नेतृत्व विज्ञानाबद्दल प्रचंड अनास्था दाखवत असून, त्याची प्रचिती विज्ञान काँग्रेसच्या निमित्ताने आली. संपूर्ण मानवजातीच्याच प्रगतीचा अविभाज्य घटक हा विज्ञान असतानाही, राजकीय आणि सामाजिक नेतृत्व याकडे कमालीचं दुर्लक्ष करत असून, आत्मनिर्भर होऊ पाहणाऱ्या भारतासाठी निश्चितच हे भूषणावह नाही.अशाने देश विज्ञान क्षेत्रात प्रगती कशी साधणार? संशोधनासाठी निधीचा कमतरता नेहमीच असते. सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या (जीडीपी) तुलनेत आपण फार कमी खर्च संशोधनावर करतो. अमेरिका, चीनसारखे देश दोन टक्क्यांवर खर्च करतात. एखाद्या विषयाचा पुर्वी देशात एखादा दुसरा शास्त्रज्ञ असायचा, त्यामुळे विचारांची देवाणघेवाण, नवकल्पना आणि परस्पर सहकार्य यांचा अभाव होता. अशा चर्चेतूनच विज्ञान पुढे जातंय. याबाबत अमेरिका आणि युरोपातील शास्त्रज्ञांप्रमाणे आपणही परस्पर सहकार्य आणि चर्चेतून संशोधन पुढे न्यायला हवे.

डॉ. सी. व्ही. रमण यांच्या रूपाने देशातच काम केलेल्या पहिल्या शास्त्रज्ञाला नोबेल मिळाले. त्यानंतर अजूनही भारतात राहून संशोधन करणाऱ्या शास्त्रज्ञांना नोबेल मिळालेले नाही. त्या दिशेने प्रवास सुरू आहे. परंतु पुरेसे प्रोत्साहन हवे आहे. प्रयोगांसाठी निधीपासून शिक्षणातील मूलभूत बदलांपर्यंत आपल्याला काम करावे लागेल. संशोधनात पुर्वीपासून पैसे कमी मिळतात, पण मानसन्मान खूप होता. जनमानसात प्राध्यापक, शिक्षक आणि संशोधक यांना आदराचे स्थान होते. आता कुठेतरी ते कमी झाल्यासारखे वाटते. सर्वच हुशार विद्यार्थ्यांचा संशोधनाकडे कल असेलच असे नाही. संशोधनातल्या संधी, निधीची




उपलब्धता हा प्रश्न आहेच. आता मोठ्या पॅकेजची नोकरी हीच विद्यार्थ्यांसह शिक्षणव्यवस्थेची आणि समाजाची भूमिका आहे. त्यामुळे सध्या संशोधनाचे गणित बिघडलंय, तरीही देशातील काही भागांमध्ये वैज्ञानिकांची परंपरा निर्माण होते, हे आशादायक चित्र आहे. मूलभूत विज्ञानाचा नवनीतम संशोधनाशी संबंध विद्यार्थ्यांना स्पष्ट केला पाहिजे. संशोधनासाठी निधी हवाच पण विज्ञानाला लोकसन्मानही पाहिजे. विज्ञानात रुची निर्माण करणाऱ्या शिक्षण व्यवस्थेचा पाया रचावा लागेल. संशोधकांनीही 'कटिंग एज' म्हणजे नवीनतम संशोधनात स्वतःला गुंतवावे. तेव्हा कुठे आपण नोबेलविजेत्या संशोधनाकडे वाटचाल करू. राजकारण्यांच्या बातम्यांचा रतीब घालणाऱ्या टीव्ही चॅनेलवाल्यांनी देखील स्वतःच्या टीआरपी बरोबरच देशाचा विकास लक्षात घेऊन आजचा युवक विज्ञानाकडे कसा आकर्षित होईल, यासाठी काही कार्यक्रम द्यावेत.

# माणसामधील माणूस कमकुवत होत आहे




विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**हल्ली टिव्ही आणि वर्तमानपत्रील बातम्या बघुन वाचुन पुरुष अस्वस्थच झाले नाही तर मानसिक तणावामुळे खचून गेले आहेत. ग्रामीण भागातील कमी शिकलेले लोक बोलत आहेत कोरोना महामारी नाही. परंतु कोरोना च्या भितीनी आणि चुकीच्या नितीने देशाचे खुप मोठे नुकसान तर झालेच परंतु आता लसिकलणाचे दुष्परिणाम दिसून येत आहेत. हे दुष्परिणाम मानसाच्या मानसिक खच्चीकरणासोबतच मृत्यू देखील देत आहेत. आणि केंद्र सरकारने सावध पाऊल उचलून सर्वोच्च न्यायालयाला अगोदरच लिखित स्वरुपात दिले कि लसिकलणाच्या दुष्परिणाम व मृत्यूला सरकार जबाबदार नाही. सरकारला मरणाऱ्या लोकांबद्दल सहानुभूती मात्र राहील.**

लसिकरण हे ऐच्छिक होते व लसिकलणा अगोदर लसिकलणाचे दुष्परिणामा विषयी नागरिकांना माहिती दिली होती अस बोलुन सरकारने आपली बाजू स्पष्ट केली आहे. आता महत्वाचा प्रश्न आहे हा आहे की लसिकरणानंतर मृत्यु दर वाढला आहे. वेगवेगळ्या बातम्या द्वारे माहिती दिली जाते कि तरुणां मध्ये हृदयविकाराचे झटक्याचे (हर्ट अँटॅक्ट चे) प्रमाण प्रमाण वाढलेले आहे. थोडक्यात काय तर लसिकरणानंतर हर्ट अँटक्ट ने मरणाऱ्यांची संख्या वाढली आहे आणि भविष्यात सुद्धां यापेक्षा जास्त वाढणार आहे. म्हणून तर सरकारने सर्वोच्च न्यायालयामध्ये लिखित दिले आहे. लसिकलणाचे दुष्परिणाम यावर सुरवातीपासुनच एक गट प्रकाश टाकण्याचे काम करत आलेला आहे. परंतु माध्यमांनी तो विषय कधीच जोर लाऊन न धरता कोरोना काळामध्ये सरकारची बाजु मांडण्याचा प्रयत्न केला. त्याचेच परिणाम आज आपल्या समोर आले आहेत. एका बातमी नुसार ६५% लोकांना नपुंसकत्व येणार असल्याचे लक्षण आहेत. ६५% पुरुषांना नपुंसकत्व येण्या सारखे दुष्परिणाम दिसून येत आहेत, तसे ते सिद्धही झालेले आहे. आता जनता नपुंसक होणार नाही झालेली आहे. परंतु लाजेमुळे, सामाजिक प्रतिष्ठेमुळे लोक बोलायला तयार नाही आहेत. लसिकरणानंतर लैंगिक संबंध ठेवण्याची इच्छा खुप कमी झालेली आहे. यामुळे लोक नैराश्याने खचून गेलेले आहेत. माणसिक ताण तणाव वाढून नैराश्यामध्ये जिवन जगत आहेत. लैंगिक संबध ठेवण्यासाठी त्यांची ईच्छाच होत नसेल तर त्या पुरुषाला कसे वाटत असेल हा विषय कल्पना शक्तीच्या बाहेरचा आहे. लसिकरणानंतर अनेक जोडीदारांची माणसिकता बदलली आहे. लैंगिक संबंध नसल्याने चिडचिड, दुरावा, गैरसमज, आणि मानसिक नैराश्य अशामुळे अनेक जोडपे आज लाज प्रतिष्ठा मुळे तडजोड करत आहेत परंतु त्यांचे चे वैवाहिक जिवन आहे ते मात्र विस्कळीत झालेले आहे हे कोणीही नाकारू शकत नाही. आणि आता टिव्ही, वर्तमानपत्र याद्वारे नपुंसकत्वाचा कारणीभूत कोण आहे हे कळायला लागले तरी बहुतांश वर्ग लैंगिक समस्येवर बोलणेच टाळतो. बातम्या प्रसारित झाल्याने जो वर्ग लैंगिक समस्येवर बोलण्यासाठी लाजतो किंवा प्रतिष्ठेचा विचार करून समाज काय म्हणेल म्हणून शांत बसतो त्या वर्गासाठी सदर बातम्या खुपच धक्कादायक आहेत. बर आता जे विवाहित पुरुष आहेत आणि ज्यांना मुलं आहेत ते आपल्या मुलांकडे बघुन लैंगिक संबधाबाबत तडजोड करतीलही. मुलांच्या भविष्याचा विचार करून लैंगिक इच्छा दाबुन वा नपुंसकत्वाचा विचार न करता मोठ्या धाडसाने जिवन जगण्याचा प्रयत्न करतील परंतु मनामध्ये जी नपुंसकत्वाची जखम होईल ती तर भरून निघणार नाही. आणि म्हणून वरून शरिराने धष्टपुष्ट दिसणारा पुरुष आतून मात्र पुर्ण खचून गेलेला असु शकतो. मनाने खचून गेलेल्या माणसाला कोणतेच औषध पुन्हा धिर देऊ शकत नाही.

बर आता सर्वात मोठा प्रश्न तर नाही म्हणता येणार परंतु सर्वात मोठे कोडे तर नक्कीच म्हणता येईल. ज्यांचे नवीन लग्न झालेले आहेत आणि त्यांचे लसिकरण झालेले आहेत. अशा लोकांनी आपल्या आयुष्याचा गाडा असा लोटायचा? येथे नपुंसकत्वच आलेले असल्याने आणि शुक्रानू निष्क्रिय झाल्याने अपत्य प्राप्ती म्हणजे काळ्या खडकावर गुलाब फुलवल्या सारखे होईल. वैवाहिक जिवनात पर्दापण केल्यावर लैंगिक संबंध नसल्याने लैंगिक समाधान नाही. लैंगिक समाधान नसल्याने जोडप्यामध्ये वैयक्तिक वाद विवाद, कलह, निर्माण होऊन मानसिक ताण येईल. लग्नानंतर त्या महिलेला सर्वात मोठे सुख आनंद असतो तो म्हणजे गरोदर होण्याचा. येथे शारीरिक संबंधच होत नसतील तर गरोदरपणाचा प्रश्न च येणार नाही. आणि जर लग्नानंतर लवकर मुलबाळ झाले नाही तर महिला एवढी खचून जाते, सामाजिक व कौटुंबिक एवढा ताण येतो की कधी कधी तर महिलेला महिला झाल्याचा पश्चाताप होतो. त्यामुळे महिला देखील नैराश्यामध्ये जाऊन आपले जिवन जगण्याचा प्रयत्न करेल. परंतु नवरा बायको नैराश्यामध्ये असताना खरचं संसार सुखाचा होई का? अपत्य प्राप्ती नाही तर सामाजिक प्रतिष्ठा मिळेल का? आणि पुरुषाला नपुंसकत्व आले तर त्याच्या मनात प्रश्न येईल जगुन फायदा तरी काय? आणि अजून तो नैराश्यामध्ये जाऊन आपले जीवन संपवण्याचा प्रयत्न नक्की करेल. ज्या गोष्टी मानसाच्या हाती आहेत त्या गोष्टी तो नक्की करतो परंतु ज्या गोष्टी माणसाच्या हाती नाही नसतात तेथे मात्र माणूस हतबल झालेला असतो. आता वैद्यकीय चाचण्यामध्ये निष्पन्न झालेले आपण तर बदलु शकणार नाही परंतु प्रत्येकाने एकदा तपासणी करून घेतली आणि त्यासाठी योग्य तो उपचार घेऊन जर धोका टाळता आला तर मोठे वरदानच असेल म्हणून आता लैंगिकतेवर बोलणे, तपासणी आणि उपचार करणे काळाची गरज झाली आहे. थोड मोठ मनकरून योग्य ती वैद्यकीय तपासणी करून घ्यावी म्हणजे माणसाचे खच्चीकरण होणार नाही आणि नैराश्याचा सामाना करण्याची वेळ येणार नाही. सध्या कोणाला लैंगिक समस्या जाणवत असेल, लैंगिक संबधाबाबत इच्छा निर्माण होत असेल तर डॉक्टरांच्या सल्ल्यानुसारच प्रत्येकाने उपचार वा औषधी घ्यावी. हल्ली लैंगिक संबधाबाबत उत्तेजना निर्माण होण्यासाठी मेडिकल वरुन डॉक्टरांच्या सल्या शिवाय औषधे, गोळ्या घेतली जातात तेही धोकादायक आहे. आणि उत्तेजित होण्याच्या गोळ्या डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय घेतल्याने अनेकांना जिव सुद्धा गमवावा लागला अशा बातम्या आपण अधुनमधून वाचत असतोच.



आता महत्त्वाचा मुद्दा आहे नपुंसकत्व आलेच तर काय करायचे. ज्यांना मुलबाळ आहे त्यांनी आनंदाने राहून मुलांच्या भवितव्याचा विचार करायचा आणि सुखाने संसार करायचा. येणाऱ्या संकटाला जोडप्यामधील कोणाचाच दोष नसून ते संकटच आहे अस समजून लैंगिक समाधानाशी तडजोड करून आपले वैवाहिक जिवन आपल्या कुटुबांसोबत चांगले जगावे. नविन वैवाहिक जिवनात पदार्पण केलेल्या जोडप्यांनी तपासणी करून शक्य असल्यास योग्य तो उपचार डॉक्टर यांच्या सल्याने करावा. जोडीदारासोबत सामंजस्याने घेऊन एकमेकांना समजून घेऊन एकमेकांना वर विश्वास ठेवून आपले जिवन जगावे. जेने करून मनामध्ये न्यूनगंड येणार नाही व मानसिक ताण सुद्धां येणा नाही. सदर बाबीचा मोठा धोका त्यांना आहे ज्यांचे लग्न झालेले नाहीत आणि येणाऱ्या काळामध्ये त्यांचे लग्न होतील अशा तरुणांना याचा मोठा फटका बसु शकतो. लैंगिक उत्तेजना कमी झाल्याचे जाणवले तर तो तरुण पूर्ण खचून जाऊन शकतो. एकतर अर्धे आयुष्य शिकण्यात आणि नोकरी शोधण्यासाठी खर्ची जाते. अर्धे आयुष्य खर्ची होऊनही समाधान कारक नोकरी लागत नाही. तडजोड करून लग्न करण्याचा विचार केला आणि तेव्हा जर नपुंसकत्वाची जाणीव झाली तर त्या तरुणाच्या मनावर काय परिणाम होईल याचा विचार सुद्धा आपण करू शकत नाही. म्हणून कोविड नंतर हर्ट अँटॅक्ट, मानसिक ताणतणाव, नैराश्य, वंध्यत्व आणि नपुंसकत्व अशा प्रकारच्या अडचणींना सामोरे जावे लागणार आहे. आणि हे वेगवेगळ्या वैद्यकीय तपासणी अहवालात समोर आलेले आहे. येणाऱ्या काळात लसिकरणाचे दुष्परिणाम दिसून आले तर जनजीवन विस्कळीत होणार तर आहेच. परंतु जनतेने आजही जागृत होऊन लसनिर्मिती कंपनी विरोधात जाऊन लसिकरणाचे दुष्परिणाम झाले तर त्यावर काही वैद्यकीय उपाय देण्यात येण्यासाठी आवाज उठवला तर काही प्रमाणात काही धोके टाळता येतील. सध्या लसिकरणाच्या दुष्परिणामाच्या संदर्भात एक केस उच्च न्यायालयात सुरू आहे. त्या केस मध्ये न्यायालयाने लस निर्माण करणारी कंपनी व बिलगेट्स यांना नोटीस सुद्धा दिलेली आहे. लसिकरणाच्या सुरवातीच्या काळात कोव्हक्सीन लसिकरणामुळे काही दुष्परिणाम झाले तर त्यांची नुकसान भरपाई कंपनी देईल अशा आशयाची बातमी एका वृतवाहीनीने चालवली होती. तो संदर्भ व अधिक माहिती घेऊन स्वतः च्या संरक्षणासाठी संविधानीक मार्गाने काय करता येईल जनेकरून एक आशेचा किरण निर्माण होईल या दृष्टीने सर्वांनी एक होऊन पाऊले उचलणे आवश्यक आहे. एवढे होऊनही जर आपण विचाराने पेटुन उठलो नाही आणि स्वतः च्या आरोग्यासाठी जर लढलो नाही तर लैंगिक दृष्टीने तर नपुंसक होतच आहोत. मग त्यामध्येच समाधान मानाने लागेल. नपुंसक सारखे दुष्परिणाम दिसुन येऊन कोणीच लस निर्मिती कंपणी विरोधात आवाज उठवत नसेल, सरकार आपली बाजु झटकून टाकत असेल तर सर्वसामान्य जनतेने कोणावर विश्वास ठेवायचा? आज ज्या वृत्तवाहिन्या नपुंसकत्वाच्या बातम्या दाखवत आहेत त्याच वृत्तवाहिन्या लसिकरणाचे दुष्परिणाम नाहीत असे सांगत होते आणि आता दुष्परिणाम एवढे घातक दिसुन येत आहेत. मग लसिकरणाचे दुष्परिणाम नाहीत ही माहिती कोणत्या सुत्रांनी दिली आणि आज दुष्परिणाम कसे दिसून येत आहेत दोघांनाही समोरा समोर बसवून त्यावर चर्चा करून सरकारला स्वतः ची जबाबदारी काय आहे हे विचारण्याची हिम्मत एखाद्या वृत्तवाहीनीने केले तर नवलच. येथे मानसामधला माणूस धोक्यात आहे आणि सरकार जबाबदारी घेत नाही तरुणांनी जिवन जगायचे तरी कसे? अचानक आलेले मरण स्वाभिमान देऊन जाते परंतु नपुंसक बनुन जगणे म्हणजे क्षणाक्षणाला मरण यातना सहन करणे होय. या साठी मानसिक संतुलन नियंत्रित ठेवण्यासाठी सर्वात महत्त्वाचा उपाय म्हणजे जोडप्यांनी कोणत्याही प्रकारचा न्यूनगंड मनात न ठेवता किमान दोघांनी तरी या विषयावर बोलुन मन मोकळे करावे म्हणजे नैराश्याचा त्रास कमी होऊन मन हलके होइल आणि जगण्यासाठी थोड बळ येईल.

# चीन, उत्तर कोरियामुळे जपान झाला युद्धसज्ज



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**आज संपुर्ण जगच अस्थिर आहे. युरोप असो की आशिया, आफ्रिका असो की अमेरिका अशा सर्वच खंडातील देशांमध्ये सध्या वर्चस्वाची लढाई सुरू आहे. कोण कोणत्या देशावर केंव्हा हल्ला करेल याची शाश्वती नाही. त्यातच चीन, उत्तर कोरिया, अमेरिका आणि रशिया यासारख्या युद्धखोर देशांना तर लहान देशांच्या कुरापती काढून जगाला अस्थिर ठेवण्याचा छंदच जडला आहे. रशियाने युक्रेनवर हल्ला करून युरोप अस्थिर केला तर इकडे आशियात चीन स्वतःच्या विस्तारवादी महत्वाकांक्षेने आशियाला अस्थिर करत आहे.**

भारताच्या सतत खोड्या काढून भारतावर दबाव निर्माण करतानाच साम, दाम, दंड, भेद नीतीचा अवलंब करून आशियातील छोट्या देशांना चीनने सळो की पळो करून सोडले आहे. आता हेच पहा ना तैवान हा जगातील अतिशय छोटा देश या देशाचे स्वतंत्र अस्तित्व मानायला चीन तयार नाही त्यामुळे या दोन्ही देशात सतत तणाव असतो. त्यात काही महिन्यांपूर्वी अमेरिकेन सिनेटच्या अध्यक्षा नॅन्सी पॉलिसी यांनी तैवानला भेट दिल्यामुळे चीन चांगलाच खवळला आणि त्यांनी अमेरिकेला इशारा देण्यासाठी थेट तैवानच्या सागरी हद्दीत क्षेपणास्त्रे डागली. बरे इतक्यावर शांत बसेल तो चीन कसला त्याने कारण नसताना जपानच्या विशेष सागरी क्षेत्रात ( स्पेशल इकॉनॉमिक झोन ) देखील पाच क्षेपणास्त्र डागली. अमेरिका आणि तैवानला इशारा देतानाच त्यांनी जपानलाही इशारा दिला. जपानला इशारा देण्यामागचे कारण म्हणजे जपान आणि भारताची वाढलेली सलगी. जपान आणि भारताची मागील काही वर्षात झालेली घट्ट मैत्री चीनला पाहवत नाही शिवाय चीन विरोधात सक्रिय झालेल्या क्वाड गटात जपानही आहे त्यामुळे चीन आता जपानलाही आपला शत्रू मानू लागला आहे त्यामुळेच जपानच्या सागरी क्षेत्रात क्षेपणास्त्रे पाठवून चीनने जपानला इशारा देण्याचा प्रयत्न केला आहे. केवळ चीनच नाही तर उत्तर कोरिया हा देखील जपानला शत्रू मानतो. दक्षिण कोरिया हा उत्तर कोरियाचा शत्रू आहे आणि दक्षिण कोरिया हा जपानचा मित्र आहे त्यामुळे उत्तर कोरिया जपानलाही शत्रू मानतो. उत्तर कोरियाने गेल्या महिन्यात दक्षिण कोरियावर क्षेपणास्त्र हल्ला केला. या हल्ल्यातील काही क्षेपणास्त्रे त्यांनी जपानच्या हद्दीतही डागले. अर्थात चीन आणि उत्तर कोरिया या देशांची ही आक्रमक वृत्ती जपाननेही गांभीर्याने घेतली असून भविष्यात चीन आणि उत्तर कोरिया आपल्याला भारी पडेल हे ओळखून जपानने २० हजार टन क्षेपणास्त्रे डागू शकतील अशा दोन युद्धनौका तयार करण्याचा निर्णय घेतला. चीन आणि उत्तर कोरियाचा धोका ओळखून जपानने आपल्या संरक्षण धोरणात आधुनिक क्षेपणास्त्रे आणि शस्त्रांसाठी ८६३ अब्ज डॉलरची तरतूद केली आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर पहिल्यांदाच जपान आपल्या संरक्षण बजेटवर एवढा मोठा खर्च करत आहे. जपानच्या मंत्रिमंडळाने नवीन संरक्षण बजेटला मान्यता दिली आहे. जपानने घेतलेला हा निर्णय सध्या जगतिक पातळीवर चर्चेचा विषय ठरत आहे. कारण युद्ध आणि अणुबॉम्ब यापासून चार हात दूर राहायचे असे जपानने



७७ वर्षापासूनचे धोरण आहे. आपल्याला माहीतच आहे की युद्धाची सर्वाधिक झळ कोणाला बसली असेल तर ती जपानला. १९४५ साली दुसऱ्या महायुद्धात अमेरिकेने जपानच्या हिरोशिमा आणि नागासाकी या शहरांवर अणुबाँब टाकून ही शहरे बेचिराख केली होती. या भीषण हल्ल्याने जपानच्या नागरिकांचे प्रचंड खच्चीरकरण झाले होते. हे खच्चीकरण इतके प्रचंड झाले होते की जपानचे नागरिक युद्ध नको म्हणून त्यांच्याच सरकारच्या विरोधात रस्त्यांवर उतरले होते. त्यामुळे जपानच्या तत्कालीन सरकारने अमेरिकेशीच सामंजस्य करार करून देशाचे रक्षण करण्याची विनंती केली होती. तेंव्हापासून अमेरिकन सैन्य जपानच्या सुरक्षा व्यवस्थेत आहे. युद्धाची झळ बसलेल्या जपानने १९६१ साली अणुबॉम्ब बनवणार नाही आणि दुसऱ्या देशांचा अणुबॉम्ब जपानच्या भूमीवर ठेवू देणार नाही अशी शपथ घेतली. २०२० पर्यंत जपानने ही शपथ कसोशीने पाळली. मात्र २०२० सालापासून अमेरिका, उत्तर कोरिया चीन आणि रशिया या युद्धखोर देशांकडून घेतले जात असलेल्या निर्णयामुळे जग पुन्हा तिसऱ्या महायुद्धकडे वाटचाल करत असल्याने आपल्या देशाच्या सुरक्षेसाठी जपानने घेतलेल्या शपथेला बाजूला सारून युद्ध अभ्यास घेतला. त्याआधी कधीही जपानने युद्ध अभ्यास केलेला नव्हता. युद्ध अभ्यासानंतरही जपानने आपल्या शस्त्र सज्जतेकडे तसे दुर्लक्षच केले होते मात्र चीन आणि उत्तर कोरियाने डागलेल्या क्षेपणास्त्रांमुळे जपानने ७७ वर्षांपासून सुरू असलेले आपले धोरण बदलून युद्धसज्ज होण्याचा निर्णय घेतला. १९४५ नंतर पहिल्यांदाच जपानने आपल्या अर्थव्यवस्थेत लष्करासाठी इतकी मोठी तरतूद केली. जपान सारख्या एका शांतताप्रिय देशाला पुन्हा युद्धसज्ज होण्याची वेळ चीनने आणि आणली आहे. चिन आणि उत्तर कोरियामुळे जपानला आपले ७७ वर्षांपासून चालू असलेले धोरण बदलावे लागले आहे. उद्या जर देशाचे सार्वभौम अस्तित्व टिकवण्यासाठी जपानने अणुबॉम्ब निर्मितीची घोषणा केली तरी आश्चर्य वाटायला नको.

# खेळकर मुलांच्या मस्त गोष्टी

आधुनिक केसरी

**मित्र हो नमस्कार- वाचक कोणत्याही वयो -गटातील असो अशा वाचकांसाठी काही लेखक- कवींचे साहित्य वाचनप्रिय असते. अशा साहित्यीकातील आजचे परिचित नाव आहे मुंबईकर कवी -एकनाथ आव्हाड सर . यांच्या कवितांना, कथांना लहान-थोर सर्वांनी आवडीची पावती दिलेली आहे. सगळ्याच माध्यमातून आव्हाड सरांचे लेखन सातत्याने वाचकांच्या समोर येत असते . सरांचे साहित्य असलेल्या अनेक मासिकात आणि दिवाळी अंकात माझाही साहित्य-सहभाग असतो . " लेखनातील आम्ही सहप्रवासी आहोत "असे सांगण्यात मला आनंद वाटतो.**

एकनाथ आव्हाड "बालकविता लिहिणारे कवी "म्हणून माझ्या जास्त परिचयाचे आहेत . अशा वेळी माझ्याकडे त्यांचे आलेले नवे पुस्तक "सुंदर गोष्टी असलेला " सुरेख असा बाल-कुमार कथा संग्रह आहे ".त्यांचे असे लेखन मी पहिल्यांदाच वाचले.

मार्च -२०२२ मध्ये मेहता पब्लिशिंग हाऊस "या प्रकाशन संथेने आव्हाड सरांचा हा बालकथा - संग्रह प्रकाशित केलाय ." खळाळता अवखळ झरा आणि इतर कथा " या पुस्तकात एकूण १६ बाल-कथा आहेत .मोठी रंगीत पानं , त्यावर रंगीत उठावदार चित्रं ,अक्षरांचा मोठा टाईप " ,असे हे पुस्तक मुलांनी वाचावयास हाती घेतले की ,ते या पुस्तकाचा पार फडशा पाडूनच बाजूला ठेवणार " ,हे मी आज म्हणत असलो तरी .. आव्हाडसरांना अशा प्रतिक्रिया वाचकांकडूनआधीच आलेल्या असतील " हे मी खात्रीने सांगू शकतो. माझ्या मते - " एकनाथ आव्हाडसर उत्तम शिक्षकआहेतच त्यापेक्षा जास्त ते एक ..प्रयोगशील कवी ,लेखक -शिक्षक आहेत ". बाल-कविता , बाल-कथा , मजेदार कोडी , काव्य कोडी ", नाट्यछटा संग्रह , चरित्र " अशा विविध लेखन -प्रकारात आलेल्या त्यांच्या तीस ( ३० ) पेक्षा जास्त पुस्तकातील लेखनातूनआपल्याला हे सगळे जाणवत आलेले आहे . "मुलांचा अवखळपणा , खेळकरपणा , उत्साहह , कुतूहल "जिज्ञासा " हे स्वभाव-गुण " एकनाथ आव्हाडमधील शिक्षकाने ओळखूनमग - कवी-आणि लेखक असलेल्या आव्हाडांनी बालमनाचा तळ शोधण्याचा यशस्वी प्रयत्न नेहमीच केलेला आहे.. खळाळता अवखळ झरा " या पुस्तकातील गोष्टी..काव्यमय आहेत .आव्हाड सरांनी "कवितांची जणू साखरपेरणीच केली आहे ". यातील गोष्टीत असणारी "शमी ,बाळू , आई-बाबा , आजी-आजोबा , इतर मित्र मंडळी " यांच्या परिवारात आपणही अगदीसहजपणाने मिसळून जातो. हे असे कौटुंबिक , पारिवारिक जिव्हाळ्याचे घर, त्यातील माणसे म्हणजे " अनेक संस्कारएकाचवेळी घडवले जाणरे आपलेच घर वाटते ." या सगळ्या व्यक्तिरेखा , आपल्या जवळच्या ,मनास भावणाऱ्या आहेत. एकनाथ आव्हाडसरांना हे असे लेखन अगदी सहजतेने करता येते .."असा माझा वाचन -अनुभव आहे. मित्रांनो - यातील




शीर्षक कथा असो की , "भाषेची गोडी ( पृ.४० ), " गूगलआजी ( पृ.५१ } , "परोपकारी संत ( पृ.५८ ), " शिक्षेतून दीक्षा ( पृ.६९ ), "मायेची ऊब ( पृ.८८ ) ", कोणतही गोष्ट वाचून पहा ..मनाला प्रसन्न करणारी गोष्ट वाटते . मित्रानो - एकूण ९६ पानांचे - छान गोष्टींचे हे मस्तपुस्तक " तुम्ही मिळवून ते वाचावे " असे आहे . यासाठी नक्की प्रयत्न करा आणि वाचा .
नमस्कार!

**पुस्तक -परिचय -लेख**
**ले- अरुण वि.देशपांडे - पुणे.**
**संपर्क - 9850177342**
**खळाळता अवखळ झरा आणि इतर कथा "**
**( बालकुमार कथा संग्रह )**
**एकनाथ आव्हाड -मुंबई ,**
**संपर्क : 9821777968**
**पृ.९६ , मूल्य- रु,.१९५/-**
**प्रकाशक "**
**मेहता पब्लिशिंग हाऊस**
**सदाशिव पेठ -पुणे.**
**020-24476924**

# धर्म आणि संस्कृती



आधुनिक केसरी

या भुतलावर परमेश्वर अनेक रूपात वावरत असतो. आपल्याला त्याचे जे रूप भावते त्या रूपात त्याला स्विकारावे. प्रत्येक वेळी जरूरी नाही कि तो देव देवतांच्याच रूपात असेल. जीथे गरज असते तिथे मदत करणाऱ्याच्या रूपातही तो असतोच की..! आपण काय मानतो यावर परमेश्वराचे स्वरूप अवलंबुन असते. मानला तर देव नाहीतर दगड. म्हणून प्रत्येकासाठी तो दगड असू शकत नाही. आपले मन हे सर्वशक्तीमान शक्ती आहे. देव असणं नसणं ही हे मनच ठरवतं. देव देवतांची अनेक रूपे आपण हजारो वर्षां पासून मानत आलो आहोत. आपल्या देशाच्या धर्म संस्कृतीचा पाया ही या रूपांवरच अवलंबुन आहे. अलिकडच्या काळात समाज खुपच प्रगत झाला आहे. या समाजाला धर्म संस्कृती यांच्याशी काहीच देणे घेणे नाही. मी किती पुढारलेलो आहे हे मिरवण्यातच तो धन्यता मानत आहे. धर्म आणि संस्कृती मध्ये काळाप्रमाणे बदल होणे आवश्यक आहे. ते जर झाले नाहीत तर तो समाज कट्टर वादी होतो आणि असा समाज पुढे आत्मघातकी होतो. काही लोक धर्म निरपेक्ष म्हणून मिरवतात पण त्यांच्या प्रत्यक्ष जीवनात ते धर्माशिवाय राहूच शकत नाही. आपला देश ही धर्म निरपेक्ष देश म्हणून शेखी मिरवत असतो पण अशी कुठली गोष्ट आहे कि धर्म आणि जाती शिवाय होते? मी कुठल्या जातीचा, कुठल्या धर्माचा, कुठल्या पंथाचा हे जगासमोर मोठ्या अभिमानाने मांडणारे आपण स्वतःला धर्म निरपेक्ष समजतो. प्रत्येक जण माझा धर्म कसा श्रेष्ठ हे समजावून सांगतानाच तुझा धर्म कसा वाईट हे सांगताना दिसत आहेत. जगातल्या प्रत्येक समाजाचा पाया हा धर्म हाच आहे. मग तो कुठलाही असो. धर्माच्या नावावर समाज एकसंध होतो पण आधुनिक समाजात या गोष्टीचा फायदा करून घेण्याऐवजी एकमेकांची माथी भडकविण्याचे काम होताना दिसत आहे. हिंदू धर्म संस्कृती ही निसर्गातील बदलांवर आधारित आहे. प्रत्येक महीन्यात निसर्गात वेगवेगळे बदल होत असतात.ऋतूमाना प्रमाणे अनेक स्थित्यंतरे होत असतात. निसर्गात होणाऱ्या प्रत्येक बदलाचे स्वागत केवळ हिंदू धर्म संस्कृती मध्ये आहे. पण या संस्कृती ला मुळ धर्माचे स्वरूप आणून धर्म संस्कृती बदनाम करण्याचे काम होताना दिसत आहे.

**जयेश अ. माधव**

# मुतखडा : उपचार आणि प्रतिबंध

आधुनिक केसरी

1. मुतखडयांवर आयुर्वेदात अनेक औषधे सांगितली आहेत. मुतखडयांचा त्रास असल्यास एकदा तरी तज्ज्ञाकडून योग्य ती तपासणी करून घेणे आवश्यक आहे. ताबडतोब शस्त्रक्रिया करणे आवश्यक नसल्यास निरनिराळे आयुर्वेदिक उपाय करून पाहता येतील. वरुणादि काथ हे औषध यासाठी उपयुक्त आहे. हे औषध सकाळ सायंकाळ 2-2चमचे घ्यावे.

2. मुतखडयांचा उपचार आणि प्रतिबंध या दोन्ही दृष्टींनी भरपूर पाणी पिणे अत्यंत महत्त्वाचे आहे व शक्यतो विहिरी व बोअरचे (क्षारयुक्त) पाणी पिणे टाळावे.

3. मुतखडयांवर आयुर्वेदात अनेक औषधे सांगितली आहेत. मुतखडयांचा त्रास असल्यास एकदा तरी तज्ज्ञाकडून योग्य ती तपासणी करून घेणे आवश्यक आहे. ताबडतोब शस्त्रक्रिया करणे आवश्यक नसल्यास निरनिराळे आयुर्वेदिक उपाय करून पाहता येतील. वरुणादि काथ हे औषध यासाठी उपयुक्त आहे. हे औषध सकाळ सायंकाळ 2-2चमचे घ्यावे.

4. कडुलिम्बाच्या पानाची राख २ ग्राम पाण्याबरोबर नियमित खाल्याने मुतखडा विरघळून जातो.

5. जर खडा लहान असेल आणि जास्त जुना नसेल तर मेहंदी चे साल वाटून चूर्ण करावे आणि सकाळी अर्धा चमचा नियमित घेतल्याने मुत्खावा विरघळतो.

6. पुनर्नवा वनस्पतीही मुतखडयावर उपयुक्तआहे. पुनर्नवा (खापरखुटी, वसूची भाजी) ही पावसाळयापासून होळीपर्यंत ठिकठिकाणी आढळते. या वनस्पतीची मुळासकट बिनतिखट चटणी (50 ग्रॅम) रोज जेवणात असावी. ओली वनस्पती काढून सावलीत वाळवून नंतर वापरता येते.



7. या उपायांबरोबरच टोमॅटो, कोबी, अळू,, इत्यादी भाज्या जेवणातून वर्ज्य कराव्यात.

8. पाषाणभेद वनस्पती व गोखरू काटे (सराटे) यांचे समप्रमाणात मिसळलेले चूर्ण दोन ग्रॅम, रोज एक वेळ (सकाळी रिकाम्या पोटी) पाण्याबरोबर द्यावे. त्यानंतर चार-पाच तास तोंडाने काहीही न घेण्याची सूचना द्यावी. याप्रमाणे दीड महिना रोज उपचार करावेत. पाच-सहा महिन्यांनंतर परत एकदा महिनाभर हाच उपाय करा.

# व्यासंग आणि संघर्षातील 'चिकाटी'नेच हनुमंत घाडगे गुरुजींनी घडवल्या सद्गुणी पिढ्या !

## संयमाचा परीघ



चित्र : बाबूराव पाटील, भोकर



प्रा. डॉ.मुकुंद राजपंखे
संपर्क क्र. 9881294226

भाग : १०

आधुनिक केसरी

**आत्मकथण लिहायचं म्हणजे आत्मबळ हवं, निर्भीडपणा हवा,ख-याची बाजू घेण्याची तयारी हवी, सगळ्या येवू शकणा-या संकटांना सामोरं जाण्याची हिंमत हवी, त्याशिवाय सरळ सगळं सांगता येत नाही. हातचं राखून लिहिता येत नाहीत झालेल्या अन्याय अत्याचारांच्या गोष्टी.भवतालात जिती असतात ही माणसं ज्यांनी छळ केलेला असतो आणि ते कधीही डोकं वर करु शकतात याचं भान लागतं.ही हतबलता झिडकारता आली की आत्मकथणाची वाट मोकळी होते. अनेकदा आत्मप्रोढीत अडकतात आत्मकथणं. आपल्याच अपमानाचे पाढे अपमान करणा-यांच्या नावांसह वाचणं सोपं नसतं. आपलीच बाजू कशी भक्कम उभी करता येईल अशा वकालतीकडं झुकलेली पुष्कक आत्मकथणं या पुर्वी आली आहेत. ही आत्मकथा या सगळ्या आव्हानांना तोंड देते, हे मोठेपण विसरता येणे नाही. हे आत्मकथण हनुमंत घाडगे गुरुजींच्या बालपणापासून सुरु होवून सेवानिवृत्तीच्या उंबरठ्यावर येवून पोंचल्या पर्यंतची संघर्षयात्रा आहे. ही एका अशा संवेदनशील अपंग मुलाची घुसमट आहे ज्याने बालपणापासूनच निर्धाराने संघर्षाचे धडे विद्यार्थी एस एफ आय आणि हॉस्टेलर्स असोशिएशन सारख्या विद्यार्थी आत्मभान आणि समाजकल्याणासाठी लढे, आंदोलनं उभारणा-लढावू चळवळींमधून सक्रीय सहभागी होवून मुंबई-दिल्लीपर्यंत जावून गिरवले आहेत.ही संहिता मी तासा-सव्वा तासांच्या अवघ्या दोनच बैठकांमधे वाचल्यावर प्राकर्षानं जाणवलं की आपल्याला कधीही न जाणवलेल्या आपल्या सन्मित्र घाडगे गुरुजींच्या शारिरीक अपंगात्वावर मात करणारी ही फार महत्वाची गोष्ट सांगायला गुरुजींनी फार वेळ लावला आहे.किमान निवृत्तीपुर्वी हे आलं याचंही समाधान आहे. ही संहिता तुम्ही फक्त वाचायला सुरुवात केली म्हणजे तुमचं काम संपलं, बाकी तुमच्याकडून सगळं पुस्तक वाचून घेण्याचं काम या पुस्तकातील पानापानावर विखुरलेला संघर्ष स्वतः होवून करेल याची खात्री आहे.**

केज-कळंब जवळ 'सातेफळ' या खेड्यात जन्मलेल्या आणि अवघ्या दुस-याच वर्षी पोलीओनं एका पायावर आघात केल्यामुळं घाडगे गुरुजींचा अवघा जन्म संघर्षाच्याच पातळीवर नेऊन ठेवला आहे. आई-वडीलांची मुलकाची गरीबी आणि हे पोलीओचे अपंगत्व अशा या दोनही पाळूत महोदयांचे बालपण भरडले आहे. अंबाजोगाईच्या अपंग मुलांच्या शाळेची आवस्था आणि तिथल्या लेकरांचं शिक्षण हा मोठा चिंतेचा भाग समोर आला आहे.लेखकाने या अशाही वातावरणात आपलं बालपण भरडून घेतलं आहे. केजच्या नालंदा विद्यालयाचा आरंभीचा शैक्षणिक सुवर्णकाळही लेखकानं रेखाटला आहे.तिथल्या हैब्रीटच्या भाकरींना मनःपुर्वक धन्यवाद दिला आहे.महाविद्यालयीन शिक्षणासाठी पडेल ते काम करुन विवेकानंद महाविद्यालय आणि संत तुकाराम शासकीय वस्तिगृहातील संघर्षही मोठा जीवघेणा आहे.शिक्षणासाठी पोटापाण्याचा आणि निवा-याचा प्रश्न सोडवण्यासाठी भेटताल तेथे समाजकल्याण मंत्री मा. रामदासजी आठवले साहेबांना निवेदणं दिली.थेट मंत्रालय गाटलं विद्यार्थी मोर्चामधून.आठवले साहेबांचा पिच्छा सोडला नाही. शिक्षणासाठीची ही घाडगे गुरुजींची 'चिकाटी' पाहून अगदी नावानिशी आपल्या मंत्रालयातील कार्यालयात हॉस्टेलर्स असोसिएशनच्या बैठकीसाठी ठरवून सर्व तयारीनिशी आलेल्या घाडगे गुरुजींची नजरा नजर झाल्या बरोबर 'घाडगेचा प्रवेश करा रे, जाताना ऑर्डर घेऊन जा, ही आठवले साहेबांची स्मरणशक्ती आणि अर्थातच आपुलकीची भाषा मनाला प्रचंड भावली. खरंच त्या दिवशी वसतीगृहात प्रवेश मिळाला नसता तर ? हा विचार करुनही जिवाचा थरकाप होतो.मी ही चिकाटीची संहिता साधना मंगलकार्यालयाच्या प्रांगणात सायंकाळी शतपावली नंतर बसून झपाटल्यासारखा वाचत होतो नेमक्या त्याच दिवशी सकाळी घाडगे गुरुजी अंबाजोगाईहून मला भेटून लातूरला गेले होते आणि मा. मंत्रीमहोदय रामदासजी आठवले लातूरहून अंबाजोगाईला प्राचार्य कमलाकर कांबळे सरांच्या सत्कार समारंभासाठी आले होते.मी सकाळीच त्यांचं निरागस भाषण ऐकलं होतं. हा प्रसंग वाचून कधी नव्हे तो 'परपीडा ओळखणारा नेता' म्हणून आठवले साहेबांप्रती आदरभाव वाटून गेला. मी घाडगे गुरुजींना त्याबद्दल बोललोही.ते ही हळवे झाले बोलताना.

महाविद्यालयीन आयुष्यात आलेले नाजूक चढउतारही मोठे मनमोहक चित्तारले आहेत. तरुणपणाचा मनमोहक काळ म्हणावा असाच कांहीसा जगण्याला मुलायम ठेवणारा काळीज कप्पा फार संयमानं लेखकानं उघडला आहे.एन एस एस कॅंप आणि वक्तृत्व,वाद-विवाद स्पर्धांच्या पायाभरणीचा तो काळ प्रचंड तानतनावात आणि साहित्याच्या पुस्तकांसह अवांतर परंतू आवश्यक वाचनात गेला. हा संत तुकाराम वसतिगृहातून, विवेकानंद महाविद्यालयातून, डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापिठातून परत विवेकानंद विद्यालयातीलच चुनचुनीत लेकरांसाठी किती परीनामकारक ठरला हे मी समजू शकतो. आमच्या जनार्धन महोदयांची प्राजक्ता, सीमाताईंची कन्या या हाडाच्या शिक्षकाच्या वाचन लेखण आणि वक्तृत्व गुणांच्या लाभार्थी आहेत.संत तुकाराम, बाबासाहेब, अण्णाभाऊ, महात्मा फुले, राजर्षी शाहू आणि परत विवेकानंद अशा सगळ्या लोक कल्याणकारी विचार विवेकात हा मनुष्य रमल्याने त्याचा शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांसाठी किती छान उपयोग झाला याचं उत्तम उदाहरण नागपूरला नौकरी लागलेली कृतज्ञ कन्या आहे.अशा किती तरी कोवळ्या मनांवर घाडगे गुरुजींचं नाव कोरलं गेलं आहे.

विद्यापिठातली उच्च शिक्षणासाठीची यातनादायी पायपीठ आणि कमवा शिका यौजनेचा लाभ झालेला खरा खुरा कृतज्ञ विद्यार्थी म्हणून हनुमंत घाडगे गुरुजींनी इतिहास रचला आहे. मिळेल ते आणि मिळेल तिथं खावून जसं आणि जिथं जमेल तसं राहून मोठे कठीन दिवस काढले आहेत.घरची मुलकाची गरीबी, आईचे खुरपणं आणि वडीलांच्या सालक्या बघूनच खरंतर जीवाची घालमेल होत असताना स्वतःच्या अपंगत्वाचं सद्गृहस्थीनं कधी भांडवल केलं नाही.या अपंगत्वावर केलेली मात आणि त्यानंतर विवेकानंद शाळेच्या पायाभरणीच्या काळामधला संयमी संघर्ष त्यांच्या संवेदनशील सद्गुणी स्वभावामुळं कसा आनंदात रुपांतरीत झाला हे मुळातुनच वाचणं रोमहर्षक आणि अर्थपुर्ण असणार आहे..

या आत्मकथणात आलेली बहुतेक सगळ्या सद्गुणी मंडळींचा माझा जवळून परीचय असल्या कारणानंही ही संहिता वाचताना मोठी उत्कंठा वाढत गेली होती. विश्वांभर काका कोकीळ यांच्या करारी शिस्तीबद्दल आणि गदळे गुरुजींच्या शैक्षणिक नेतृत्वाबद्दलही मोठ्या आदरार्थी भावनांनी या आत्मकथणाची पानं कृतार्थ झाली आहेत. केजच्या साहित्यिक वर्तुळात असलेल्या सगळ्या स्नेही मंडळींबद्दल लेखक आदरभाव व्यक्त करतो. हे आत्मकथण केवळ हनुमंत घाडगे नावाच्या एका व्यक्तीचा इतिहास नसून त्यांचं गाव, त्यांची घाडगे वस्ती, चिवट शिक्षण, केजच्या विवेकानंद विद्यालयाची आणि अर्थातच लेखकाची आणि एकुणच घाडगे गुरुजींच्या गणगोताचा, सन्मित्रांचा, साहित्यिक वर्तुळाच्या भवतालाचाही धावता इतिहास आहे. 'संघर्षयात्री' या पहिल्या कविता संग्रहानंतर 'चिकाटी' या केज परिसरातील पहिल्याच आत्मकथणाची नोंद होईल अशी दुसरी घटना हनुमंत घाडगे गुरुजींच्या नावे सन्मानानं नोंदवली जाते आहे याचा मोठा आनंद आहे.या पुर्वी सखाराम गायकवाड यांचं 'सखा' हे आत्मकथण आलं परंतू ते कायम अंबाजोगाईशी संबंधीत राहीले आहेत. मी ही संहिता वाचली नसती तर त्यांची शिक्षणासाठी आणि आयुष्याला हवं ते वळण देण्यासाठी केलेला चिवट संघर्ष मला कळू शकला नसता.घाडगे गुरुजींचा अपंगत्वाशी आणि एकूनच शिक्षण व्यवस्थेशी संयमाने विवेकपुर्ण केलेले दोन हात अधीक अर्थपुर्ण वाटतात.






आता सेवानिवृत्तीनंतरचा त्यांचा काळ लेखणीशी आणि मातीशी हितगूज करण्यातच जाणार आहे त्यामुळं आनंदही आहे आणि एक खरोखर चांगला मातृह्रदयी कल्पक शिक्षक सेवा निवृत्त होतो आहे याचं दुःखही आहे.एक भली मोठी पोकळी विवेकानंद परीवाराला निश्चितपणे जाणवेल एवढे निरंतर कष्ट मोठ्या कल्पकतेनं या सद्गृहस्थानं या परिवारात घेतले आहेत. एवढ्या मोठ्या आरंभीच्या खडतर शैक्षणिक संघर्षानंतरही केवळ आपल्या प्रभावी अध्यापण कौशल्याच्या आणि वक्तृत्वकलेच्या बळावर कै. वंदनीय विश्वांभर कोकीळ काका, आदरणीय गिन्यानदेव गदळे गुरुजी, आदरणीय मुरहरी केळे साहेब आणि सज्जन सन्मित्र कविवर्य जनार्धण सोनवणे महोदय यांच्या सारख्या सज्जन संवेदनशीलतेच्या गळ्यातलं ताईत होवून राहिले आहेत.

तसे हे आत्मकथण अपुर्ण आहे. तशा सगळ्याच आत्मकथा अपुर्णच असतात कारण हे लिहिल्या नंतरचं आयुष्य यात येत नाही. तशा पुष्कळ गोष्टींना महोदयांनी अलगद बाजूला ठेवून प्रकाशझोत केवळ शैक्षणिक जडण-घडण आणि शैक्षणिक संघर्षावर ठेवला आहे.अगदीच ओझरता स्पर्ष करुन सोडून दिलेले बरेचसे धागेदोरे आहेत ज्यावर गुरुजींनी अजूनही लिहावं, लिहीत रहावं, बोलंत रहावं कारण हे कप्पे उलघडणं केज परिसराच्या साहित्यिक, सांस्कृतीक, सामाजिक, राजकीय चळवळींच्या इतिहास लेखणाच्या दृष्टीने आवश्यक गोष्ट आहे जी महोदय अधीक विवेकपुर्ण आणि प्रभावीपणे लिहू- बोलू शकतात.मराठा सेवा संघ असो नाही तर मसापंची चळवळ असो अथवा असो संत तुकाराम साहित्य परिषद यातील आरंभी पासूनच्या घडामोडींचे ते प्रथमदर्शी साक्षीदार आहेत.या चळवळींचा अविभाज्य अंग आहेत. त्यांच्या वैयक्तीक वक्तृत्व आणि वाद-विवाद स्पर्धांमधील यशाने आणि नंतरच्या काळात विवेकानंद विद्यालयातील त्यांचे विद्यार्थी-विद्यार्थीनींनी परीसर आणि अवघ्या मराठवाड्यात आपल्या विवेकानंद विद्यालयाची गुणवत्ता नावा- रुपाला आणली आहेत, हे केवळ घाडगे गुरुजींच्या अंगी असलेल्या निष्ठांमुळं आणि कौषल्यामुळंच.या आणि अशा किती तरी गोष्टी आहेत ज्याबद्दल अजूनही चिकाटीनंच लिहायला हवं. तुमच्या सेवानिवृत्तीनंतरच्या निकोप, निरोगी, निर्मळ आरोग्यपुर्ण आयुष्यासाठीही हार्दिक शुभेच्छा !

**(लेखक मराठी साहित्याचे लेखक आणि इंग्रजी साहित्याचे संशोधन मार्गदर्शक आहेत)**

# 'गली का एक आवारा' या गाण्याने 20 लाखांचा पल्ला गाठला

आधुनिक केसरी

बॉलिवूडचे प्रसिद्ध दिग्दर्शक आणि अभिनेता मानव सोहल फेब्रुवारी 2023 मध्ये 'मैं राज कपूर हो गया' या हिंदी चित्रपटासह येत आहेत. "गल्ली का एक आवरा" या चित्रपटातील एक गाणे खूप ब्लॉकबस्टर ठरले आणि रिलीजच्या काही दिवसातच 2.2 दशलक्ष व्ह्यूज पार केले. मानव सोहल आणि अर्शीन मेहता यांच्यावर चित्रित केलेले हे गाणे अब्दुल शेख यांनी गायले आहे. गाण्याने 2.2 मिलियन व्ह्यूज ओलांडले आहेत. सेलिब्रेट करण्यासाठी, एक सक्सेस पार्टी आयोजित करण्यात आली होती ज्यामध्ये मानव सोहलचे मित्र शाहबाज खान, वीरेंद्र सक्सेना, अर्शिन मेहता, श्रावणी गोस्वामी आणि बरेच पाहुणे उपस्थित होते. कृपया सांगा की 'मैं राज कपूर हो गया' चे दिग्दर्शक मानव सोहल, निर्माता मुकेश शर्मा, अर्पित गर्ग, सह-निर्माते अर्शद सिद्दीकी आणि साहिल मलिक आहेत. या चित्रपटात राज कपूरच्या उत्कट चाहत्याची भूमिका साकारणारा अभिनेता आणि दिग्दर्शक मानव सोहल म्हणाला, "या चित्रपटाची कथा झुग्गी झोपरी येथे राहणाऱ्या लोकांवर आधारित आहे. हा चित्रपट राजच्या चरित्रावर आधारित नाही. कपूर, पण राज कपूरच्या एका चाहत्याची गोष्ट. शीर्षकावरूनच अंदाज लावता येतो की एक कट्टर चाहता "मैं राज कपूर हो गया" म्हणतोय. राज कपूर त्या चाहत्यासाठी देवासारखा आहे, तो त्याला खूप आवडतो, प्रेम करतो. त्याला.त्याच्या आयुष्याला या अफेअरमध्ये कसं वळण लागतं,त्याचं ज्याच्यावर प्रेम होतं त्याचं काय होतं.तो राज कपूरचा खूप मोठा चाहता आहे,त्यांच्यासारखे कपडे घालतो,गाणी गातो.खरं तर आम्ही राज कपूरची विचारधारा पडद्यावर मांडण्याचा प्रयत्न केला आहे.त्याची विचारसरणी मोठी आहे. ते साधे होते, सामान्य माणसाची व्यक्तिरेखा ते अतिशय सहजतेने मांडायचे, प्रेम, नाते, बंधुता, माणुसकी यांना ते खूप महत्त्व देत असत. आमचा चित्रपट सत्य घटनांनी प्रेरित आहे. माझ्या वैयक्तिक आयुष्यातील घटना असोत किंवा दुसऱ्यावर घडलेल्या सत्य घटनेला मी दृश्याचे स्वरूप दिले आहे. रस्त्यावर एखादी व्यक्ती जखमी झाली की, रुग्णालयात नेण्यापूर्वी माणूस त्याचा धर्म, जात विचारत नाही. म्हणूनच माझ्या चित्रपटात एक संवाद आहे की देवाने अपूनला माणूस बनवून इथे पाठवले आणि इथल्या लोकांनी धर्माला जात बनवली..." राज कपूर मानत होते की माणूस हा माणूस असतो, धर्म आणि जात नंतर येतात. हाच संदेश हा चित्रपट देतो. चित्रपटाचे संपूर्ण शूटिंग रिअल लोकेशनवर झाले असून चित्रपटातील सर्व पात्रांची निवड त्यांच्या अभिनयाच्या आधारे करण्यात आली आहे.




या चित्रपटाची निर्मिती मुकेश शर्मा, ब्रँडेक्स एंटरटेनमेंटचे अर्पित गर्ग, असोसिएट प्रोड्यूसर अर्शद सिद्दीकी आणि साहिल मलिक यांनी केली आहे. या चित्रपटाचे संगीत ब्रँडेक्स म्युझिकवर रिलीज करण्यात आले आहे. चित्रपटातील 'तेरा मुस्कुराना नजरें झुकाना' हे गाणे बॉलिवूडचे प्रसिद्ध गायक जावेद अली यांच्या आवाजात रेकॉर्ड करण्यात आले असून, हे रोमँटिक गाणे असून त्याचे बोलही मानव सोहल यांचे आहेत. मानव संगीतकाराला सांगायचा की त्याला कोणत्या प्रकारचे गीत हवे आहेत आणि शेवटी मानवने संपूर्ण गाणे लिहिले. चित्रपटात हे गाणे फ्लॅशबॅकमध्ये दिसते. मानव आणि अर्शिन मेहता यांच्यावर हे गाणे चित्रित करण्यात आले आहे. जुने कपडे, जुन्या पॅटर्नची बाईक, झोपडपट्टीचा परिसर या गाण्यात पाहायला मिळणार आहे. चित्रपटाला वास्तववादी टच देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. हा चित्रपट 17 फेब्रुवारी 2023 रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित होणार आहे. त्याचा ट्रेलर 14 जानेवारी 2023 रोजी मकर संक्रांतीच्या मुहूर्तावर रिलीज होणार आहे.

**रमाकांत मुंडे, मुंबई**




# सनातन समरसतेचे दर्शन

## साधूमहात्म्यांचे सान्निध्य, दर्शन व आशीर्वचनातून घडले

आधुनिक केसरी

महामंडलेश्वर जनार्दन हरीजी महाराज यांच्या संकल्पनेतून व नेतृत्वाखाली सतपंथ चॅरिटेबल ट्रस्ट फैजपूर व अखिल भारतीय सनातन सतपंथ परिवार यांच्यातर्फे 29 ते 31 डिसेंबर 2022 दरम्यान फैजपूरजवळील वढोदे येथे नव्यानेच उभारण्यात आलेल्या निष्कलंक धाम परिसरात समरसता महाकुंभ पार पडला. देशभरातील साधूमहात्म्यांचे सानिध्य, दर्शन व आशीर्वचनातून विविध संप्रदायांमधील सनातन समरसतेचे दर्शन घडले. धार्मिक व अध्यात्मिक दृष्टिकोनातून सर्वच साधूमहात्म्यांनी एकतेची व समरसतेची गरज पटवून दिली. एकूणच बंधुभाव, प्रेम, समानता, धर्मरक्षण, वात्सल्य यांच्या एकत्रिकरणातून किंबहुना अमृतमंथनातून हा समरसता महाकुंभ यशस्वी ठरला.

**भव्य शोभायात्रा** – समरसता महाकुंभाच्या शुभारंभप्रसंगी पिंपरूड फाटा ते वढोदे येथील निष्कलंक धामपर्यंत तब्बल तीन किलोमीटर काढण्यात आलेल्या शोभायात्रेच्या माध्यमातून श्रीविष्णू परमात्म्याच्या दशावतार कथेत असलेल्या विविध अवतारांचे सजीव देखाव्याचे दर्शन घडविण्यात आले. तसेच यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद आणि ऋग्वेद अशा चार वेदांसह विविध ग्रंथांचे सजीव दर्शन ग्रंथाच्या प्रतिकृती होत्या. इतर देवीदेवतांचे देखील सजीव दर्शन झाले. श्रीरामाचा सचिव देखावा साकारताना लक्ष्मण, सीता, हनुमान यासह विविध पात्रांचे सजीव देखावे साकारण्यात आले. श्रीकृष्ण, परशुरामाची वेशभूषा धारण केलेले सजीव देखावे शोभायात्रेचे मुख्य आकर्षण होते. सुरूवातीला कलशधारी बालिका व महिला, त्यानंतर विविध भजनी मंडळ संतांचे अभंग गात आणि पावली खेळत चालत होते. संपूर्ण भारतभरातून आलेले संतमहंत यांची अश्वारूढ रथातून मिरवणूक काढण्यात आली. प्रत्येक रथात चार ते पाच संत अशा पद्धतीने सुमारे 25 रथ एका मागोमाग शोभायात्रेत सहभागी झाले होते. सोबतच सतपंथाचा ध्वज होता.

**निष्कलंक धाम लोकार्पण** – फैजपूरजवळील वढोदे येथे नव्यानेच उभारण्यात आलेल्या निष्कलंक धामचे लोकार्पण यासह सतपंथ मंदिर संस्थान फैजपुरचा चतुःशताब्दी रौप्य महोत्सव, अखिल भारतीय संत संमेलन फैजपूरचा दशाब्दी महोत्सव, महामंडलेश्वर श्रीजनार्दन हरीजी महाराज यांचा साधूदीक्षा रौप्य महोत्सव, श्रीजनार्दन हरीजी महाराज यांचा महामंडलेश्वर पट्टाभिषेक दशाब्दी महोत्सव, परमपूज्य ब्रह्मलीन गुरूदेव जगन्नाथजी महाराज यांची 21 वी पुण्यतिथी, तुलसी हेल्थ केअर सेंटरचा लोकार्पण समारंभ आणि श्रीजगन्नाथ गौशाला भूमिपूजनाचा समारंभ समरसता महाकुंभात पार पडला.

**संतवाणी व आशीर्वचन** – महाकुंभात तीनही दिवस देशभरातून आलेल्या शेकडो साधूमहात्म्यांचे सानिध्य, दर्शन व आशीर्वचनातून आध्यात्मिक ऊर्जा मिळाली. त्यातील जगद्गुरु शंकराचार्य वासुदेवानंद सरस्वती महाराज, ज्ञानेश्वरदासजी महाराज, ज्ञानदेवसिंहजी महाराज, अविचलदासजी महाराज, धर्मदेवजी महाराज, जितेंद्रानंदगिरी महाराज, पंकजदासजी महाराज, राजेंद्रदासजी महाराज, ब्रह्माकुमारीज रामनाथ भाई, स्वामी अद्वैत अमृतानंदजी महाराज, जितेंद्रनंदजी महाराज, आचार्य मानेकर शास्त्री महाराज, बाळकृष्णदासजी महाराज, अनंत देवगिरीजी महाराज, रवींद्रगिरीजी महाराज, पुरुषोत्तमदास महाराज, गोपाल चैतन्यजी महाराज, देवेंद्रानंदगिरीजी महाराज, महंत बालकादासजी महाराज, पद्मश्री ब्रम्हेशानंदजी महाराज, गौरीशंकरदासजी महाराज, चिदानंदगिरीजी महाराज, स्वामी वेदानंदजी महाराज, कमलनयनदासजी महाराज, अविचलदासजी महाराज, फुलोबिहारीदासजी महाराज, जगद्गुरु रामानंदाचार्य रामराजेश्वराचार्यजी महाराज, आचार्य संदेश श्रवणजी, दिव्यानंदजी महाराज, ईश्वरदासजी महाराज, हरिचैतन्य महाराज, नरसिंहदासजी महाराज, भक्ती किशोरदासजी महाराज, शरणदासजी महाराज, ज्ञानेश्वरदासजी महाराज, सुरेश सदाशिव भैयाजी जोशी यांनी मार्गदर्शन केले. राधे राधे बाबा महाराज तीनही दिवस उत्कृष्ट सूत्रसंचालन केले.

**हिंदू जागृत होण्याची गरज** – अनंत देवगिरीजी महाराज यांनी आपल्या मनोगतातून हिंदू जागृत होण्याची गरज असल्याचे सांगितले. समरसता शब्दाला समानार्थी शब्द मानवता आणि मानवतेला समानार्थी शब्द हिंदुत्व आहे. कायद्यातील काही नियमांमुळे हे राष्ट्र विभागले जात आहे. 370 कलम हटवावे अशी मागणी पूर्वीपासून होती, ती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पूर्ण केली आहे. आता कलम 30 देखील हटवावा आणि देशात समान नागरी कायदा आणला जावा, जेणेकरून देश हा विविध तुकड्यांमध्ये विभागला जाणार नाही. त्यासाठी हिंदू जागृत होण्याची गरज आहे, असे ते म्हणाले. त्यांच्यानंतर अनेक महाराजांनी त्यांचे हे मुद्दे उचलून धरले.

**ब्रह्मभोजन** – समरसता महाकुंभात आलेल्या सर्वांसाठी तिनही दिवस ब्रह्मभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. त्याचा लाभ सुमारे लाखो भाविकांनी घेतला. सकाळी नाश्ता, दुपारी व संध्याकाळी जेवण अशा पद्धतीने अत्यंत नियोजनपूर्वक आणि उत्कृष्ट भोजनाचा आस्वाद देण्यात आला. **दानदाता सन्मान समारंभ** – वढोदे येथे बांधण्यात आलेल्या श्रीनिष्कलंक धाम, तुलसी हेल्थ केअर सेंटर व श्रीजगन्नाथ गौशाला या प्रकल्पाला जनार्दन हरीजी महाराज यांच्यावर विश्वास व श्रद्धा असलेल्या भाविकांनी तन-मन-धनाने भरभरून सहकार्य केल्याने त्यांना जगद्गुरु व साधूमहात्म्यांचे हस्ते सन्मानपत्र देऊन आशीर्वाद दिले. तसेच तीन दिवसाचे जेवण, नाश्ता, मिनरल वाटर, बॅनर, स्टिकर, ड्रायफ्रूट, स्टेज, साऊंड सिस्टिम, फोटो, व्हिडिओ, मंडप, फुल माळा, निमंत्रण पत्रिका अशा वेगवेगळ्या कामांसाठी दान मिळाले.

**आयुर्वेदाचार्य श्रीधन्वंतरी याग** – महाकुंभात अखंड नामजप व नामसंकीर्तन करण्यात आले. तसेच जळगाव येथील श्रीकांत रत्नपारखी यांच्या नेतृत्वाखाली आयुर्वेदाचार्य श्रीधन्वंतरी पार पडला. यात पहिल्या दिवशी मंडप प्रवेश, देवता स्थापन व हवन, दुसऱ्या दिवशी प्रातःपूजन, हवन, अर्चन, दीपोत्सव तर तिसऱ्या दिवशी बलिपूजन व पूर्णाहुतीने सांगता झाली.

**वैद्यकीय उपचारावर भर** – समरसता महाकुंभामध्ये संजीवनी ब्लड सेंटर फैजपूर यांच्यातर्फे आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात 305 रक्तदात्यांनी रक्तदान केले. मोफत वैद्यकीय तपासणी शिबिरात गुजरात येथील डॉक्टरच्या टीमकडे 700 रूग्णांनी तपासणी करून औषधोपचार घेतले तर महाराष्ट्रीयन डॉक्टर टीम यांच्याकडे 1200 रूग्णांनी औषधोपचार घेतले. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर कोविड वॅक्सिनेशन शिबिरात 66 जणांनी लसीकरण करून घेतले.

**लाखो भाविकांचा सहभाग** – समरसता महाकुंभासाठी उभारण्यात आलेला सभामंडप भव्य दिव्य स्वरूपाचा होता. यात हजारो भाविक बसतील अशी व्यवस्था होती. दुरून व्यासपीठ दिसणार नाही म्हणून एकाच सभामंडपात सात डिजिटल बोर्ड लावण्यात आले होते. समोरच ध्वजारोहणाचा उंच स्तंभ सगळ्यांचे लक्ष वेधून घेत होता. फक्त महाराष्ट्रच नव्हे तर गुजरातसह इतर राज्यातून किंबहुना देशाच्या कानाकोपऱ्यातून शेकडो साधूमहात्मे आणि लाखो भाविक समरसता महाकुंभाचा लाभ घेण्यासाठी आले होते. महाराष्ट्रासह बाहेरील राज्यातील भाविकांची देखील संख्या जास्त होती. गुजरात राज्यातून तर सुमारे 30 लक्झरी, चार चाकी वाहने आणि आगगाडीने भाविक समारंभात सहभागी होण्यासाठी दाखल झाले होते. तिनही दिवस त्यांच्या निवासाची व ब्रह्मभोजनाची उत्कृष्ट व्यवस्था करण्यात आली.

उत्कृष्ट व्यवस्थापन - महामंडलेश्वर जनार्दन हरीजी महाराज यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या समरसता महाकुंभाचे व्यवस्थापनही उत्कृष्ट असे होते. सभामंडप, ब्रह्मभोजन, पार्किंग, निष्कलंक धाम, विविध स्टॉल यासह अनेक ठिकाणची शिस्तबद्ध व्यवस्था स्वयंसेवकांनी सांभाळली. विशेष म्हणजे प्रत्येक ठिकाणची व्यवस्था एकेका गावच्या स्वयंसेवकांना सोपवून देण्यात आली होती, त्यांनी ती अत्यंत प्रामाणिकपणे पार पाडली.

**महामंडलेश्वर जनार्दन हरीजी महाराज भावुक** – तीनदिवसीय समरसता महाकुंभात महामंडलेश्वर जनार्दन हरीजी महाराज ब्रह्मलीन गुरूवर्य जगन्नाथ महाराज यांचे स्मरण, वडील लहेनसिंग कट्यारसिंग चव्हाण व आई सौ. कांताबाई लहेनसिंग चव्हाण यांचा त्याग व समर्पणाची भूमिका आणि महाकुंभात अहोरात्र सेवा देणारे स्वयंसेवक यांच्याविषयी बोलताना भावुक झाले व त्यांचे डोळे अश्रूंनी डबडबले. महाकुंभात वेळोवेळी बोलतांना त्यांनी सर्वांचे मनःपूर्वक आभार मानले. तसेच समारोपात बोलतांना ते म्हणाले की, गायरान जमिनीवर मस्जिद अथवा मंदिर नाही तर गायींसाठी ती जमीन असावी, यासाठी पुढाकार घेण्याचे काम सध्या सुरू आहे. गायरानची जमीन खाली होत नसेल तर अखिल भारतीय संत समितीचे 180 आखाडे आंदोलन करण्याचा इशाराही त्यांनी यावेळी दिला. गाय हा आमच्या श्रद्धेचा भाग आहे. अनधिकृत गोवंश वाहतूक बंद करावी, गोहत्या व कत्तलखाने बंद करावे, वर्षानुवर्षे गावोगावी असलेली गायरान जमीन ही मस्जिदच काय परंतु मंदिरासाठी पण कोणाला देऊ नये. ती फक्त आणि फक्त गायींसाठीच राखीव ठेवावी, असा कायदा शासनाने करावा, ही अखिल भारतीय संत समितीची मागणी त्यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केली.

**पादत्राणेविना नियोजन** – समरसता महाकुंभ नियोजन झाल्यापासून आयोजन होईपर्यंत व संपूर्ण महाकुंभ पार पडेपर्यंत अखिल भारतीय संत समितीचे खजिनदार सतपंथरत्न महामंडलेश्वर जनार्दन हरीजी महाराज यांनी पादत्राणे न घालता अनवाणी राहून सर्व कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन केले. त्यांचा संकल्प पूर्णतः सिद्धीस गेल्याने सौ. ज्योत्स्नाताई ठोंबरे व महाराजांच्या मातोश्री सौ. कांताबाई लहेनसिंग चव्हाण यांच्या हस्ते पुरोहित रत्नपारखी महाराज जळगाव यांच्या मंत्र उपचाराने विधिवत पाद्यपुजन करून पादत्राणे पायात घातली. यावेळी महाराजांसह सर्वांच्या डोळ्यात आनंदाश्रू वाहू लागले. यावेळी त्यांचे उत्तराधिकारी एकदंत महाराज यांच्यासह उपस्थित सर्व गद्गदीत झाले. धर्मध्वज, सभामंडप व अग्नी पूजेने समरसता महाकुंभाची सांगता - धर्माध्वजाची पूजा करून सन्मानपूर्वक खाली उतरविण्यात आला. त्याचबरोबर भव्य सभामंडप व रसोई घरातील अग्नीची पूजा करून त्यांना नमन करून शांत करण्यात आले.

**स्वच्छतेने समारोप** – समरसता महाकुंभातील प्रत्येक गोष्ट नोंद घेण्यासारखी आहे. लाखो भाविकांची उपस्थिती लाभल्यानंतर परिसरात उभारण्यात आलेला सभामंडप, ब्रह्मभोजन व पार्किंगची सुविधा आदी ठिकाणी तात्पुरत्या स्वरूपात लावण्यात आलेले मंडप काढून तेथील परिसराची स्वच्छता करण्यात आली. परिसरातील शेतकऱ्यांनी महाकुंभासाठी शेती उपलब्ध करून दिली. त्यामुळे त्यांच्या शेतीत जमा झालेला कचरा तसेच प्लास्टिक व इतर वस्तू जमा करून स्वच्छता मोहीम देखील राबविण्यात आली. जमा झालेला कचरा खड्ड्यात पुरणार असून कुठेही नदी, नाले या ठिकाणी फेकला जाणार नाही. सुमारे दीडशे स्त्री-पुरुष स्वयंसेवकांनी परिसरातील कचरा, फुलमाळा, प्लास्टिक, कागद, कॅरीबॅग व अन्य निरूपयोगी वस्तू एकत्र करून त्यांची विल्हेवाट लावली. दहा वर्षाआधी पार पडलेल्या अखिल भारतीय संत संमेलनाप्रमाणे हा समरसता महाकुंभ हा इतिहासाचा साक्षीदार राहणार आहे. निसर्ग, नियती व प्रकृती सोबत असल्याने कोणतीही अडचण आली नाही. तरूणांचे मोठ्या प्रमाणात संघटन होऊन त्यांच्या हातून देशधर्माचे कार्य झाले. त्यामुळे प्रत्येक ठिकाणी याच महाकुंभाची चर्चा आहे.



– डॉ. जगदीश पाटील,
भुसावळ (8149498020)


# जोशी मठ धोका; १९६४ सालच्या इशाऱ्याकडे दुर्लक्ष

आधुनिक केसरी

जोशी मठ हे उत्तराखंडमधील एक पर्यटनस्थळ. लोकसंख्या १६ हजार व समुद्रसपाटीपासूनची उंची ६१५० फूट आहे बद्रीनाथ सह त्या परिसरात अन्य धार्मिक स्थळे व ट्रेकिंगसाठी येणाऱ्यांना हे राहण्याचे ठिकाण आहे. चार पिठापैकी एक हे प्रवेशद्वार असल्यामुळे येथे नेहमीच भाविकांची गर्दी असते येथे गेल्या काही दिवसापासून काही ठिकाणी जमिनीला मोठे तडे गेले आहेत. जमीन खचू लागल्याने घरांना धोका निर्माण झाला आहे. सुमारे ६०० कुटुंबाचे स्थलांतर करावे लागणार आहे. १९६४ साली प्रथम या संकटाची चाहूल लागली होती त्यावेळी गढवालचे तत्कालीन जिल्हाधिकारी एम सी मिश्रा यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती. या समितीत एकूण १८ सदस्य होते. जोशी मठ हे शहर संकटात असल्याचे या समितीने त्याचा वेळी दाखवून दिले होते ही बातमी नुकतीच वाचली. मुळातच हा भाग भूकंप प्रवण व भुस्खलन प्रवण आहे.

वातावरणाचा परिणाम व जमीन तुलनेने भुसभुशीत आहे या भागात बेसुमार बांधकामे, रस्ते बांधणी धरणे वीजनिर्मिती प्रकल्प उभारण्यात आले आहेत. जलविद्युत प्रकल्पासाठी बोगदे खणण्यात आले आहेत. गेल्या काही दशकात झालेल्या बांधकामामुळे डोंगराचे उतार कमालीचे भुसभुशीत बनले आहेत. सन २०१३ मध्ये केदारनाथ येथे जो पूर आला होता त्यामुळे येथील परिस्थिती आणखीनच भयावह झाली आहे. १९६४ साली मिश्रा कमिटीने दिलेला इशारा जर मानला असता व त्याप्रमाणे कार्यवाही केली असती, तर हा आत्ताचा प्रसंग कदाचित ओढविला गेला नसता असे वाटते.

**शांताराम वाघ, पुणे**
**96234 525 53**



# अंधेरीतील ५००० कोटी रुपयांची कामगार हॉस्पिटलची जागा 'अदानी'च्या घशात घालण्याचा डाव : राजेश शर्मा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** अंधेरीतील कामगार हॉस्पिटल मागील चार वर्षापासून दुरुस्तीच्या नावाखाली बंद आहे.



आतापर्यंत २५० कोटी रुपये दुरुस्तीसाठी व ५० कोटी रुपये वैद्यकीय साहित्य खरेदीसाठी देण्यात आले असून ESI CORPORATION हे हॉस्पिटल पुन्हा सुरु करण्यास इच्छुक दिसत नाही. अंधेरीच्या कामगार हॉस्पिटलची पाच हजार कोटी रुपये किमतीची जवळपास १२ एकर जमीन अदानी या उद्योगपतीच्या घशात घालण्याचे षडयंत्र असल्यानेच हे हॉस्पिटल सुरु केले जात नाही, असा गंभीर आरोप करून एक महिन्याच्या आत सरकारने हे हॉस्पीटल सुरु केले नाही तर तीव्र आंदोलन करू असा इशार महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस राजेश शर्मा यांनी दिला आहे. गांधी भवन येथे पत्रकार परिषदेत बोलताना राजेश शर्मा म्हणाले की, अंधेरीमध्ये १९७७ साली या कामगार हॉस्पिटलची स्थापना करण्यात आली व २००८ सालापर्यंत हे हॉस्पिटल राज्य सरकारच्या अधिपत्याखाली चालत होते. त्यानंतर हे हॉस्पिटल ESI कार्पोरेशनने १४ एप्रिल २००८ रोजी त्यांच्याकडे वर्ग करुन घेतले. कर्मचारी राज्य विमा महामंडळाने या हॉस्पिटलचे आधुनिकीकरण करुन ५०० बेडसचे हॉस्पिटल केले व मेडीकल कॉलेजही सुरु केले. या रुग्णालयात १७ डिसेंबर २०१८ रोजी आगीची दुर्घटना घडली व त्यात १३ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला व १५० जण जखमी झाले. ही दुर्घटना होण्याआधी या रुग्णालयात OPD , IPD (350 बेड्स) ICU आणि सुपर स्पेशालिटी सुविधा २४ तास सुरु होत्या. पॅथॉलॉजी, रेडिओलॉजी, एक्स-रे, सीटी-एमआरआय, ऑपरेशन थिएटसह सर्व अत्याधुनिक सोयीसुविधांनी हे रुग्णालय सुसज्ज होते. OPD विभागात दररोज १८०० ते २००० रुग्ण भेट देत होते, ब्लड बँकेची सुविधाही उपलब्ध होती. महाराष्ट्रातील अनेक शहरातून कामगार अंधेरीच्या हॉस्पिटमध्ये उपचारासाठी येत होते. मोठ-मोठ्या शस्त्रक्रियाही मोफत केल्या जात होत्या. कामगारांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी, त्यांना योग्य त्या सुविधा मिळाव्यात या हेतूने तत्कालीन पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते २४ फेब्रुवारी १९५२ साली कामगार विमा योजना सुरू करण्यात आली. आजच्या तारखेला देशभरातील ३.५ कोटी कामगार विमा महामंडळाचे सदस्य आहेत तर महाराष्ट्रातील ४५ लाख कामगार सदस्य आहेत. कामगारांना चांगल्या आरोग्य सुविधा मिळव्यात या हेतूने देशभर कामगार हॉस्पिटल्सही उभारण्यात आली. अंधेरीतील कामगार हॉस्पिटल हे यातील एक महत्वाचे व सर्व सुविधांनीयुक्त असे हॉस्पिटल होते पण मागील चार वर्षांपासून हे हॉस्पिटल बंद असल्याने कामगारांना हालअपेष्टा सहन करत कांदीवलीच्या हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी जावे लागते. हॉस्पिटल सुरु होत नसल्याने कामगारांमध्ये प्रचंड असंतोष आहे. हॉस्पिटमधील २५० डॉक्टर व ५०० जणांचा वैद्यकीय स्टाफ इतरत्र वर्ग करण्यात आला. अंधेरीतील कामगार हॉस्पिटल बंद करून लाखो कामगारांच्या आरोग्याशी खेळून ही जागा उद्योगपतीच्या घशात घातली जात आहे. केंद्रीय कामगार मंत्रालयाकडे याप्रश्नी आम्ही सातत्याने पाठपुरावा करत आहोत पण त्याला समाधानकारक उत्तर मिळत नाही. केंद्र सरकार बरोबरच महाराष्ट्र सरकारनेही यात लक्ष घालून वस्तुस्थिती स्पष्ट करावी व याच जागेवर कामगार हॉस्पिटल पुन्हा सुरु करावे, सरकारने यावर तातडीने निर्णय करावा अन्यथा तीव्र आंदोलन करू असेही राजेश शर्मा म्हणाले.

# बिलोलीचे भूमिपुत्र बी.पी.नरोड यांच्या हस्ते व्यापाऱ्यांना कर्ज वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**ज्ञानेश्वर शिरगिरे**

**बिलोली :** नगरीतील भुमीपुत्र असलेल्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील सेवा निवृत्त महालेखा वित्त अधिकारी तथा बिलोली येथील पिपल्स  मल्टी अर्बन निधी बँकेचे मुख्य वित्तीय सल्लागार बि.पी.नरोड यांच्या शुभहस्ते बिलोली शहरांत व्यापारी बांधवांना कर्ज वाटप करण्यात आले आहे.

राजकीय पुढारी व लोकप्रतिनिधी तथा राष्ट्रीय कृत बँकेच्या दुर्लक्षित प्रवृत्ती मुळें बिलोली शहरातील व्यापारी बांधव आर्थिक दृष्ट्या अत्यंत अडचणीत सापडला आहे. अश्या बिकट परिस्थितीत बिलोली शहरातील व्यापारी बांधवांना नवसंजीवनी देण्याचं काम पिपल्स मल्टीअर्बन निधी बँकेच्या माध्यमातून बि.पी. नरोड यांनी केलेली आहे.

तीन राष्ट्रीयकृत बँका, शासनमान्य तीन सहकारी बँका,एक सहकारी खाजगी बँक कोंडलवाडी शहरात कार्यरत आहेत.मात्र लोकप्रतिनिधींच्या अक्षम्य दुर्लक्ष प्रवृत्ती मुळें तालुका स्तरीय बिलोली नगरीत फक्त एक राष्ट्रीयकृत बँक आणि एक सहकारी डबघाईस आलेली शासनमान्य बँक आहे.या दोन्ही बँकेचे व्यापाऱ्यांवर सहकार्य करण्यांत हात आखडता घेण्याची वाढीव प्रवृत्ती. या बाबींमुळे बिलोली नगरातील व्यापारी बांधवांवर आर्थीक संकट गडद झालेले असतांनाच ,बि.पी.नरोड यांच्या पिपल्स मल्टी अर्बन निधी बँकेमार्फत



व्यापारी बांधवांना कमी व्याजदरात आणि कमी वेळेत कर्ज उपलब्ध करून देण्यात येत आहेत. बिलोली नगरीतील वेल्डिंग वर्क्स आणि हार्ड वेअर व्यापारी दादेमियॉ,राईस मर्चंट चे मैनु इसाक कासराळीकर, गजानन रेडीमेड या व्यापारी प्रतिष्ठांनाना नुकतेच बि.पी.नरोड यांच्या हस्ते प्रत्येकी दोन लाख रुपयांचे कर्ज वाटप करण्यात आले आहे. बिलोली शहरातील व्यापारी बांधवांसह समाजातील विविध घटकांनी देखील बि.पी. नरोडसह पिपल्स मल्टीअर्बन निधी बँकेचे आभार मानीत आहेत.

# इंदुरीकर महाराजांच्या सासू भाजपात

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** प्रसिद्ध कीर्तनकार निवृत्ती महाराज इंदुरीकर यांच्या सासू शशिकला पवार यांनी भाजपात प्रवेश केला. त्या अहमदनगर जिल्ह्यातील निळवंडे गावच्या सरपंच आहेत. नुकत्याच झालेल्या ग्रामपंचायत निवडणुकीत शशीकला पवार अपक्ष म्हणून निवडून आल्या होत्या. राज्याचे महसूलमंत्री आणि भाजपा नेते राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थित त्यांनी भाजपात प्रवेश केला. यानंतर त्यांना तुम्ही भाजपात प्रवेश का केला? असा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर त्यांनी त्यांची भूमिका स्पष्ट केली. शशिकला पवार म्हणाल्या, "मी भाजपात प्रवेश केला कारण मी ग्रामपंचायत निवडणुकीत अपक्ष म्हणून अर्ज भरला होता.



# मनपा सीबीएसई शाळेत 'स्पोर्ट्स डे' साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** महानगरपालिका औरंगाबादच्या गारखेडा येथील सीबीएसई शाळेमध्ये आज स्पोर्ट्स डे साजरा करण्यात आला. स्पोर्ट्स डेचे उद्घाटन मनपा उपायुक्त नंदा गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली झाले. याप्रसंगी प्रमुख अतिथी शिक्षणाधिकारी संजीव सोनार हे होते. संजीव सोनार यांनी आपल्या भाषणामध्ये पालकांना सांगितले की मुलांच्या हातातील मोबाईल आणि व्हिडिओ गेम कमी द्या व त्यांना मैदानावर खेळू द्या त्यामधूनच मुलांचा सर्वांगीण विकास होईल. प्रमुख अतिथींचे स्वागत मुख्याध्यापक शशिकांत उबाळे व प्रतिभा कुलकर्णी यांनी केले. प्रारंभी शाळेच्या सर्व विद्यार्थ्यांनी मार्च पास करून मानवंदना दिली. त्यानंतर स्पर्धेत सुरुवात झाली. सुरुवातीस रस्सीखेच स्पर्धा झाली यामध्ये ज्युनिअर केजी ते तिसरीच्या वर्गातील विद्यार्थी विद्यार्थिनींनी सहभाग नोंदवला. तसेच विद्यार्थ्यांच्या अडथळा रेस, चमचा लिंबू ,100 मीटर धावणे, आणि क्रिकेट या स्पर्धा झाल्या या स्पर्धेतील विजेते विद्यार्थी पुढील प्रमाणे- त्यानंतर पालकांची देखील संगीत खुर्ची घेण्यात आली. यामधील विजेत्या पालकास त्यांच्या पाल्याच्या हस्ते गोल्ड व सिल्व्हर मेडल देण्यात आले. क्रीडा महोत्सव यशस्वी करण्यासाठी शाळेचे शिक्षक अमोल शेरखाने, अल्ताफ अहमद, दीपाली कोथार, अस्मिता अंभोरे, चारुशीला साळवे यांनी परिश्रम घेतले अशी माहिती मुख्याध्यापक शशिकांत उबाळे यांनी दिली.

# वैजापूरात हिंदी भाषिक श्रीमद भागवत कथा धर्म ध्वज अवतरण संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** शहरात प्रथमच हिंदी भाषेतून श्रीमद भागवत कथा संपन्न होणार असून ही कथा परमपूज्य शांतिदुत धर्मरत्न श्री देवकीनंदन ठाकुरजी महाराज यांच्या अमृत वाणीतून दि.२० जानेवारी पासून सुरु होत आहे या कार्यक्रमाचा धर्म ध्वज अवतरण व स्थळ भूमिपूजन समारंभ रविवार दिनांक ८ जानेवारी रोजी संपन्न झाला. या कथा 20 जानेवारी ते 26 जानेवारी पर्यंत रेल्वे स्टेशन रस्त्यावरील जीवनगंगा जवळ होणार आहे.

या प्रसंगी आयोजक अध्यक्ष राजुभाऊ जोगीलाल राजपूत,उपाध्यक्ष भाऊलाल रंभाजी सोमासे, ज्ञानेश्वर सोमासे व योगेश चंद्रपाल राजपूत यांनी सपत्नीक पूजा केली. या प्रसंगी माजी नगराध्यक्ष बाळासाहेब संचेती, माजी नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी व नगराध्यक्षा सौ. शिल्पाताई दिनेश परदेशी यांनी स्तंभ



पूजन व भूमिपूजन केले.

या प्रसंगी माजी आमदार भाऊसाहेब चिकटगांवकर, उपनगराध्यक्ष साबेर खान, संजय निकम, प्रशांत सदाफळ, कल्याण दांगोडे, ऍड.प्रतापराव निंबाळकर, दिनेश राजपूत, प्रेम राजपूत, उमेश वाळेकर, संजय बोरनारे, नगरसेवक गणेश खैरे, शैलेश चव्हाण, नगरसेविका अनिता तांबे, सुप्रिया व्यवहारे, मनीषा राजपूत, सुनीता राजपूत, राजेश गायकवाड, ज्ञानेश्वर जगताप, गौरव दौडे, भिकन लहामगे, कैलास पवार, विजय दायमा, संदीप निर्मळ, संदेश जेजुरकर,मनोज राजपूत, करण राजपूत, सोमु सोमवंशी, शुभम खैरे, योगेश बोर्डे, किशोर थोरात, अंकुश तुपे, कुणाल पटेल, जितू पवार, सागर राजपुत, संदीप पवार, मंगल राजपुत, प्रमोद राऊत, सागर बनकर, विक्रम राजपुत, महाजन भाऊ काहाटे, ईश्वर राजपुत, जीवन राजपुत, संदीप राजपुत, ऋषीकेश आसार, संतोष लोखंडे, अण्णा बंगाल, बापू सोनवणे, सचिन राजपुत, धीरज भाऊ राजपुत, संजू भाऊ राजपुत, सुधीर लालसरे, पप्पु राजपुत, प्रा. कोठारी, विजय चंदवडे, गणेश चांदवडे, प्रशांत शिंदे, अक्षय साठे यांच्या सह नागरिकांची उपस्थिती होती.

# कसदार गायन, मदमस्त वीणा-तबला वादनाने बालगंधर्व महोत्सवाचा समारोप

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** बालगंधर्व संगीत महोत्सवाचा 'प्रारंभ स्वर्गीय' आनंद देत झाला होता. आज तिसऱ्या दिवशी 'समारोप स्वर्णीम' अनुभुती देणारा झाला. आजचे वैशिष्ट्य होते देशपांडे पिता-पुत्र यांचे कसदार शास्त्रीय व उपशास्त्रीय गायन आणि भट पिता-पुत्र यांचे मदमस्त विणा वादन. या दोन्ही सत्रात संवादिनी व तबल्यावर साथ संगत करणाऱ्यांनी जुगलबंदीची कमाल केली. हा अनुभव रसिक सुवर्ण अक्षरात लिहून ठेवतील.

पहिल्या सत्रात ज्येष्ठ गायक पंडीत डॉ. राम देशपांडे व त्यांचे पुत्र गंधार यांनी सहगायनाचे सर्वोत्तम सादरीकरण केले. गंधार यांची आई सौ. अर्चना यांनीही साथसंगत केली. राम देशपांडे यांनी राग यमन कल्याणने प्रारंभ केला. 'जिया मानत नाही' हे हळूवार नजाकतीने सादर केले. गंधारही उत्तम गात होता. द्रुत ख्याल तिनतालात 'ननदिके बचनुवा सह न जाये' सादर केले. त्यानंतर डॉ. देशपांडे यांनी स्वरचित तराणा 'देनी देनी देनी तनन' हा एकतालात सादर केला. देशपांडे यांच्या गायनात अनेक मान्यवर शास्त्रीय गायकांची झलक होती.

डॉ. देशपांडे यांनी गायन करण्यापूर्वी राग व गाण्याचे बोल सांगितले. त्यामुळे गाण्यांची ओळख रसिकांना झाली. ते त्यांना आवडले. ज्येष्ठ गायिका किशोरीताई अमोणकर यांनी अजरामर केलेले 'बोलावा विठ्ठल, पहावा विठ्ठल' हा अभंग खूप उंचावर घेऊन गेला. पंडित जितेंद्र अभिषेकी यांचा ठसा असलेले 'सूरत पिया बिन छिन बिसराये' हे पद सर्व सुरात, लयीत व आलापात सादर करून रसिकांना मंत्रमुग्ध केले. गंधार हा गायनात पित्याच्या एक पाऊल पुढे असणार हे अनुभवाला आले. 'कौन जागता कौन सोता' या भजनाने समारोप झाला. देशपांडे यांना तबल्यावर रामकृष्ण करंबळेकर, संवादिनीवर अभिनय रवंदे, तानपुरावर मयूर पाटील, टाळ वाजवून वरूण नेवे यांनी साथसंगत केली.



दुसऱ्या सत्रात भट पिता-पुत्रांनी मोहन वीणा, सात्विक वीणावर जुगलबंदी सादर केली. यात तबलजी हिंमाशू महंत यांनी पुरेपूर ताल व ठेका धरला. पद्मभुषण व कनिडीयन ग्रमी ॲवार्ड विजेते पंडित विश्वमोहन भट व पुत्र सलिल यांनी मदमस्त सादरीकरण केले. दोघेही विणा वाजवत नाहीत. बोटांच्या करामतीने विणेच्या तारांमधून लीलया स्वर उमटवतात. स्वर पकडणे, स्वर विस्तारणे, स्वराला खेचणे आणि विरून टाकणे अशी थक्क करणारी, आनंदाला थिजवणारी कला तिघांनी सादर केली. प्रारंभी विश्वमोहन यांनी स्वरचित विश्वरंजनी रागामध्ये आलाप, जोड, झाला, विलंबीत तीन तालात मध्य-द्रुत लय सादर केली. विणा आणि तबल्याची जुगलबंदी भन्नाट होती. विश्वमोहन यांना सन १९९० मध्ये 'अ मिटींग बाय द रिव्हर' या रचनेसाठी ग्रॅमी ॲवार्ड मिळाला आहे. त्या रचनेची झलक त्यांनी सादर केली. समारोप 'जन गण मन' ने झाला. रसिकांच्या आग्रहास्तव 'आज जाने की जिद्द ना करो' हे गाणेही गायले. भट पिता-पुत्रांसह तबलजी महंतही कार्यक्रमात विस्तारले.

गेली २१ वर्षे बालगंधर्व संगीत महोत्सवाची सर्व आर्वतने अनुभवलेल्या काही रसिक श्रोत्यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. यात इंद्रराव पाटील, दिगंबर महाजन, सुदिप्ता सरकार, मेजर नाना वाणी, देविदास पाटील तसेच मायटी ब्रदर्सच्या तिसऱ्या पिढीचे प्रतिनिधी मिलींद थत्ते यांचा समावेश होता. २२ वा बालगंधर्व संगीत महोत्सव दि. ५, ६ व  ७ जानेवारी २०२४ ला होणार हे स्व. वसंतराव चांदोरकर प्रतिष्ठानचे कार्यकारी विश्वस्त दीपक चांदोरकर यांनी जाहीर केले.

# पक्षाचे माझ्यावर खूप मोठे उपकार

## कर्पे यांचे महापौर पदाच्या राजीनाम्यानंतर भावनिक उद्‌गार

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** हा राजीनामा देण्यासाठी माझ्यावर कुठल्याही व्यक्तीचा किंवा पक्षाचा दबाव नाही. पक्षाच्या आदेशानुसार राजीनामा दिला. पक्षाचे माझ्यावर खूप मोठे उपकार आहेत. एक सोडून दोनदा महापौर पदावर विराजमान झालो, हीच मोठी गोष्ट आहे, असे कर्पे यांनी सांगितले. महापौर खुर्चीला नतमस्तक होऊन व सर्व महापुरुषांना वंदन करून राजीनामा देण्यात आला. महापौर करपे यांच्या राजीनामा दिल्यानंतर कामांचा आराखडा व आरोप प्रत्यारोप यासाठी पत्रकार परिषद घेण्यात आली महापौर दालनात त्यांनी सर्व नगरसेवक व सर्व भारतीय जनता पार्टीचे मान्यवरांचे आभार मानले व भारतीय जनता पार्टीचे माझ्यावर खूप मोठे उपकार आहे असेही सांगितले काम करताना माझ्याकडून काही चुका झाल्या असतील तर त्यासाठी मी दिलगिरी व्यक्त



करतो असे करते म्हणाले महापौर असताना पहिला ठराव शहराच्या मध्यभागी छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा सुशोभीकरण, शहराला पाणी पुरवणारा अक्कलपाडा धरणाचे काम90% आमच्या कार्यकाळात झाले, महापालिकेच्या उत्पन्नासाठी JFI मॅपिंग साठी तोही ठराव माझ्या कारकिर्दीत झाला, मानधन वर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा पगार वाढवण्यात आला, धुळे शहरातील मोकाट कुत्र्यांसाठी श्वान निर्जीवीकरण काम चालू केले, घनकचऱ्याच्या ठराव माझ्या कारकिर्दीत झाला. रस्ते विकास निधीसाठी 30 कोटी निधीचा प्रस्ताव माझ्या कार्यकाळात झाला, अग्निशमन ची दुर्दैव अवस्था असताना नवीन अग्निशमन व्यवस्था ही करण्यात आली हे सर्व ठराव सभागृहात एक मताने मंजूर झालेत. स्वर्गीय गोपीनाथ जी मुंडे यांच्या नावाने मोठी मेडिकल लॅब सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे ही लॅब गोरगरिबांसाठी खूप लाभदायक ठरणार आहे. मॅग्नम संस्थेमार्फत एनजीओग्राफी फ्री मध्ये करण्यासाठी प्रयत्न करत आहोत, व मोठा सोलर प्रोजेक्ट उभा करण्यासाठी आम्ही मंजूर दिले आहे. काही कित्येक वर्षापासून शहरातील परिसर नामकरणाचा वाद मोठ्या प्रमाणे होता नवीन नामकरण देऊन तोही प्रश्न मार्गी लावला व महत्त्वाचे 100 कर्मचाऱ्यांच्या भरतीसाठी माझ्या कार्यकाळात मंजुरी देण्यात आली.

# पत्नीसह अडीच वर्षाच्या बाळाचा गळा आवळून खून; पती, सासू अटकेत

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** आज पहाटे २च्या सुमारास पैठणरोडवरील



धूत बंगल्यासमोर राहणाऱ्या बेरोजगार इसमाने आईच्या मदतीने पत्नी व मुलाचा दोरीने गळा आवळून खून केला. या प्रकरणी सातारा पोलिसांनी मयताच्या पती व सासू ला अटक केली आहे. समीर विष्णू म्हस्के व सुनिता विष्णू म्हस्के रा.भाग्यनगर अशी अटक आरोपींची नावे आहेत. तर आरती समीर म्हस्के(२६) व निशांत समीर म्हस्के(२वर्षे ५महिने) ही मयतांची नावे आहेत. २०१९ साली आरती व समीर यांचे लग्न झाले होते. पती समीर आणि सासु सुनिता आरतीच्या चारित्र्यावर संशय घेत तिचा शारिरीक मानसिक छळ करत होते. सोमवारी पहाटे २वा. समीर आणि त्याची आई सुनिताने आरतीच्या तोंडात बोळा कोंबून नायलॉन दोरीने गळा आवळला व हा प्रकार पाहणाऱ्या अडीच निशांतचाही खून केला. या प्रकरणी आरतीचे वडील सुतार(४९) रा.भाग्यनगर यांच्या फिर्यादीवरुन गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पो. नि. प्रशांत पोतदार करत आहेत.

# डॉ. धर्मराज सुरोसे महाराष्ट्र राज्य ग्रंथपाल महासंघ जिल्हाध्यक्षपदी

आधुनिक केसरी न्यूज

**शेवगाव :** येथील महात्मा फुले ग्रामविकास प्रतिष्ठानचे संस्थापक तथा राष्ट्रीय अटल



फाउंडेशनचे महाराष्ट्र कार्यकारी अध्यक्ष डॉ.धर्मराज एकनाथ सुरोसे यांची महाराष्ट्र राज्य ग्रंथपाल महासंघाचे अहमदनगर जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात येत असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य ग्रंथपाल महासंघाचे अध्यक्ष डॉ. रवींद्रजी भताने यांनी ही माहिती दिली.महाराष्ट्रातील अकृषी विद्यापीठ अंतर्गत महाविद्यालयीन, अभियांत्रिकीय, वैद्यकीय, अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयांमध्ये व शाळेमध्ये कार्य करणाऱ्या ग्रंथपालाना तसेच नेट, नेट, पीएचडी ,झालेल्या प्राध्यापकांना न्याय देण्यासाठी डॉ. रवींद्रजी भताने सचिव प्रा. ज्ञानेश्वरजी हिलाले यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र राज्य ग्रंथपाल महासंघाची स्थापना करण्यात आली आहे. अनुदानित वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक सवर्गातील ग्रंथपाल व शारीरिक शिक्षण संचालक या दोन्ही पदाचा शासन निर्णय तात्काळ काढावा. यासाठी शासनाकडे मागणी करण्यात येणार आहे. या निवडीबद्दल मा.नामदार चंद्रकांत दादा पाटील, नामदार राधाकृष्ण विखे पाटील, अतुल सावे, खा.डॉ.सुजय दादा विखे पाटीलआ. सुधीर तांबे ,आ.वसंत काळे, आ. नागो गाणार, आ कपिल पाटील ,आ. नरेंद्रजी दराडे महाराष्ट्र राज्य ग्रंथपाल महासंघाचे निवडीबद्दल आ. सुधीर तांबे आ. वसंत काळे ,आ.नागो गाणार, आ.कपिल पाटील , आ. नरेंद्रजी दराडे ,आ.मोनिकाताई राजळे ,आ.रामजी,शिंदे,आ.बबनरावजी पाचपुते , आ.बाळासाहेब ,थोरात ,आ. संग्राम भैया जगताप ,आ.अरुण काका जगताप आ.निलेश लंके,आ.शंकरराव गडाख महाराष्ट्र राज्य ग्रंथपाल महासंघाचे ,डॉ.काळे, डॉ.अमोल मोरे आदि प्राचार्य, प्राध्यापक ,शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी डॉ. धर्मराज सुरोसे यांचे या नियुक्तिबद्दल विशेष अभिनंदन होत आहे.



# दर्पण दिनानिमित्त गल्लेबोरगाव येथे पत्रकारांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील गल्लेबोरगाव येथे रविवारी मराठी पत्रकारितेचे जनक, आद्य दर्पणकार पंडित बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त अखिल भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचे औरंगाबाद जिल्हा उपाध्यक्ष मा. जगन्नाथ बापू खोसरे व महिला कॉंग्रेसच्या जिल्हा सरचिटणीस तथा सरपंच शोभाताई खोसरे यांच्या वतीने त्यांच्या निवासस्थानी तालुक्यातील सर्व दैनिकांचे, साप्ताहिकांचे, यूट्यूब चैनल चे पत्रकार, छायाचित्रकार यांचा भव्य असा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. दर्पण दिनाचे औचित्य साधून हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सर्वप्रथम कार्यक्रमाची सुरुवात दर्पणकार पंडित बाळकृष्ण जांभेकर यांच्या प्रतिमेस,स्मृतीस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. प्रथम तालुक्यातून आलेल्या सर्व पत्रकार बांधवांचा जगन्नाथ बापू खोसरे यांनी औक्षण करून,शाल, श्रीफळ व पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला. यावेळी महिला कॉंग्रेसच्या जिल्हा सरचिटणीस तथा सरपंच शोभाताई खोसरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले या समारंभासाठी गल्लेबोरगाव येथील चेअरमन तुकाराम हारदे, भ्रष्टाचार विरोधी न्यास चे तालुका अध्यक्ष उत्तमराव बढे, नईम शहा, गणेश तांदळे- वाघ पत्रकार सेवा संघाचे खुलताबाद तालुका कार्याध्यक्ष हरिदास सराटे यांच्यासह तालुक्यातील अनेक पत्रकार आणि ग्रामस्थ उपस्थित होते या नियोजित कार्यक्रमाचे सूत्रसंचालन खुलताबाद तालुक्यातील ज्येष्ठ पत्रकार वसंता शिरसाट यांनी केले तर आभार प्रदर्शन शिक्षक अनिल खोसरे यांनी केले.

# जिल्हास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत गुरुकुल ऑलिम्पियाड स्कूल अजिंक्य



आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** येथील बळीराम पाटील स्कूलच्या क्रीडा मैदानात 2 आणि 3 जानेवारी दरम्यान झालेल्या जिल्हा स्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत गुरुकुल ऑलिम्पियाड स्कूल ने युनिव्हर्सल स्कूलचा पराभव करीत विजेतेपद पटकाविले. अतिशय रंगतदार सामन्यात गुरुकुल ने पहिला सेट जिंकून बढत घेतली, पण 2 रा सेट युनिव्हर्सल स्कूल ने जिंकून सामन्यात वापसी केली, परंतु 3 ऱ्या सेट मध्ये अनिकेत देवकाते व वरद वैरागढ यांची उत्कृष्ट सर्व्हिस आणि इतर खेळाडूंनी दाखवलेल्या सांघिक खेळाच्या बळावर गुरुकुल ओलंम्पियाड ने अंतिम सामना 2-1अशा सेट ने जिंकला. खेळाडूंच्या यशाबद्दल शाळेचे प्राचार्य डॉ सतिश तांबट सर, मेंटोर गणेश साळुंखे सर, पूजा मॅडम, कविता मॅडम, रेशू मॅडम, रक्षदा मॅडमसह सर्व शिक्षक वर्गाने अभिनंदन केले. क्रीडा विभाग प्रमुख अविनाश सर, व्हॉलीबॉल प्रशिक्षक अभिषेक सर यांच्या मार्गदर्शना खाली संघाने यश संपादन केले. **विजेता संघ-** देवाशिष राऊत, उमर सय्यद, अद्वाईत क्षीरसागर, वरद वैरागर, आयुष्य कस्तुरे श्रीकर कोमूळवार, तनिश्क संकलचा, संस्कार परदेशीं, तन्मय भारंबे, मनोविजय गायकवाड, अथर्व मुंडे.

# पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी अजमेरा

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुका पत्रकार संघाची नूतन कार्यकारिणी



जाहीर केली. अध्यक्षपदी रवींद्र अजमेरा, उपाध्यक्षपदी सहयोग जावळे, सचिवपदी संतोष निकम, तर सल्लागार म्हणून कल्याण पाटील, विठ्ठल शिरसे, राजानंद सुरडकर, मुजीब खान यांची बिनविरोध निवड केली. प्रारंभी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांना व कन्नड पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष स्व. सुरेश केवट यांच्या प्रतिमेचे पूजन अभिवादन केले.

# सम्राट अशोककालीन बुद्धविहार, लेणींचे संवर्धन करणार

## केंद्रिय राज्यमंत्री रामदास आठवले यांचे बुद्धभूमी गडचांदूर येथे आश्वासन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** महाराष्ट्र आणि तेलंगणाच्या सीमेवरील गडचांदूर येथे सम्राट अशोककालीन शंभरहून अधिक बुद्धविहारांचे अवशेष सापडले असुन लेणी ही आहे. या प्राचीन बुद्धभूमी गडचांदूर ला दरवर्षी दि. 8 जानेवारीला विदर्भातील हजारो बौद्ध भेट देतात.या प्राचीन बुद्धभूमी गडचांदूर च्या 137 एकर जमिनीच्या विकासासाठी आराखडा तयार करावा. बुद्धभूमी गडचांदूर च्या संरक्षण आणि संवर्धनासाठी भारतीय पुरातत्त्व खात्याच्या अधिकारी आणि केंद्रीय मंत्र्यांसोबत बैठक घेऊन हा प्रश्न सोडवू असे आश्वासन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी केले. गडचांदूर बुद्धभूमी ला येण्यासाठी रस्ता नसून हा रस्ता तयार करण्यासाठी आपण प्रयत्न करू तसेच या रस्त्याच्या कामासाठी माझ्या राज्यसभा खासदार निधीतून 40 लाख रुपयांचा निधी देणार असल्याची घोषणा ना.रामदास आठवले यांनी यावेळी केली. यावेळी रिपाइंचे राष्ट्रीय संघटन सचिव भुपेश थुलकर; विदर्भ सरचिटणीस अशोक घोटेकर; दयाळ बहादूर; रिपाइंचे चंद्रपूर जिल्हा अध्यक्ष गौतम तोडे; सिद्धार्थ पाताडे; बाळू घरडे; निखिल कांबळे; बुद्ध भूमी गडचांदूर चे अध्यक्ष दशरथ डांगे; पंचशील युगप्रवर्तक संस्थेचे अध्यक्ष गौतम भासरकर; मधू बावलकर; ऍड.उराडे; प्रकाश भासारकर; प्रभाकर खाडे; किशोर डोंगरे; आदी अनेक मान्यवर उपस्थित होते. दरवर्षी 1 जानेवारी भिमाकोरेगाव येथे शौर्यदिनी देशभरातील आंबेडकरी जनता विजयस्तंभाला अभिवादन करते तसेच दि.8 जानेवारीला जागतिक धम्म ध्वज दिनी गडचांदूर ला विदर्भातील आंबेडकरी जनता एकत्र येते. या परिसराचा विकास झाल्यास येथे देशभरातील आंबेडकरी अनुयायी भेट देणे अधिक सुखकर होईल असे ना.रामदास आठवले म्हणाले.





# बालमटाकळीची यात्रा कुस्त्याच्या जंगी हगाम्याने गाजली

आधुनिक केसरी न्यूज

**शेवगाव :** नवसाला पावणारी व हाकेला धावणारी अशी माहूरची रेणुका देवीचे साक्षात रूप असणाऱ्या बालमटाकळी येथील श्री बालंबिका देवी यात्रा उत्सवात दोन दिवस चालणाऱ्या कुस्ती हागाम्यात महाराष्ट्रातील नामांकित मल्लांनी हगाम्यात हजेरी लावली, जोरदार चाललेल्या कुस्तीने यात्रेची सांगता करण्यात आली.

यात्रा उत्सवात उपसरपंच तुषार वैद्य, ज्ञानेश्वर कारखान्याचे माजी संचालक मोहनराव देशमुख, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती रामनाथ राजपुरे, मयुर वैद्य, नितीन काकडे, हरिश्चंद्र घाडगे, मोहनराव टोके, राम तांबे, भाऊसाहेब बामदळे, यात्रा उत्सव समितीचे कसममामा शेख संदिप देशमुख , अशोक खिळे, टिलु देशमुख, संदिप शिंदे, रमेश टोके , विष्णु घाडगे, दादा लोणकर, अपसर शेख, अनिल परदेशी, भारत घोरपडे, भिमराव पाटेकर, पांडूरंग निंबाळकर, विठ्ठल देशमुख, विक्रम बारवकर, काका भाकरे यांचे सह पोलिसांनी चोख बंदोबस्त बजावला होता.

# मत्स्योदरी विद्यालयात सूर्यनमस्कार स्पर्धा

## दोन हजार 900 विद्यार्थ्यांनी काढले 53 हजार सूर्यनमस्कार



आधुनिक केसरी न्यूज

**प्रा. बाळासाहेब बोराडे**

**जालना :** विद्यार्थ्यांचे शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य निरोगी राहण्यासाठी व्यायामाची फार आवश्यकता असते. विद्यार्थ्यांना शालेय जीवनापासुनच व्यायामाची गोडी निर्माण व्हावी म्हणून अंबड येथील मत्स्योदरी विद्यालयात सूर्यनमस्कार स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतल्याचे दिसून आले.

मत्स्योदरी विद्यालयातील इयत्ता पाचवी ते आठवी पर्यंतच्या 1720 विद्यार्थी आणि नववी ते दहावी पर्यंतच्या 1250 विद्यार्थी अशा एकूण दोन हजार 970 विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला होता.यामध्ये प्रत्येक विद्यार्थ्यांने आठरा सूर्यनमस्कार काढून एकुण सर्व विद्यार्थ्यांनी 53 हजार 460 एवढे सूर्यनमस्कार केले.या स्पर्धेत उत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्या दोनशे चाळीस विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय सूर्यनमस्कार स्पर्धे करिता निवड करण्यात आली. या स्पर्धेसाठी जालना येथील योग शिक्षक श्रीमती शिल्पा शेलगावकर, श्रीमती मिरा थोरात, देवा चित्राल यांनी सर्वप्रथम सुरवातीस विद्यार्थ्यांकडून पूर्व तयारी म्हणून सुक्ष्म व्यायाम म्हणजेच वार्मअप सारख्या शारीरिक क्रिया करुन घेतल्या. क्रीडा शिक्षकांनी योगिक प्रार्थना, संगित नृत्य आणि योगिक हालचालीद्वारे शाळेतील शिक्षक व विद्यार्थी आणि उपस्थितांचा आनंद द्विगुणित केला होता. त्यामुळे सहभागी विद्यार्थांनी स्पर्धेत मंत्रमुग्ध होऊन सक्रिय सहभाग घेतला. योग शिक्षाकांनी शास्त्रशुद्ध पद्धतीने 12 अंकाचा एक याप्रमाणे मंत्रोच्चारा,कलात्मकता व श्वसनाच्या नियमानुसार सूर्यनमस्कार करुन घेतल्याने शेवटच्या क्षणापर्यंत सहभागी विद्यार्थ्यांचा उत्साह टिकून राहण्यास मदत झाली.नारयण तिकांडे यांनी स्पर्धेस भेट देऊन विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. यावेळी मुख्याध्यापक-अरविंद देव, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# मोगलाई गवळी वाड्यात उभारण्यात आलेला मोबाईल टॉवर तत्काळ काढा

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** दिनांक ७ व ८ जानेवारी रोजी शनिवार व रविवारी शासकीय सुट्टीच्या दिवशी परिसरातील नागरिकांना विश्वासात न घेता तसेच कोणत्याही प्रकारची पूर्वसूचना न देता बेकायदेशीररित्या मोगलाई गवळी वाड्यात मोबाईल टावर उभारण्यात आला आहे. मोगलाई गवळीवाड्याची रचना ही दाट लोकवस्तीची आहे तसेच मोबाईल टावर मुळे त्याच्या रेडिएशन मुळे श्वसनाचे आजार, कर्करोग, वयस्कर नागरिकांना हाडाचे आजार, लहान मुलांना दम्याचे आजार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर टावर श्री संतोष मासुळे यांच्या दुसऱ्या मजल्याच्या छतावर उभारण्यात आला असून तेथेच पिढ्यानपिढ्यापासून राहत असलेल्या नागरिकांना कुठल्याही प्रकारची पूर्वसूचना न देता अनधिकृत प्रकारे उभारण्यात आला आहे. सदरचा टावर तात्काळ काढावा अन्यथा परिसरातील नागरिकांकडून आंदोलन उभारण्यात येईल असे आशयाचे महानगरपालिका आयुक्तांना दिले आहे. निवेदनावर सर्व परिसरातील नागरिकांच्या देखील सह्या आहेत.

# साने गुरुजी कथाकथन स्पर्धा संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**परभणी :** विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे ही काळाची गरज आहे. वाचन क्षमतेच्या विकासातूनच विद्यार्थ्यांची लेखन क्षमता विकसित होईल. असे प्रतिपादन अतिरिक्त जिल्हाधिकारी प्रताप काळे यांनी साने गुरुजी कथामाला, हेलस च्या विभागीय कथाकथन स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी केले. शहरातील नूतन विद्यालयाच्या कै.रा.ब. गिल्डा सभागृहात शनिवार ( दि ०७) रोजी साने गुरुजी कथामाला, हेलस व मानस फाऊंडेशन,जालना यांच्या संयुक्त विद्यमाने साने गुरुजी कथामालेची विभागीय कथाकथन स्पर्धा संपन्न झाली. अध्यक्षस्थानी नूतन विद्यालय शिक्षण संस्थेचे सचिव प्राचार्य डॉ. विनायकराव कोठेकर होते. प्रताप काळे म्हणाले की, ' साने गुरुजी कथामालेची कथानक स्पर्धा ही विद्यार्थ्यांची कल्पनाशक्ती, निरिक्षण आणि विश्लेषण क्षमता विकसित करणारी आहे. आशा स्पर्धांतून विद्यार्थी सुसंस्कृत होतात. त्यांचा व्यक्तीमत्व विकास होतो. हुशार पेक्षाही एक स्वयंशिस्त असलेला सुसंस्कृत विद्यार्थी घडणे आवश्यक असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. या प्रसंगी अमर हबीब यांनी विद्यार्थ्यांना कथा सांगून मार्गदर्शन केले. विभागीय कथाकथन स्पर्धेत मराठवाड्यातील जिल्हास्तरावर यशस्वी झालेले १४ विद्यार्थी सहभागी झाले होते.





# राजेंद्र खरात यांना वैद्य शंकर दाजी शास्त्री आयुर्वेद कार्यकर्ता पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**नवीन नाशिक :** वैद्य खडीवाले वैद्यक संशोधन संस्थेच्या वतीने देण्यात येणारा वैद्य शंकर दाजी शास्त्री आयुर्वेद कार्यकर्ता पुरस्कार नाशिकच्या सुप्रसिद्ध वैद्यराज राजेंद्र खरात यांना प्रदान करण्यात आला आहे. पुण्याच्या वैद्य खडीवाले संशोधन संस्थेच्या वतीने दर वर्षी 'महर्षी अण्णासाहेब पटवर्धन पुरस्कार' समितीच्या वतीने पुरस्कार जाहीर करण्यात येतात. वैद्यक शास्त्रात अत्यन्त प्रतिष्ठेचा मानला जाणाऱ्या या पुरस्कारासाठी यावर्षी नाशिकच्या वैद्य राजेंद्र खरात यांची निवड करण्यात आली होती. नाशिकमधील वैद्याला हा पुरस्कार ३२ वर्षांनंतर मिळाल्याने नाशिकच्या वैद्यकीय क्षेत्रासाठी अभिमानास्पद बाब असल्याचे मानली जात आहे. ३२ वर्षांपूर्वी हा पुरस्कार नाशिकच्या जेष्ठ वैद्य व प्रसिद्ध सहकार कर्मी डॉ.शशीताई अहिरे यांना मिळाला होता. रविवार दि. ८ जानेवारी रोजी धन्वंतरी सभागृह, एरंडवणा, पुणे येथे झालेल्या भव्य सोहळ्यात, आयुर्वेद व्यासपीठाचे संस्थापक वैद्य विनय वेलणकर, पुरस्कार समितीचे अध्यक्ष वैद्य स. प्र. सरदेशमुख, अखिल भारतीय आयुर्वेद महासंमेलनाच्या राष्ट्रीय उपाध्यक्षा डॉ. शशी अहिरे, भारतीय चिकित्साप्रणाली आयोगाचे अध्यक्ष वैद्य जयंत देवपुजारी, वैद्य निगम यांच्या उपस्थितत पुरस्कार वितरण सोहळा संपन्न झाला. यावेळी संस्थेचे विश्वस्त भिडे, वैद्य विनायक खडिवाले, वैद्य संगिता खडिवाले, वैद्य विवेक साने, वैद्य योगेश गोडबोले, श्रीमती अनघा देसाई, वैद्य निखिल खडिवाले, जयश्री टाव्हरे आदि मान्यवर उपस्थितीत होते. पुरस्कारार्थींची निवड महर्षि अण्णासाहेब पटवर्धन वैद्यकीय पुरस्कार समितीच्या माध्यमातून करण्यात येत असून यासाठी कोणत्याही पध्दतीचे अर्ज किंवा शिफारस स्वीकारली जात नाही. कार्य व समर्पित योगदानाच्या कसोटीवर पुरस्कारार्थींची निवड केली जाते.





# आरक्षणाची मर्यादा वाढीचे बील केंद्राने मंजूर करून घटना दुरुस्ती करावी

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** मराठा क्रांती मोर्चा जालना जिल्हयाच्या वतीन मराठा समाजाला त्यांच्या हक्काचे कायमस्वरूपी टिकणारे आरक्षण मिळण्यासाठी मराठाआरक्षणासाठी लढणाऱ्या राज्यातील विविध संघटना अभ्यासक व सामान्य कार्यकर्ता आदी सर्वांच्या मार्गदर्शनाखाली दिशादर्शक राज्यव्यापी मराठा आरक्षण गोलमेज परिषद आज (०८) रोजी जालना येथे संपन्न झाली. या प्रसंगीं सर्वोच्च न्यायालयातील मुख्य हस्तक्षेप याचिकाकर्ता राजेंद्र दाते पाटील यांनी पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन सादर केले. पुनर्विचार याचिकेवर प्रकाश टाकुन केंद्र शासन व लोकसभेत प्रलंबीत बिला नुसार आरक्षणाची मर्यादा वाढविण्याची शिफारस असुन त्या नुसार घटना दुरुस्ती करून मराठा आरक्षणाचा मार्ग मोकळा होण्याचे अनेक घटनात्मक व कायदेशीर मार्ग त्यांनी या गोलमेज परिषदेत सादर केले. यावेळी एकूण१६ ठराव घेण्यात आले आहेत. ०१. मराठा समाजाला आरक्षणाविषयी न्यायालयापुढील पुनर्विचार याचिका सकारात्मक निकाली लावून घ्यावी. यासाठी शिंदे-फडणवीस सरकारने जी तत्परता ओबीसी राजकीय आरक्षणात दाखविली तशीच मराठा आरक्षणाबाबत दाखवावी. व ११ न्यायमूर्तींच्या घटनापीठापुढे चालवण्यासाठी तात्काळ निर्णय घ्यावा. ०२. मराठा आरक्षणासाठी तातडीने मा. मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री उपसमीत अध्यक्ष सदस्य आणि समन्वयक अभ्यासक यांची लाईव्ह बैठक लावावी. ०३. निजाम स्टेटमध्ये मराठा समाज कुणबी-मराठा त्याप्रमाणे मराठवाड्यातील मराठा समाजाला पूर्वीप्रमाणे कुणबी जात प्रमाणपत्रे द्यावीत. ०४. राज्यात ओबीसीचे ३८% आरक्षण आहे हे माजी मुख्यसचिव जयंत भाठीयां यांच्या कमीटीने दाखवून दिले आहे म्हणून तातडीने राज्यातील आरक्षण दुरुस्त करून ओबीसी आरक्षण १९ टक्के निश्चित केले. राहीलेले २७ मधील उर्वरीत आरक्षण मराठा समाजास द्यावे. ०५. छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज,महात्मा फुले, सावित्रीमाई फुले, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, तसेच इतर बहुजन महामानवांची बदनामी थांबवावी. ०६ .महापुरुषांची बदनामी करणारे राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांना त्वरीत हटवावे. ०७. अण्णासाहेब पाटील मागास आर्थिक विकास महामंडळामार्फत 'थेट कर्ज योजना मंजूर करावी. ०८. सारथीचे उपकेंद्र छत्रपती संभाजीनगर येथे चालू करावे व प्रत्येक जिल्हयात वसतिगृह उभारावे. डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह वाढीव निर्वाह उपक्रम तात्काळ राबवावा. संशोधक छात्राची उर्वरीत देयके त्वरित अदा करावी. ०९. मुंबई येथील शिवस्मारक तात्काळ उभारावे. १०. मराठा व सर्व जातनिहाय जनगणना करावी.

# साने गुरुजी कथामालेची विभागीय कथाकथन स्पर्धा

आधुनिक केसरी न्यूज

**सेलू :** विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे ही काळाची गरज आहे. वाचन क्षमतेच्या विकासातूनच विद्यार्थ्यांची लेखन क्षमता विकसित होईल. असे प्रतिपादन अतिरिक्त जिल्हाधिकारी प्रताप काळे यांनी साने गुरुजी कथामाला, हेलस च्या विभागीय कथाकथन स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी केले. शहरातील नूतन विद्यालयाच्या कै.रा.ब. गिल्डा सभागृहात शनिवार ( दि ०७) रोजी साने गुरुजी कथामाला, हेलस व मानस फाऊंडेशन,जालना यांच्या संयुक्त विद्यमाने साने गुरुजी कथामालेची विभागीय कथाकथन स्पर्धा संपन्न झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नूतन विद्यालय शिक्षण संस्थेचे सचिव प्राचार्य डॉ. विनायकराव कोठेकर होते. तर कथाकथन स्पर्धेचे उद्घाटन अतिरिक्त जिल्हाधिकारी प्रताप काळे यांच्या हस्ते झाले. प्रमुख पाहुणे म्हणून किसन आंदोलनाचे प्रणेते अमर हबीब, नूतन विद्यालय शिक्षण संस्थेचे कार्यकारिणी सदस्य नंदकिशोर बाहेती, जालना येथील ज्येष्ठ साहित्यिक बसवराज कोरे, मुख्याध्यापक नारायण सोळंके, मुख्याध्यापक संगीता खराबे यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना प्रताप काळे म्हणाले की, ' साने गुरुजी कथामालेची कथानक स्पर्धा ही विद्यार्थ्यांची कल्पनाशक्ती, निरिक्षण आणि विश्लेषण क्षमता विकसित करणारी आहे. आशा स्पर्धांतून विद्यार्थी सुसंस्कृत होतात. त्यांचा व्यक्तीमत्व विकास होतो. हुशार पेक्षाही एक स्वयंशिस्त असलेला सुसंस्कृत विद्यार्थी घडणे आवश्यक असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. या प्रसंगी अमर हबीब यांनी विद्यार्थ्यांना कथा सांगून मार्गदर्शन केले. विभागीय कथाकथन स्पर्धेत मराठवाड्यातील जिल्हास्तरावर यशस्वी झालेले १४ विद्यार्थी सहभागी झाले होते. कथाकथन स्पर्धेचे परीक्षक म्हणून डॉ.गंगाधर गळगे, गझलकार संजय विटेकर, कांचन बाहेती यांनी काम पाहिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक साने गुरुजी कथामालेच्या अध्यक्ष कल्पना हेलसकर यांनी केले. सुत्रसंचलन प्रदिप देशमुख यांनी केले. तर आभार प्रदर्शन सतीश कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सुहास सदावर्ते, विलास शिंदे, रूपाली कान्हेकर बाबासाहेब हेलसकर, सुरेश हिवाळे, डॉ. काशिनाथ पल्लेवाड, किर्ती राऊत, विजया शिंदे, श्रावणी हेलसकर यांनी पुढाकार घेतला.



# फुले यांना राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**सिल्लोड :** तालुक्यातील पत्रकार सदाशिव फुले यांनी पत्रकारीतेच्या माध्यमातून सातत्याने लिखाण करून अनेक सामाजिक प्रश्नांना मार्गी लावले आहेत. पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्यामुळे अप्रतिम मीडियाच्या वतीने बिट जर्णालीझमसाठी दिल्या जाणाऱ्या चौथास्तंभ विशेष पत्रकारिता राज्यस्तरीय पुरस्कार सदाशिव फुले यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते देण्यात आला. यावेळी एमएसआरडीसीचे उपाध्यक्ष व कार्यकारी संचालक राधेश्याम मोपलवार, अतिरिक्त मुख्य सचिव नंदकुमार, मंत्रालय वार्ताहर विधिमंडळ संघाचे अध्यक्ष मंदार पारकर, अप्रतिम मीडियाचे संचालक डॉ. अनिल फळे, विठ्ठल साखर कारखान्याचे प्रवर्तक अभिजीत पाटील, अभिनेते मंगेश देसाई, निमंत्रक विवेक देशपांडे व रणजीत कक्कड यांच्या प्रमुख उपस्थित यशवंत्तराव चव्हाण सेंटर मुंबई येथे शुक्रवारी सकाळी अकरा वाजता हा सोहळा पार पडला. गेल्या पाच वर्षातील पत्रकारितेतील सदाशिव फुले यांनी शेतकऱ्यांविषयी चांगल्या प्रकारे लिखाण केले आहे. प्रगतीशिल शेतकऱ्यांच्या यशोगाथा पोखरा योजनेसंदर्भात आदिअडचणी विषयी त्यांनी चांगल्या प्रकारे लिखाण केलयाने अप्रतिम मीडियामार्फत दिला जाणारा कृषी वृत्त गटातून राज्यस्तरीय पुरस्कार सदाशिव फुले यांना देण्यात आला.




# फर्दापूर येथे दिनदर्शिकेचे प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील फर्दापुर येथे आदिवासी समाजाचा जनजागृति कार्यक्रम घेऊन महाराष्ट्र एकलव्य आदिवासी तडवी भिल विकास परिषद तर्फे प्रदेश अध्यक्ष अफसर तडवी यांनी आदिवासी समाजाला मोलाचे मार्गदर्शन केले आणि तसेच 2023 या नविन वर्षाच्या दिनदर्शिका चे संघटने तर्फे प्रकाशन करण्यात आले. आदिवासी समाजासाठी कोनकोनत्या योजना आहे त्या योजनांबद्दल माहिती सांगीतली तसेच आदिवासी समाजाच्या काही अडी अडचणी असल्यास समाजावरती अन्याय अत्याचार होत असल्यास संघटना सदैव आदिवासी समाजा सोबत न्याय मिळवुन देण्यासाठी सज्ज आहे, असे ही सांगण्यात आले या कार्यक्रमादरम्यान प्रदेश अध्यक्ष अफसर तडवी, प्रदेश कार्याध्यक्ष जब्बार तडवी, प्रदेश सल्लागार समिर तडवी औरंगाबाद जिल्हा अध्यक्ष अडव्होकेट नजीर तडवी, युसुफ तडवी, जब्बार शाम्मद तडवी, इस्राईल तडवी, भुराज तडवी, मुकददर तडवी, रशीद तडवी, सलाउद्दीन तडवी, मोसीन तडवी, यासिन तडवी, देव्हारी सरपंच शामीरखा तडवी, राशेद बाई तडवी, सलीम तडवी, गुलाब बर्डे ग्रामपंचायत सदस्य, माजी सरपंच बीबीबाई तडवी, इकबाल तडवी, गुलाब बाबा तडवी, इस्माईल तडवी, संजू तडवी, रावेस तडवी, शेरखा तडवी, शंकर वाघ आणि आदिवासी समाजाच्या महिला भगिनी आणि पुरुष वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उपाध्यक्ष जगन शिंदे तर सचिवपदी शेख मुस्ताक यांची निवड जगन शिंदे

आधुनिक केसरी न्यूज





**फर्दापूर :** सोयगाव तालुक्यातील फर्दापूर येथील टॅक्सी चालक –मालकाची एक महत्वपुर्ण बैठक नुकतीच संपन्न झाली. यात टॅक्सी चालकांच्या येणाऱ्या विविध अडीअडचणी, समस्या बाबत चर्चा होवून या बैठकीत अजंठा केव्हेज टुर्स टॅक्सी युनियन (महाराष्ट्र) च्या उपाध्यक्ष जगन शिंदे तर सचिवपदी शेख मुस्ताक यांची निवड करण्यात आली. अजंठा केव्हेज टुर्स टॅक्सी युनियन (महाराष्ट्र)ची नोंदणी श्रमिक संघ अधिनियम १९२६ नोंदणी क्र. ए.डब्ल्यु. बी/३४१३/२०२२ , क्र.काउआ/औ.बाद/श्रसंअ/५२८९. अतिरीक्त निबंधक यांचे कार्यालय, श्रमिक संघ औरंगाबाद ता.९ नोव्हे. २०२२ रोजी कायदेशीररित्या करण्यात आली असल्याची माहीतीही या महत्वपूर्ण बैठकीत घेण्यात आली. उर्वरित पदाधिकारी असे अध्यक्ष उस्मनखॉ मजिदखॉ पठाण, सहसचिव सतिष हरसोले, कोषाध्यक्ष शेख सगीर शेख बशीर, सदस्य सय्यद ताहेर अली, सय्यद शब्बीर अली, मेहमुद रमजान पिजारी, रफिक खॉ अलीखा पठाण, करण शिंदे, शेख रफिक, अरुण अंभोरे, शेख रफिक रहीम, फारूक खान खुदयार खान फर्दापूर परिसरात सर्वच टॅक्सी चालक व मालक बैठकीत उपस्थित होते. निवडी झाल्या निवडीचे सोयगाव तालुक्यातून स्वागत व कौतुक होत आहे.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# ऑरीकमध्ये एमएसएमईसाठी १०० एकर जागा राखीव

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : 62 हजार जणांची एक्स्पोला भेट

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** राज्यातील नवीन सरकार गतीमान असून नियमीतपणे गुंतवणूकदारांसोबत चर्चा करते. राज्यात स्थैर्य आल्याने मोठ्या प्रमाणात गुंतवणूकदार येण्यास इच्छुक आहेत. राज्यात गेल्या ६ महिन्यात ९० हजार कोटीचे गुंतवणूकीचे करार झाले आहेत. ऑरीक व जालना-औरंगाबाद हे महाराष्ट्रातील उद्योगांचे भविष्य असून येथील समस्या सोडविण्यासाठी राज्य सरकार कटीबद्ध आहे. ऑरीकमध्ये सूक्ष्म-लघु व मध्यम उद्योगांसाठी १०० एकर जागा राखीव ठेवली जाईल. तसेच स्वस्त दरात वीज पुरवठा केला जाईल. तर इंटरनॅशनल कॅन्वेन्शन सेंटरच्या बांधकामासाठी राज्य सरकार निधी उपलब्ध करून देईल, अशी घोषणा राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.
मराठवाडा असोसिएशन ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चरच्या (मसिआ) वतीने शेंद्रा-ऑरीक सिटीमध्ये ५ ते ८ जानेवारी दरम्यान आयोजित 'ॲडव्हान्टेज महाराष्ट्र एक्स्पो २०२३' चा समारोप रविवारी फडणवीस यांच्या उपस्थितीत झाला. याप्रसंगी सहकार मंत्री अतुल सावे, आमदार संजय शिरसाट, नारायण कुचे, ऑरीकचे एमडी सुरेश काकाणी, मर्सिडीझ बेन्झचे इंडिया हेड व्यंकटेश कुलकर्णी, शिरीष बोराळकर, राजेंद्र जंजाळ, संजय केणेकर, राजु शिंदे, अनिल मकरिये, उद्योजक विवेक देशपांडे, मसिआचे अध्यक्ष किरण जगताप, कन्व्हेनर अभय हंचनाळ, सचिव राहुल मोगले आदींची प्रमुख उपस्थिती होती.

मसिआच्या प्रदर्शनाचे कौतुक करतांना फडणवीस म्हणाले, जगभरातील एक्स्पोला भेटी देत असतो. अगदी जागतिक स्तरावरील मॅसे होरेल प्रदर्शनाच्या तोडीस तोड असे 'ॲडव्हान्टेज महाराष्ट्र एक्स्पो' चे आयोजन करण्यात आले आहे. मराठवाड्यातील उद्योग जिद्दी आहेत. एखाद्या गोष्टीच्या मागे लागले तर ती पूर्ण केल्याशिवाय शांत बसत नाहीत. मुख्यमंत्री असतांना वेगवेगळ्या देशांतील औद्योगिक प्रदर्शनांना भेटी देतांना सोबत मराठवाड्यातील उद्योजकांची संख्या अधिक असायची. तेथील नाविण्यपूर्ण बाबींचा अभ्यास करून अधिकाधिक गुंतवणूक मराठवाड्यात कशी आणता येईल, याकडे उद्योजकांचा कल असायचा. अशा जिद्दी वृत्तीच्या उद्योजकांमुळेच औरंगाबादमध्ये उत्पादन क्षेत्राची इको सिस्टीम तयार झाली आहे.



**उद्योगांचे भविष्य ऑरीक**

फडणवीस म्हाणाले, समृद्धी महामार्गाचे काम सुरू असतांना मी सांगायचो, महाराष्ट्रातील उद्योगाचे भविष्य ऑरीक आणि औरंगाबाद-जालना आहे. ते आता खरे होतांना दिसत आहे. पुढील सहा महिन्यात समृद्धी महामार्ग मुंबईपर्यंत तयार झाल्यावर या भागाला थेट जेएनपीटीशी कनेक्टिव्हीटी मिळेल. बंदरांशी कनेक्टिव्हीटी असणाऱ्या भागांचा वेगाने विकास होतो, हे जगाने मान्य केले आहे. ही कनेक्टिव्हीटी झाल्यावर तुमचा विकास कोणीच थांबवू शकत नाही, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**हा संधीचा काळ**

भारताची अर्थव्यवस्था जगात पाचव्या क्रमांकावर आहे. लवकरच ती तिसऱ्या क्रमांकावर येईल. जागतिक मंदीच्या काळातही भारताचा विकासदर ७-८ टक्के आहे. त्याचे कारण कोरोनाच्या काळात पंतप्रधान मोदी यांनी देऊ केलेले २० हजार कोटीचे आत्मनिर्भर भारत पॅकेज आहे. यामुळे एमएसएमईला चालना मिळाली. ते तग धरून राहू शकले. दुसरीकडे कोरोनाच्या काळात चीनने जगाचा विश्वास गमावला आहे. पूर्वी जगातील ४८ टक्के उत्पादन चीनमध्ये होत होते. मात्र, चीनचे व्यवहार अपारदर्शक आहेत. तेथे बौद्धिक संपदा हक्क सुरक्षित नाहीत. यामुळे मोठ्या प्रमाणात जगभरातील उद्योग चीनमधून बाहेर पडत आहेत. या गुंतवणूकीचा लोंढा पचिवण्याची ताकत एकट्या भारतात आहे. यात मोठी संधी आहे. पुढील १०-२० वर्षात अशी संधी मिळेल असे वाटत नाही, असे फडणवीस म्हणाले.

**...म्हणून एक्स्पो महत्त्वाचा**

सरकारचे काम उद्योगांसाठी आवश्यक इको सिस्टीम तयार करण्याचे आहे. तर आहे त्या इको सिस्टीमचे जगासमोर प्रदर्शन करून गुंतवणूक आणण्याचे काम मसिआ सारख्या संघटना करतात. बाहेरचे गुंतवणूकदार जे बघतात त्यावर विश्वास ठेवतात. अशा एक्स्पोमधून त्यांना येथील क्षमता प्रत्यक्षात बघता येतात. त्यादृष्टीने हा एक्स्पो देश, राज्य आणि मराठवाड्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. या भागात गेल्या ३०-४० वर्षात जी क्षमता तयार झाली, ती जगाला दाखवली तर गुंतवणूदार आकर्षित होतील. चीनमधील लोंढे सामावता येतील, असे त्यांनी सांगीतले.

सहा महिन्यात ९० हजार कोटीची गुंतवणूक महाविकास आघाडी सरकारचे नाव न घेता फडणवीस म्हणाले, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सरकार चांगले निर्णय घेत आहे. नवीन सरकार दररोज किमान एका गुंतवणूकदारांसोबत चर्चा करत असते. आजच्या कार्यक्रमाला येण्यापूर्वी एका मोठ्या इलेक्ट्रीकल व्हेईकल कंपनीसोबत एक करार करून आलोय. या कंपनीच्या तंत्रज्ञानामुळे इव्हीमध्ये लक्षणीय बदल होतील. राज्यात मोठ्या प्रमाणात गुंतवणूकदार येत आहेत. त्याचे कारण म्हणजे राज्यात स्थिरता आली आहे. मागील ५ वर्षात ज्यावेळी राज्यात आणि देशात भाजपचे सरकारमध्ये "ग्रो इंडस्ट्री पॉलिसी' होती. गुंतवणूकदारांना उद्योगाभिमुख धोरणे आणि स्थिर सरकार हवे असते. मात्र, मागील सरकारने १५ महिन्यात एकदाही गुंतवणूकीसंबंधीच्या कॅबीनेट कमिटीची बैठक घेतली नाही. कोणताही गुंतवणूकदार १५ महिने थांबायला तयार नसतो. आमच्या सरकारने सहा महिन्यात २ बैठका घेऊन ९० हजार कोटीची गुंतवणूक आणली आहे. अजूनही मोठी गुंतवणूक येत आहे. यामुळे काळजी करण्याचे कारण नाहीय.

**आमचे विमान जमिनीवरच**

देवेंद्र म्हणाले, एवढ्या चांगल्या कार्यक्रमाला मी व मुख्यमंत्री पहिल्या दिवशीच उद्घाटनाला येणार होतो. परंतु काही कारणामुळे आमचे विमान उडू शकले नाही. पण आमचे विमान नेहमीच जमीनीवर राहते. आम्ही विमान केवळ सोय म्हणून वापरतो. आम्ही दोघेही जमिनीवरचेच लोकं आहोत.

**घोषणा व आश्वासने**

देवेंद्र फडणवीस यांनी आयोजकांनी केलेल्या प्रत्येक मागणीला प्रतिसाद देत त्यांचे समाधान केले. यावेळी त्यांनी काही घोषणा केल्या. तर काही मागण्या मान्य करत त्या पूर्ण करण्याचे आश्वासन दिले.
-एमएसएमईसाठी १०० एकर जागा- फडणवीस म्हणाले, एमएसएमईच्या इको सिस्टिमशिवाय औद्योगिकीकरण होऊच शकत नाही. यामुळेच ऑरीकमध्ये एमएसएमईसाठी १०० एकरचे प्लॉट्स राखून ठेवले आहेत. छोट्या उद्योगांसाठी छोटे, परवडणारे प्लॉट्स हा देखील उद्देश आहे.
-ऑरीकसाठी वीजेचा वेगळा दर- ऑरीकमध्ये इतर वीज दरापेक्षा कमी वीज दर देण्याचा प्रयत्न करत आहोत. मराठवाडा-विदर्भासाठी एक योजना सुरू केली होती. गेल्या सरकारने त्याचे कॅपींग केले. ती पुन्हा सुरू केली जाईल. यानुसार जेथे कमी गळती तेथे अधिक इन्सेटीव्ह व जेथे अधिक गळती तेथे कमी इन्सेटीव्ह दिले जातील.



# मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पत्रकार विजय चौधरी यांना चौथास्तंभ पत्रकारिता पुरस्कार प्रदान

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** कृषी पत्रकारिता क्षेत्रात दिलेल्या मोलाच्या योगदानाबद्दल खुलताबाद येथील पत्रकार विजय चौधरी यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते राज्यस्तरीय चौथास्तंभ विशेष पत्रकारिता पुरस्कार प्रदान करण्यात आला. स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. अप्रतिम मीडियाच्या वतीने ६ जानेवारी पत्रकार दिनाचे औचित्य साधून मुंबई येथील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे राज्यस्तरीय चौथास्तंभ विशेष पत्रकारिता पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला होता.
या कार्यक्रमात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते पत्रकारितेद्वारे अनमोल योगदान असणाऱ्या पत्रकारांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. प्रारंभी मराठी पत्रकार दिनानिमित्त "दर्पण'कार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.
या वेळी सिने अभिनेते व निर्माते मंगेश देसाई, विधिमंडळ व मंत्रालय वार्ताहर संघाचे अध्यक्ष मंदार पारकर तसेच एमएस आरडीसीचे उपाध्यक्ष व कार्यकारी संचालक राधेश्याम मोपलवार, अतिरिक्त मुख्य सचिव नंदकुमार, विठ्ठल साखर कारखान्याचे प्रवर्तक अभिजीत पाटील, निमंत्रक उद्योगपती विवेक देशपांडे व रणजीत कक्कड यांची प्रमुख उपस्थिती होती.

# अनैतिक संबंधाबाबत बोलताच घातल्या गोळ्या

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** तुझी पत्नी माझ्या मित्रासोबत फिरायला जाते. तिचे मित्राशी अनैतिक संबंध असून ती तुला दगा देत आहे,' अशी बदनामी करणाऱ्या मित्राचा एका युवकाने गोळ्या घालून खून केला. ही थरारक घटना रविवारी मध्यरात्रीच्या सुमारास हिंगणा तहसील कार्यालयासमोर घडली. अविनाश घुमडे (३२) असे खून झालेल्या युवकाचे नाव आहे. ही घटना गुन्हेगारांचे नवीन नंदनवन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या हिंगणा पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली.

आरोपी दीपक खट्या हा कुख्यात गुन्हेगार असून त्याच्यावर अनेक गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत. दीपक खट्या आणि अविनाशमध्ये पूर्वी मैत्री होती. दोघेही एकाच टोळीत काम करीत होते. 'तुझ्या पत्नीचे मित्राशी प्रेमसंबंध असून, तू बाहेर गेल्यानंतर तो तुझ्या घरात रात्रीला मुक्कामी असतो,' अशी माहिती अविनाशने दीपकला दिली. त्याने पत्नीकडून खातरजमा केली. तिने प्रेमसंबंध असल्याबाबत नकार दिला. त्यामुळे तो अविनाशवर चिडून होता. याच कारणावरून गेल्या काही महिन्यांपासून दोघांत धुसूफूस सुरू होती. त्यामुळे दोघेही एकमेकांना बघून घेण्याची धमकी देत होते. दीपक खट्याने अविनाशचा काटा काढण्याचा कट रचला. रविवारी रात्री अकरा वाजता अविनाश हा आपल्या काही साथिदारांसह हिंगणा तहसील कार्यालयासमोर अंधारात बसला होता.काहीही कळायच्या आता दीपकने अविनाशवर दोन गोळ्या झाडल्या.

# "सावित्रीच्या लेकी " पुरस्कार सिने निर्मात्या कल्पना संजय गायकवाड यांना प्रदान

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** स्त्री शिक्षणाच्या उद्धारकर्त्या सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त लोकशाहीर जनकल्याण सेवा समिती नवी दिल्ली आयोजित कार्यक्रमात सावित्रीच्या लेकी पुरस्कार "तुझ्यासाठी काहीही" चित्रपटाच्या निर्मात्या कल्पना संजय गायकवाड यांना नुकताच नवी दिल्ली येथे एका विशेष कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. तुझ्यासाठी काहीही चित्रपट नुकताच ऑस्कर पुरस्कार 2023 साठी जनरल इंटरी मधून बेस्ट ॲक्टर, बेस्ट रायटर, आणि बेस्ट पिक्चरसाठी पात्र ठरला आहे. हा चित्रपट अवयवदानावर आधारित असून सर्वत्र या चित्रपटाची




चर्चा होत आहे. याच कार्याची दखल घेत कल्पना संजय गायकवाड यांना सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त नवी दिल्लीत एका विशेष सोहळ्यात सावित्रीच्या लेकी पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते देऊन गौरविण्यात आला. याबद्दल सिने निर्मात्या कल्पना संजय गायकवाड यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# नायलॉन मांजा बाळगणाऱ्यांवर होणार गुन्हे दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** प्रतिबंधित नायलॉन मांजाच्या विक्री व वापराविरूद्ध जिल्हा प्रशासन अँक्शन मोडवर आले असून नायलॉन मांजा बाळगणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचे आदेश जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी दिले आहेत.
जिल्ह्यात महानगरपालीका क्षेत्रात झोननिहाय तसेच नगरपालीका क्षेत्र व ग्रामीण भागात देखील समित्या स्थापन केल्या आहेत. या समित्यांनी संबंधीत पोलीस ठाणेदार यांच्या समवेत नायलॉन मांजा विक्री होत असलेल्या तसेच नॉयलॉन मांजाचा वापर करणाऱ्यांविरूद्ध तत्काळ गुन्हे नोंदवून कारवाई करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.
नायलॉन मांजाच्या वापराविरूद्ध कारवाईचे नियोजन करण्यासाठी जिल्हाधिकारी इटनकर यांच्या अध्यक्षतेखाली छत्रपती सभागृह येथे आज बैठक घेण्यात आली. त्याप्रसंगी ते बोलत होते. बैठकीला निवासी उपजिल्हाधिकारी विजया बनकर, पोलिस उपायुक्त मुमक्का सुदर्शन, महानगरपातिकेचे अतिरिक्त आयुक्त राम जोशी, शिक्षणाधिकारी (माध्यमीक) रवींद्र काटोलकर, नगरपालीका प्रशासन अधिकारी अतुल पंत तसेच इरदृष्य प्रणालीद्वारे जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, नगरपालिका मुख्याधिकारी, गटविकास अधिकारी उपस्थित होते.
जिल्हाधिकारी यांनी परराज्यातून येणाऱ्या नायलॉन मांजावर आळा घालण्यासाठी पोलिस चेकपास्ट ॲक्टीव्ह करण्याचे तसेच सायबर सेलने ऑनलाईन मांजा विक्रीवर कारवाई करण्याच्या सूचना दिल्या. ज्या भागात पतंग जास्त प्रमाणात उडविल्या जाते, अशा भागात विशेक्ष लक्ष ठेवण्याचे तसेच सर्व प्रशासकीय अधिकारी यांनी नायलॉन मांजाविरोधात सामाजिक माध्यमांद्वारे जनजागृती करण्याचे त्यांनी सांगितले.
'मी पतंग उडवितांना नायलॉन मांजा वापरणार नाही, आणि इतर कोणालाही नायलॉन मांजा वापरू देणार नाही', या आशयाची प्रतिज्ञा सर्व शासकीय व खाजगी शाळा तसेच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मकरसंक्रातपर्यंत रोज घ्यावी असे आवाहन त्यांनी केले आहे.
यासोबत पालकांनो, आपला पाल्य पतंग उडवतांना कोणता मांजा वापरतो आहे, याकडे लक्ष ठेवण्याचे व नायलॉन मांजा वापरल्यास कारवाई होऊ शकते, अशी समज आपल्या पाल्यांना देण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.विपीन इटनकर यांनी पालकांना केले आहे.
नायलॉन मांजा बाबत तक्रार करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात नियंत्रण कक्ष स्थापण्यात आला आहे. नागरिकांना 0712-2562668 किंवा टोल फ्री क्रमांक 1077 यावर तसेच जवळच्या महानगरपालिका झोन कार्यालय, तहसिल कार्यालय येथे देखील नायलॉन मांजाबाबत तक्रारी दाखल करता येतील.

# गजल सप्तरंगी इंद्रधनुष्यासारखी असते: ज्येष्ठ गजलकार डॉ. पांढरपट्टे

आधुनिक केसरी न्यूज

**अकोला :** गजल सप्तरंग इंद्रधनुष्यासारखी असते. ती जीवन जगायला शिकवत असते. गजलेच्या आजवरच्या अखिल भारतीय गजल संमेलनातून अनेक गझलकारांना गजल लिहिण्यासाठी प्रोत्साहन व उर्जा मिळत आलेली आहे. व मी स्वतः याचा साक्षी असल्याचे प्रतिपादन विभागीय आयुक्त तथा जेष्ठ गजलकार डॉ.दिलीप पांढरपट्टे यांनी दि. 7 ते 8 जानेवारी दरम्यान अकोल्यात पहिल्यांदाच आयोजित अखिल भारतीय गजल साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणातून केले.

या संमेलनाच्या उदघाटन सोहळ्यासाठी मंचावर संमेलनाचे उदघाटक सिनेदिग्दर्शक नागराज मंजुळे, गजल सागर प्रतिष्ठानचे विश्वस्त गझलनवाज भीमराव पांचाळे, त्यांच्या पत्नी, मुलगी




गजलकार डॉ. भाग्यश्री पांचाळे लेखक तथा विचारवंत सुरेश द्वादशीवार यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ.पांढरपट्टे म्हणाले की,संमेलनातील मुशायरे, परिसंवाद, मुक्तचर्चा आणि गजल गायनाच्या मैफली ही रसिकांसाठी केवळ एक पर्वणीच राहते. म्हणूनच या संमेलनातून परिसंवाद, चर्चा यातून गजलेबद्दलच्या आपल्या जाणिवा रुंदावणयाची संधी गजलकार व रसिकांना मिळत असते. तत्पूर्वी या दोन दिवसीय गजल संमेलनाची सुरुवात सकाळी गजल दिंडीने झाली. संमेलनास विविध गजल संग्रहाचे प्रकाशन मान्यवरांकडून करण्यात आले. संमेलनात परिसंवाद व सायंकाळी गजल बहार,गजल गुंजन कार्यक्रम संपन्न झाले. या दोनदिवसीय संमेलनास राज्यासह इतर गजलकार आणि रसिक मोठया संख्येने उपस्थित होते.

**माझी मनोकामना पूर्ण झाली : भीमराव पांचाळे**

मराठी गजलेला इतर संमेलनामध्ये उच्च स्थान मिळावे तसेच मंच मिळावा ही माझी प्रखर इच्छा होती . मात्र ते शक्य होत नव्हते . त्यामुळे स्वत : गजल संमेलन आयोजित करण्याचा निर्णय घेतला . व आज स्वत :च्या गावात दहावे अखिल भारतीय मराठी गजल संमेलन रसिकांच्या भरगच्च गर्दीत संपन्न झाल्याचा आनंद गजल सागर प्रतिष्ठानचे विश्वस्त गजलनवाज भीमराव पांचाळे यांनी दैनिक आधुनिक केसरीशी संवाद साधत व्यक्त केला .

# भूमी अभिलेख लिपिक लाच घेताना जाळ्यात

आधुनिक केसरी न्यूज

**शिंदखेडा :** तालुक्यातील बेटावद येथील शेतजमिनीची हद्द कायम पोटहिस्सा मोजणीसाठी २० हजारांची लाच घेताना शिंदखेडा येथील भूमी अभिलेख कार्यालयातील छाननी लिपिकास जळगावच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहात पकडले. याप्रकरणी धुळे शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जळगावमधील महाबळ रोडवरील संभाजीनगरातील तक्रारदारांनी शिंदखेडा येथील भूमी अभिलेख कार्यालयाच्या उपअधीक्षकांकडे करार करून काम घेतलेल्या बेटावद येथील शेतजमिनीची हद्द कायम पोटहिस्सा मोजणीसाठी अतितातडीचे चलन भरून शेतमोजणीसंदर्भात अर्ज दिला होता. संबंधित काम करून देण्यासाठी भूमी अभिलेख कार्यालयाचा छाननी लिपिक सुशांत अहिरे (३६) याने तक्रारदारांकडून ११ नोव्हेंबर २०२२ रोजी ४० हजारांची मागणी करीत त्याच दिवशी २० हजार रुपये स्वीकारले. त्यानंतर उर्वरित २० हजार रुपये काम झाल्यानंतर देण्यास सांगितले. १४ नोव्हेंबर रोजी आणि सहा जानेवारी २०२३ रोजी पडताळणीदरम्यान उर्वरित २० हजार रुपये आणण्यास सांगितले. यासंदर्भातील तक्रार जळगावच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस उपअधीक्षक शशिकांत पाटील यांच्याकडे करण्यात आली. त्यांनी तक्रारीची पडताळणी करीत पथक नियुक्त केले.

# देशातील रेशन दुकाने बंद होणार... ?

## रेशन दुकानदार महासंघ सर्वोच्च न्यायालयात दाद मागणार

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** देशातील 2 लाख 78 हजार खाजगी रेशन दुकाने रद्द करण्याची घोषणा केंद्र शासनाने केल्याने खळबळ उडाली आहे. यामुळे रेशन दुकानदार व कुटुंबाची झोप उडाली आहे. हा निर्णय मागे घेतला नाही तर सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालयात दाद मागणार असल्याची माहिती डी-24 न्यूजला महाराष्ट्र राज्य रास्तभाव दुकानदार महासंघाचे अध्यक्ष डी.एन. पाटील यांनी दिली आहे.

पुढे बोलताना त्यांनी सांगितले मराठवाडा व विदर्भ येथील 14 जिल्ह्यातील शेतकरी प्रधान्य कुटुंबाला मोफत अन्नधान्य वितरण करण्याची योजना शासनाने बद केली ती योजना पुन्हा सुरू करावी अशी मागणी आहे. आज तहसील कार्यालयाच्या सभागृहात झालेल्या बैठकीत औरंगाबाद तालुका रेशन दुकानदार महासंघाच्या बैठकीत सर्वानुमते ठराव मंजूर करण्यात आला. देशातील 2 लाख 78 हजार रेशन दुकान रद्द झाल्यास कुटुंबातील सात लाख लोकांवर उपासमारीची वेळ येणार आहे. हे आम्ही सहन करणार नाही. 1957 पासून रेशन दुकानदार अन्नधान्याचे वितरण करुन देशसेवा करत आहे. केंद्र शासनाला हि दुकाने रद्द



करायची असेल तर प्रत्येक दुकानदारांना 50 लाख रुपये देण्यात यावे अथवा पाल्याला शासकीय नोकरी, प्रत्येक महीन्याला 40 हजार रुपये मानधन देण्यात यावे अशी मागणी रेशन दुकानदार यांची आहे. देश पातळीवर होणा-या आंदोलनात व रास्त भाव दुकानदारांना न्याय मिळवून देण्यासाठी ALL INDIA FARE PRICE SHOP ASSOCIATION, DILHI, VICE PRESIDENT प्रल्हादजी मोदी पण सोबत आहे. मागणी मान्य झाली नाही तर रस्त्यावर उतरून लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याची तयारी सुरू केली आहे अशी माहिती डी.एन. पाटील यांनी दिली आहे. महाराष्ट्रात 55 हजार, औरंगाबाद जिल्ह्यात 1800, औरंगाबाद तालुका येथे 216, औरंगाबाद शहरात 199 रेशन दुकान आहेत. बैठकीत तालुका अध्यक्ष गंगाधर पवार, संजय साळवे, धिरज पाटील, अंबादास वाघ, अंजन साळवे, शेख नुरजहा, शबनम बेग, कल्पना जाधव, निर्मला यादव, मुश्ताक पटेल, ख्वाजा सिद्दीकी, संगिता मोरे, अहेमद बेग, सय्यद लईकोद्दीन आदी उपस्थित होते.

# भारतीय महिला फेडरेशन व परिवर्तन कॉम्प्युटर्सच्या वतीने महिलांसाठी मोफत कायदेशीर सल्ला केंद्र सुरू

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** विश्रांतीनगर, जयभवानीनगर राजनगर व इतर परिसरातील सर्व महिलांसाठी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या 125 व्या जयंतीनिमित्त महिलांसाठी मोफत कायदेविषयक मार्गदर्शन केंद्र सुरू करण्यात आले.

या वेळी महाराष्ट्र टाईम्स च्या पत्रकार पृथा वीर, ॲड अंजली कापसे, ॲड नीता शिंगणे, ॲड प्रमिला गिरी, प्रा. छाया ब्राम्हणे शाहिर वसुधा कल्याणकर यांची प्रमुख उपस्थिती होती. पृथा वीर यांनी महिलांना सावित्रीबाई फुले यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकत महिलांच्या वाढत्या कौटुंबिक हिंसाचारावर तसेच वाढते बालविवाह थांबवण्यासाठी समाजातील नागरिकांनी पुढे येऊन सामूहिक प्रयत्न करणे आवश्यक आहे. असे प्रतिपादन करून कायदेविषयक मार्गदर्शन केंद्राचे उदघाटन झाल्याचे जाहीर केले. ॲड. अंजली कापसे, ॲड. नीता शिंगणे, रजिया खान यांनी देखील आपल्या भाषणात क्रांतीज्योती सावित्रीच्या कार्याची आठवण करून देऊन महिला व पुरुषांनी खांद्याला खांदा लावून समाजातील अनिष्ट रूढी तसेच कौटुंबिक




हिंसाचार विरोधात एकत्र लढले पाहिजे. प्रास्तविक भारतीय महिला फेडरेशनच्या राज्य सहसचिव कॉ. वसुधा कल्याणकर यांनी केले. सूत्रसंचालन अश्विनी तांगडे व ऋतुजा नांगरे यांनी केले. आभार कॉ. हनुमंते यांनी मानले. यावेळी परिवर्तन कॉम्प्युटर्स चे संचालक भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे जिल्हा सहसचिव कॉ. मधुकर खिल्लारे, नरेंद्र निकम भाऊसाहेब काळुंके, इंगोले सर यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भाग्यश्री नरवडे, रंजना रंधवे, शांता सूर्यवंशी, चित्रा कुंटे, शीतल धनई, पूजा गाडेकर, पल्लवी गाडेकर, विमल धनई, कौशल्या सोनवणे, शांता सूर्यवंशी, प्रमिला मानकरी, सुरेश ठोंबरे, संजय अंभोरे, बाळू बोधक, विठ्ठल रंधवे यांनी प्रयत्न केले.

# महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत कामास नादरपूर गावात मंजुरी द्या : सरपंच सविता निकम

आधुनिक केसरी न्यूज

**पिशोर :** कन्नड तालुक्यातील विविध गावात रोजगार हमी व फलोत्पादन मंत्री , महाराष्ट्र शासन तथा पालकमंत्री संदीपान भुमरे यांनी भेटि दिल्या त्यात नादरपुर ता कन्नड येथे महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत कामास मंजुरी मिळणे बाबत ग्रामपंचायत नादरपुर यांच्या संयुक्त विद्यमानाने निवेदना देऊन विकास कामे सूरु करण्याची मागणी करण्यात आली आहे. पालकमंत्री संदीपान भूमरे हे कन्नड तालुक्यात दौऱ्यावर आले असता नादरपुर गावात धावती भेट घेतली. मात्र मंत्री महोदय गावात आल्याने कामाला गति मिळेल या हेतूने विविध विकास कामांचा आराखडा करून वंचित असलेली कामे पूर्ण व्हावी याची मागणी करण्यात आली आहे. त्यात १) नादरपूर पिशोर रस्ता ते वाघुळखेडा शिव रस्ता . १ किमी . २ ) अंजना नदीपासून ( श्री बाबुराव रंगराव निकम ) यांचे शेत ते कुंभारखाणी वस्ती . ३ ) कुंभारखाणी ते बोद्धवाडी डोंगरापर्यंत - १ किमी . ४ ) दलित वस्ती पाण्याची टाकी ते कन्नड- सिल्लोड हायवे रस्ता . ५ ) जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ते अंजना नदी पर्यंत संरक्षण भिंत , ६ ) एमआरईजीइस अंतर्गत गाय गोठा , सिंचन विहीर , फळबाग लागवड इत्यादी वैयक्तिक लाभांची कामे . ७ ) गावअंतर्गत ड्रेनेज लाईन काम . ८ ) मंदिरासमोर फेवर ब्लॉक बसवणे . १ किमी . - १ किमी . ९ ) सिंचनाची कामे सिमेंट बांध . १० ) नादरपुर शेत शिवारात नवीन विद्युत ट्रान्सफॉर्मर बसवणे . वरील प्रमाणे MREGS अंतर्गत मातोश्री पाणंद रस्ते ( शिवरस्ते ) इत्यादी कामास मंजुरी देण्यात यावी , असे निवेदन देऊन मागणी करण्यात आली आहे.

# लोकशाहीचा चौथास्तंभ पत्रकारितेने समाजाला दिशा देण्याचे काम केले

## कर्तव्यदक्ष सहाय्यक पोलीस निरीक्षक देवीदास वाघमोडे

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील व सिल्लोड येथील व सावळदबारा परिसरातील आपल्या लेखणीतून समाज जागृतीचे मौलिक कार्य करणारे, समाजाला आरसा दाखविणारे, प्रसंगी रोष पत्करून सत्य समोर आणण्याचे धाडस करणारे, लोकशाहीचा चौथा स्तंभ जीवंत ठेवण्यासाठी पत्रकार आणि पत्रकारितेचे मोठे योगदान असून पत्रकारितेने समाजाला दिशा देण्याचे काम केले आहे असा शब्दात फर्दापूर पोलिस स्टेशनचे कर्तव्यदक्ष सहाय्यक पोलीस निरीक्षक देवीदास वाघमोडे यांनी पत्रकार बांधवांचा फर्दापूर येथे गौरव करुन सत्कार करण्यात आला.

फर्दापूर पोलिस ठाण्यात आयोजित दर्पण दिन व पत्रकार बांधवांच्या सत्कार समारंभ कार्यक्रमा प्रसंगी मराठी पत्रकारितेचे दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे सपोनि देवीदास वाघमोडे यांनी पुजन करुन विनम्र अभिवादन केले.याप्रंसगी यांनी आपले विचार मांडताना पुढे म्हणाले की, ६ जानेवारी १८३२ रोजी दर्पण वृत्तपत्र सुरू करून बाळशास्त्री जांभेकर यांनी तत्कालीन इंग्रज राजवटी विरोधात भारतातील जनसामान्यांची भूमिका मांडण्याचा प्रयत्न केला होता. आजही समाज भावना मांडण्याचे काम पत्रकारितेच्या माध्यमातून केले जात असून पत्रकारितेला समाज मनाचा आरसा वाटल्यास वावगे ठरणार नाही असे विचार मांडले.

साप्ताहिक आपले ज्ञानपंख व ज्ञानपंख-24 NEWS चे मुख्य संपादक दशरथ सुरडकर यांनीही पत्रकारांना शुभेच्छा देतांना आपले विचार मांडले या पत्रकार दिनाला साप्ताहिक आपले ज्ञानपंख वृत्तपत्राचे कार्यकारी संपादक प्रविण तायडे, सिल्लोड तालुका प्रतिनिधी संजय दांडगे, पत्रकार बाळू शिंदे,पत्रकार शरद दामोदर, पत्रकार सुनील काळे,पत्रकार गोकुळसिंग राजपुत, पत्रकार ईश्वर इंगळे , पत्रकार संदीप इंगळे, पत्रकार योगेश बोखारे,पत्रकार संतोष गर्दे, पत्रकार दिलीप शिंदे, सागर भुजबळ, गणेश वराडे, योगेश महाकाळ, शेख सादिक, शेख अजहर, अजीम शेख, शिवाजी महाकाळ, अनिल रावळकर ,पत्रकार



यांच्यासह पोलीस उपनिरीक्षक व पोलिस स्टेशनचे सर्व कर्मचारी व सिल्लोड- सोयगाव,बनोटी, फर्दापूर,सावळदबारा,घाणेगांव तांडा परिसरातील पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.